वर्ष पन्नासावे ★ अंक दुसरा ★ मार्च १९६६ ★ संपादक : श्री. र. कावळे



शिक्षण प्रसारक मंडळीचे

— सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे ९

# परशुरामीय नियतकालिक


संपादक मंडळ

☐ अध्यक्ष प्राचार्य रा. रा. मालेगावकर

☐ उपाध्यक्ष उपप्राचार्य डॉ. मा. कृ. परांजपे

उपप्राचार्य रं. ना. गायधनी

☐ संपादक डॉ. श्री. र. कावळे

☐ सदस्य

प्रा. रा. म. गोखले ● ● सामाजिक शास्त्र

प्रा. य. बा. राजे ● ● विज्ञान

डॉ. सौ. अनुराधा पोतदार ● ● मराठी

प्रा. भीमराव कुलकर्णी

प्रा. चंद्रशेखर बर्वे

प्रा. स. रा. केणी ● ● हिंदी

प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर ● ● संस्कृत

प्रा. भ. ना. कुलकर्णी ● ● इंग्रजी

☐ विद्यार्थी प्रतिनिधी

जयंत देव तृतीय वर्ष साहित्य

जयश्री कानिटकर तृतीय वर्ष साहित्य

परशुरामीय • वर्ष पन्नासावे • अंक दुसरा • मार्च १९६६
संपादक : श्री. र. कावळे


### • मराठी विभाग

तो फरक तिलाच जाणवला • नीला दातार • ५ । 'अक्षर' कविता : एक अभिनव आविष्कार • विजय कारेकर • ८ । काय लिहावं ? कसं लिहावं ? • प्रा. चंद्रशेखर बर्वे • १२ । सात कविता • अशोक पटवर्धन जयश्री नरगुंदकर अविनाश साठये अविनाश चाफेकर 'मी' शशिकान्त पटवर्धन अनिल किणीकर • १४ ।

### • हिंदी विभाग

|| दिल और आँखे
इंद्रायणी गाडगीळ १७
|| कुछ शेर
शशिकला डिंगणकर १७
|| अपूर्व संयोग
शशिकला डिंगणकर १९
|| स्वर्गमें अकाल
नीलादेवी ठुबे २०
|| शौक अपने अपने
शीला बिजलानी २२

### • संस्कृत विभाग

लुना-९ • कण्टकार्जुनः • २४ । निराशस्य मनसः विलपितानि • लीलावती वर्तक • २४।छात्रगीता • अशराफ शेख• २४। हर्षाची नाटके : • जयश्री कानिटकर • २५। गांधीजींचा गीताविषयक दृष्टिकोण • अविनाश साठये • ३० । निबंधशिशू • कु. श्री. अर्जुनवाडकर • ३३ ।

### • इंग्रजी विभाग

Hardly can I Recover ! • Vijay Madge 35 A Few Lines • Kumud Shintre 35 Golden Jubilee of S. P. College • V. S. Bhat 35 Hamlet : A Fascinating Character • Vidyagauri Malegaonkar 36 • Synge's Nora • Rajnikant Belsare 37

### • सामाजिक शास्त्र विभाग

भारतातील स्वातंत्र्योत्तर काळातील समाज परिवर्तन • निर्मला मोकाशी • ३९ । What is a Laboratory of Psychology ? • Ranjana Sathaye • 43 | Agriculture, Industry and Defence • Prof V. R. Shirgurkar • 46 | Bertrand Russell on World Peace • Dr. Leela Gole • 48 |




**● विज्ञान विभाग**

वनस्पती आणि अंतराळ प्रवास ● प्रा. तारा केळकर ● ५३ । एकादशी व चतुर्थी ● जयश्री कानिटकर ● ५७ ।

● कै. श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित ६० ।

● कै. प्राचार्य रघुनाथ दामोदर करमरकर ६१ ।
संस्कृत विद्येचे थोर उपासक प्राचार्य करमरकर ● डॉ. रा. ना. दांडेकर ● ६२ । प्राचार्य करमरकर : शिक्षणक्षेत्रातील एक कर्तबगार व यशस्वी व्यक्तिमत्त्व ● पद्मश्री प्रा. दि. ब देवधर ● ६३ । Principal R. D. Karmarkar ● Dr. D.C.Pavate ● ६७ ।

● शिष्यवृत्त्या व पारितोषिकांचे मानकरी ● ६९ ।

● विविध विभाग व मंडळे यांचे अहवाल ● ७१ ।

● महाविद्यालयीन वार्ता ● ८४ ।

● कै. डॉ. न. वि. गाडगीळ ८८ । ● कै. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर ८८ । ● स्वर्गीय प्रधानमंत्री श्री. लालबहादुर शास्त्री ८९ ।


● मुखपृष्ठ व सजावट । विजयकुमार कारेकर तृतीय वर्ष साहित्य

कै. प्राचार्य रघुनाथ दामोदर करमरकर

यांच्या

पुण्य स्मृतीस




नवी विटी, नवे राज्य. दुसरा अंक. पहिल्या अंकानंतरचा. नावीन्याचे आकर्षण आम्हांस जितके वाटते तितकेच आपणांसही वाटावे या दृष्टीने आम्ही यावर्षी प्रयत्न केले. यशापयशाबद्दल बोलणे नाही. ‘ आम्हाला नवकविता समजत नाही ’ ‘ नव-चित्रकला आमच्या आकलनशक्तीस स्पर्शू शकत नाही ’ अशी विधाने ऐकली आणि मनांत विचार आला — ‘ नवीन समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न कधी झाला होता काय ? ’ नाही. उगीच बागुलबोवा केला.

या अंकात नवीन आणि ‘ पारंपरिक ’ लेखांची व चित्रांची सांगड दिसेल आणि ‘ नवीनते ’चे उघडेबोडके स्वरूप थोडेसे सौम्य वाटेल अशी आशा. श्री. विजय कारेकर यांचा कल्पक कुंचला या कामी फारच उपयोगी पडला. सजावट फार ‘ नवीन ’ वाटणार नाही !

जाहिरातदारांचे आणि जाहिराती मिळवून देणाऱ्या ‘ शिलेदारां ’चे मनःपूर्वक आभार. त्याचबरोबर श्री. य. गो. जोशी यांच्या सहनशीलतेबद्दल व सुबक मुद्रणाबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच.

अंक प्रसिद्ध करणे ही काही एका व्यक्तीची करामत नसते. ज्या अनेक व्यक्तींचे सहकार्य आम्हाला मिळाले त्यांचे आम्ही आभारी आहोत. या अंकासाठी कै. जगन्नाथमहाराज पंडित यांचे दुर्मिळ ब्लॉक्स ‘ केसरी ’ संस्थेने दिले. तसेच त्यांचे छायाचित्र श्री. बाळ पंडित यांनी दिले. त्याबद्दल आम्ही ‘ केसरी ’ संस्था व श्री. बाळ पंडित यांचे आभारी आहोत. कै. प्राचार्य करमरकर यांना श्रद्धांजली अर्पण करणारे लेख डॉ. डी. सी. पावटे, कुलगुरु, कर्नाटक विद्यापीठ; पद्मश्री प्रा. दि. ब. देवधर, व डॉ. रा. ना. दांडेकर यांनी अगत्यपूर्वक दिले याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. कै. प्राचार्य करमरकर यांची छायाचित्रे प्रा. बाळ करमरकर यांनी दिली. त्यांना आमचे धन्यवाद.

हे सुवर्ण महोत्सवी वर्ष. महाविद्यालयाच्या जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा. येथून पुढे ‘विजयी’ प्रवास चालू ठेवावयाचा. विजयांच्या पताका घेऊन आणि मान-सन्मानाची तोरणे बांधून ही ‘ यात्रा ’चालू ठेवायची. नव्या पिढीस हे आव्हान आहे. जिद्दीने ते स्वीकारायचे आहे.

**श्री. र. कावळे**
सं पा द क

**जयंत देव**
**जयश्री कानिटकर**
वि द्या र्थी प्र ति नि धी

## मराठी विभाग



नीला दातार तृतीय वर्ष साहित्य

# तो फरक तिलाच जाणवला....

अचानक खन्नासाहेबांनी एका प्रौढेला पुढे करून म्हटले, " ह्या गिरिजादेवी; एके काळी आपल्या आवाजाने आणि अभिनयाने यांनी सर्वांना जिंकले होते. आज यांनी उपस्थित राहून आपल्या समारंभाला शोभा आणली आहे. त्याबरोबर लोकांनी टाळ्या वाजविल्या आणि गिरिजादेवींनी मान लववून त्यांचा स्वीकार केला. ...." आणि ही नयना, आपल्या सौंदर्याने आता ती सर्वांना जिंकणार आहे, " एका अव्ययावत्, खरे म्हणजे उत्तान पोषाखातील तरुणीला पुढे करीत खन्नासाहेब मिस्कीलपणे म्हणाले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला आणि कॅमेऱ्यांच्या प्रकाशात नयना नाहून निघाली. कलाकारांमध्ये बसलेली उमा मात्र त्या क्षणी भयंकर दचकली. गिरिजादेवी आणि नयना दोघींचेही लोकांनी स्वागत केले होते. पण त्यांत फरक होता. कुणालाही तो जाणवला नसेल, पण तिला जाणवला. नंतरही नयना लोकांच्या घोळक्यात दिसेनाशी झाली होती आणि गिरिजादेवी मात्र कोपऱ्यात एकटीच कुठेतरी बघत बसली होती. कदाचित भूतकाळातल्या आठवणींत ती रंगून गेली असेल. पण तिच्या चेहेऱ्यावरचा भाव मात्र उमाला सहन करवत नव्हता.

घरी आल्यावर उमा स्वतःशीच म्हणाली, छे, नको तेच काहीतरी जाणवायला लागले आहे. भलतेच विचार मनात येत आहेत. कशाने बरे? फार कामाच्या ताणामुळे तर नसेल ना? मग थोडे दिवस विश्रांती घेतली पाहिजे. विश्रांतीचा एकच मार्ग त्या विचारांच्या भोवऱ्यातून वाट काढण्यासाठी तिला दिसला. पुढल्या रविवारपर्यंतचे सगळे कार्यक्रम प्रकृतीच्या कारणास्तव रद्द केल्याचे सर्वांना कळवायला तिने आपल्या सेक्रेटरीला सांगितले आणि तिच्या ठणठणीत प्रकृतीकडे आश्चर्याने पाहात सेक्रेटरी निघून गेली.

आज या सुट्टीला सुरुवात झाली होती. परंतु पत्रे मात्र नेहेमीप्रमाणे आली होती. वर्तमानपत्रातल्या चित्रपट-विभागात तिच्या नवीन गाण्यासंबंधी परीक्षण आले होते. खरे म्हणजे ते वाचायलाच नको होते. पण स्तुती आहे हे माहीत असूनदेखील न वाचणारा विरळाच. चित्रपटातले ते परीक्षण वाचता वाचता तिला सहज एका चित्रपटाच्या उद्‌घाटनाची आठवण झाली, व त्या वेळी तिच्याभोवती जमलेला रसिकांचा घोळका आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी तिचे चाललेले प्रयत्न आठवून तिला हसू येऊ लागले.

अरे! अजून आपण वेणीसुद्धा घातली नाही, हे डोक्यात येताच पटकन वर्तमानपत्रे बाजूला सारून ती आरशासमोर येऊन उभी राहिली, ' बापरे, पुढच्याच महिन्यात आपल्याला अडतिसावे संपून एकूणचाळिसावे वर्ष लागणार. म्हातारी व्हायला लागलेय की काय मी? गंमत म्हणजे शरीर वाढले तरी मन तेवढेच आहे. अजूनही पोर असल्यासारखेच वाटते! खरेच, मोठे झालेच नाही तर काय होईल? पण म्हणा आपल्या हातात काय आहे?' असे म्हणून उमा भराभर केस विंचरू लागली.

केस विंचरून झाल्यावर ती सहज गॅलरीत येऊन उभी राहिली. ' आज एक केस पिकलेला दिसला. तो उपटला खरा, पण म्हणून केस पिकायचे का राहणार आहेत?

आज एक, उद्या दुसरा, परवा तिसरा, हळूहळू सगळे केस पांढरे होऊन जातील. मग कशी दिसेन मी ! ' पूर्वी शेजारच्या वाड्यात रहाणाऱ्या चंद्राक्कांची उमाला लागलीच आठवण झाली. पिके केस, सुरकुतलेला चेहेरा, डुगडुगणारी मान...उमा एकाएकी शहारली. शी ! काय विचार येताहेत आज मनात ! मान फिरवून ती झटकन दुसऱ्या बाजूला जाऊन उभी राहिली. पण जागा बदलली म्हणून काय विचार बदलणार आहेत !

' मृत्यू !! ' विचार न केल्याने का तो टळणार आहे ! सर्वांना तो असणारच. मग कुठली वेगळी, का प्रसिद्ध गायिका म्हणून यमदूत मला माफी देणार आहे ! एक प्रकारचे विकृत हास्य करून उमा समोरच्या झाडाकडे पाहू लागली. रातराणीच्या झाडावर बुलबुलाने घरटे बांधले होते. सारखा त्या पक्ष्यांचा किलबिलाट चालायचा. त्यांचा आवाज उमाला अतिशय आवडायचा. हळूच, चोरून, चोरून त्या पक्षिणीला न कळत ती त्या पिल्लांचे निरीक्षण करायची, त्यांच्या सुरक्षिततेची काळजी करायची. पण आज ते घरटे रिकामे होते. त्यातली पिले उडून गेली होती. कुठे कुणास ठाऊक ! पण आता ती काही इथे परत येणार नव्हती. आईने आणलेल्या घासासाठी आरडा-ओरड करणार नव्हती. काय वाटत असेल एखादी जागा सोडून जाताना. परत आपण इथे येणार नाही हे कळत असून ! पण ती जागा काही रिकामी राहात नाही. मी सुद्धा अशीच एक दिवशी हे जग सोडून जाणार आहे. च्... च्... असले विचार पूर्वी कधी येत नव्हते मनात मग आजच असे का ! बरोबर आहे म्हणा— तेव्हा सबंध तारुण्य, आयुष्यातला बहार डोळ्यापुढे होता. आज अंत आहे. अजून हिरवळीचा रस्ता पायाखाली आहे. पण हळूहळू काट्याकुट्यांनी भरलेला रस्ता लागणार आहे, सुरुवातीला लाभलेला आईचा आधारही नाही, एकटेच जावे लागणार आहे. मुक्कामाची, मृत्यूची क्षणाक्षणाला वाट पाहात, संगीताच्या सुरात आपण भान विसरून गेलो होतो खरे, पण त्या जादूने का कुठे काळावर मात करता येते ! जगाच्या रंगभूमीवर गायिकेची भूमिका केली खरी ! पण प्रेक्षकांची पर्वा न करता त्याच्या सूत्रधाराकडे आपल्याला जावेच लागणार आहे.

किती क्षणभंगुर आहे जीवन ! मग हा आवाज तरी चिरंतन आहे का ? तोही बदलून जाईल ! मग हे वैभव तरी राहील का ? कसे राहील ? शितं तोवरी भुते भोवती ! हळू हळू सर्व वैभव नाहीसे होईल. काळाच्या ओघात कुठेतरीच बाजूला पडून मी शेवटचे क्षण मोजीत असेन. मेणबत्ती जळते तसे मनही जळत असेल माझे. पण मेणबत्तीचा प्रकाश तरी पडतो. जळत्या मनाचा का प्रकाश पडणार आहे !

मागच्या वैभवाची आठवण करीत उदासपणे उरले-सुरले जीवन काढावे लागणार काय ! लोकांना कल्पनाही येणार नाही की एकेकाळची नामवंत गायिका आज इथे कुजते आहे म्हणून ! आणि कळले तरी कुणी येणारही नाही. त्या नामवंत गायिकेची जागा दुसऱ्या एखाद्या नामवंत गायिकेने घेतली असेल. ती राजमोहिनी सहानी-उद्याची आशा...स्वरसम्राज्ञी असेल...हूं ! सूर्य नसताना लोक चंद्राचे कौतुक करतात. तिच्या नावाने लाखो पत्रे येतील. तेच शब्द ! तीच भाषा ! मायना वेगळा ! वर्तमान-पत्रातले रकाने तिच्या स्तुतीने भरून जातील. एखाद्या कागदाच्या कपट्याप्रमाणे मी कुठेतरी पडलेली असेन. कुणाला आठवण तरी येईल का माझी ! कधी तरी रेडि-ओवर गाणी लागतील...ये रेडिओ सिलोनका व्यापार-विभाग है. पुराने फिल्मोंके लोकप्रिय गीतोंमे सबसे पहले सुनिये उमादेवीको... सहन होईल का हे सारे ?

आताच नाही होत हे सहन ! मग पुढे ! द्यावे का आगगाडीखाली अंग झोकून ! क्षणात मृत्यू ? पण बेवार-शाचा...लोक हळहळतील, उसासे सोडतील, रडतीलही कदाचित् ! पण छे ! लोकांची दया नाही सहन करवत. मरतानाही कसे अभिमानाने मरावे !

काय भयंकर विचारांचे तांडव चालले आहे आपल्या डोक्यात ? उमा ते विचार बाजूला सारण्याचा प्रयत्न करू लागली. कशावरून आपल्या आवाजाचे सौंदर्य इतक्यात कमी होईल ! असे म्हणून ती आपल्या मनाचे समाधान करू लागली. पण वेड्या मनाच्या आशेतून बुद्धी वर डोके काढीत म्हणत होती, नाही, खरे आहे ते. इतर सर्व गोष्टींप्रमाणे आवाजही अमर नाही. तोही बदलेल, कधी तरी तो खराब होणारच. वैभवाच्या गोष्टी काय करतेस वेडे ! अनंताचे चक्र सतत चालू असते....जन्म... मृत्यू, गरिबी...श्रीमंती, कीर्ती...अपकीर्ती त्यावर कुणाचाच ताबा नसतो. नशिबी येईल त्याला आनंदाने सामोरे जावे. एवढा मोठा सूर्य, त्यालाही वर चढता चढता शेवटी खाली, उतरायला लागते. मनुष्याला गरिबीतून वर चढता येते, कीर्ती संपादन करता येते, यशाच्या शिखरावर तो जाऊन बसतो. पण यशाचे शिखर हा काही मुक्काम नाही. तिथून परत खाली यायला लागते. तिथे राहण्याची धडपड

निरर्थक असते. कशाला त्याबद्दल दुःख करतेस! त्यातही काही अर्थ नाही. जे मिळाले आहे, त्यातच आनंद मानायला शीक ना!

उमाचा चेहेरा पांढरा फटक पडलेला होता, ओठ-थरथरत होते. मनाची आंदोलने होत होती, पण एकाएकी तिचा चेहेरा पूर्ववत् झाला. एका प्रकारच्या निश्चयाने तिने घट्ट ओठ मिटले व ती परत आत येऊन नेहेमीची कामे करू लागली. थोड्या वेळाने तिने आपल्या सर्व रेकॉर्डस बाहेर काढल्या व त्या ग्रामोफोनवर लावून ती एकचित्ताने ऐकू लागली. प्रत्येक गाण्याशी वेगवेगळ्या स्मृती संबंधित होत्या. त्या स्मृतींनी व गीतांतील भावनांनी तिचे मन हेलावून गेले होते. संध्याकाळचे पाच वाजले तरी त्या रेकॉर्डसचा ढीग अजूनही शिल्लक होता. शेवटी त्या तशाच ठेवून ती उठली व तिने बाहेर जायची तयारी केली. फिक्या निळ्या रंगाची साडी व तसलाच ब्लाऊझ. हीच साडी, तिच्या गाण्याला पहिल्यांदा बक्षीस मिळाले तेव्हा, ती नेसली होती.

आपल्या एका मैत्रिणीला बरोबर घेऊन ती चौपाटीवर गेली. चौपाटीवर बसून तिने चक्क भेळ खाल्ली, शहाळ्यातले पाणी ती प्याली आणि लहानपणासारखा वाळूचा किल्लाही तिने बांधला. तिची मैत्रीण मनात म्हणत होती, 'किती पोरकटासारखे वागत आहे ही. बडबडते आहे किती आणि हसते आहे किती! काय झाले आहे काय हिला? गंमतच आहे.' वाळूवरून त्या दोघी मग उगीचच इकडे तिकडे भटकत होत्या. वाऱ्याने पदर उडत होता. कसे हलके हलके, फुलपाखरासारखे वाटत होते. संध्याकाळही अशीच फुलपांखरांच्या पंखावर बसून भुर्रकन उडून गेली.

नंतर सरळ ती मैत्रणीबरोबर 'आशा' चित्रपटगृहाकडे गेली. आज तिथे एका प्रसिद्ध दिग्दर्शकाच्या नवीन चित्रपटाचे उद्घाटन होते. तिथे सगळा कलाकारवर्ग उपस्थित होताच. उमाने सर्व कार्यक्रम काही दिवस रद्द केल्याचे माहीत असल्याने ती दिसताच सर्वांना आश्चर्य वाटले. परंतु सर्वांनी तिचे मनःपूर्वक स्वागत केले. लोकांचा केवढा तरी घोळका तिच्याभोवती जमला. कुणी बोलत होते, कुणी फोटो घेत होते, कुणी स्वाक्षरीसाठी वह्या पुढे करत होते. उमा सर्वांना आपापल्या परीने संतुष्ट करण्याचा प्रयत्न करीत होती. 'अग आत चलना आता,' असे म्हणून तिची मैत्रीण तिला हात धरून ओढावयाचा प्रयत्न करू लागली, तर उमा हसून म्हणाली, 'एवढ्या ह्या लोकांना सह्या देऊन मग येते.' आश्चर्याने तिच्याकडे पाहत ती आत निघून गेली. सर्वांना सह्या देऊन उमा मोकळ्या मनाने आत येऊन बसली व चित्रपट संपल्यावर सर्वांचा निरोप घेऊन घरी आली.

रात्री जेवण झाल्यावर ती गच्चीत आली, तेव्हा सगळीकडे टिपूर चांदणे पडलेले होते. वाऱ्याच्या झुळुकीबरोबर रातराणीचा सुगंध येत होता. सायलीची फुले चांदण्यासारखी दिसत होती. चंदेरी रंगात न्हालेली ती झाडे पहात असताना उमा स्वतःशीच म्हणाली, 'काय सौंदर्य आहे हे निसर्गाचे! अनंत काळ असे उभे राहिले तरी परत जाण्याचा विचार मनात यायचा नाही. पण माणसाला जावेच लागत नाही!' हळूच हसत ती झोपण्याच्या खोलीकडे निघून गेली...

सकाळी पक्ष्यांच्या किलबिलाटाच्या सुरावर स्वार होऊन सूर्यकिरणांनी त्या खोलीत प्रवेश केला. त्यांना कसलाच फरक जाणवला नाही! ते चैतन्यमय थोडेच होते, फरक जाणवायला!

$



**विजय कारेकर** तृतीय वर्ष साहित्य

# 'अक्षर' कविता : एक अभिनव आविष्कार

१९६५ च्या सत्यकथेच्या दिवाळी अंकातील र. कृ. जोशी यांच्या अभिनव कवितेचा विचारच फक्त येथे मर्यादित आहे. सत्यकथेने आजवर सादर केलेल्या सर्व प्रकारच्या आविष्कारांत ही पद्धती अभिनवतम आणि उत्कट असल्याने तिचे रसिकांनी स्वागत केले पाहिजे. कवितांच्या रसग्रहणाला सुरुवात करण्यापूर्वी काही सांगणे जरूर वाटते ते असे.

मला असे नेहमी वाटत आले आहे की कलावंताच्या मनाचा एक 'ग्राफ' असावा. विशिष्ट वेळी कलावंताचा संज्ञाप्रवाह चेतविला गेला असता त्यातून अनुभवाचा कलात्मक आकार मूर्त होत असतो....ते कंपन जर आलेखित करता आले तर कलावंताच्या तरल भावविश्वाची संवेदना रसिकास जाणवण्यास साहाय्य होईल; आणि खऱ्या अर्थाने कलेची फलश्रुती होईल. कारण कलावंताला जे जसे जाणवले ते तसेच नेमके रसिकाला जाणवल्यानेच कलेचा खरा आनंद रसिकाला लाभेल.

कवितेत आशय तर महत्त्वाचा असतोच; पण तीतील भाववृत्ती–mood–ही गोष्ट तर, मला वाटते, अधिक महत्त्वाची मानावी लागेल. भाववृत्ती ही आशयाच्या सौंदर्याचे शिल्प असते. नुसत्या आशयाकडे रखरखपणे पाहण्यापेक्षा त्याच्या काव्यात्म प्रवृत्तीकडे पाहणे हे रसिकाला अधिकच आवडेल. कवितेचे सौंदर्य हे भाववृत्तीवर अवलंबून असते.

अनुभव हा चित्रमय असताना तो अक्षरांच्या अ-चित्रमय माध्यमातून चित्ररूप करण्याचा जो एक सहज वा असहज प्रयत्न करावा लागतो, त्यामुळे साध्याभोळ्या अक्षरांचे माध्यम काहीसे कमी प्रभावी ठरते. अर्थात इथे अक्षरांच्या समर्थतेवर आक्षेप नाही. समर्थ लेखकाच्या अक्षरांमधून अर्थवाही चित्रे धावत असतातच. पण कलावंत हा नेहमी प्रगत, अधिक प्रगत असे काहीतरी करीत असतो. किंबहुना प्रगतिशीलता हा कलेचा अंगभूत गुणच आहे. त्यामुळे अक्षरे जर 'शक्य त्या प्रमाणात' चित्रांकित करता आली तर आविष्कार अधिक परिणामकारक ठरेल हे साहजिकच आले.

लिहिणाऱ्याचे व्यक्तिमत्त्व त्याच्या हस्ताक्षरातून काही प्रमाणातून व्यक्त होण्याची शक्यता असते. लेखकाच्या हस्ताक्षरातून तर त्याची आंतरिक तळमळ बाहेर पडत असल्याने त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होण्याचा संभव दाट. त्यातून कवीने तळमळीने स्फूर्त होऊन कोरलेली अक्षरे तर कवीच्या 'पुलकित संज्ञा-प्रवाहाचे' प्रभावित दर्शन देतात; ही भावाक्षरे ठरतात. त्यांत जणू भावनांची प्रतिबिंबे दिसतात. कलाप्रकार अशा अधिक प्रत्ययकारक माध्यमांचा शोध घेतो. ही गोष्ट स्वागतार्हच आहे. विशेषतः काव्यातील तरलता रसिकाला जाणवून देणे म्हणजे काव्यासाठी काहीतरी बहुमोल कार्य केल्यासारखेच आहे. र. कृ. जोशी यांच्या कवितांचा विचार याच दृष्टीने करावयाचा आहे.

त्यांची पहिली कविता 'एक कविता'. प्रत्येक ओळीत एकेक विभिन्न अनुभव ग्रथित केला आहे — ज्यांचा एकीचा दुसरीशी सलग असा संबंध साधता येत नाही. पण यासाठी ही कविता विसंगत, विकृत, दुर्बोध आहे... अशी उथळ संबोधने लावण्यात अर्थ नाही. या कवितेचा एक विशिष्ट mood आहे. या मूडमध्ये कवीच्या मनात आर्त आठवणींचे निरनिराळे अनुभव रांकेत उभे आहेत. आणि त्या चित्राची ही एक कविता तयार होते. कवीचे मन जणू 'पिनकुशन' बनले आहे. कुणीही यावे



# एक विलक्षण विमनस्कपणा बिनबोलावतां आलेला; मेव्हणासा; अगंदी सहज

आणि व्यथेची टाचणी टोचून जावे...ही कविता म्हणजे एक व्यथांची पिन-कुशन. विशिष्ट अनुभूतीच्या कल्पनेचाच विस्तार संपूर्ण कविताभर असावा हा हट्ट अनर्थकारक आहे. एकाच वेळी भिन्नभिन्न कल्पना कविमनाला चेतवून त्यातून एक आगळाच आविष्कार साधू शकतात त्याचे हे प्रत्यंतर.

' दोघे एकटे एकटे '—या दुसऱ्या कवितेत तो आणि त्याची ' विवाहित ती ' दोघे बोलताहेत, चहाच्या टेबलाशी. आणि त्याच्या पूर्वायुष्यातील त्याची होऊ न शकलेल्या एका मुलीच्या निधनाची वार्ता त्यांना समजलेली आहे.

त्याचा मूड शोकमग्न. तो शोक काळ्या जाड अक्षरांच्या थरातून वाहतो आहे. ती त्याची समजूत घालण्याचा निष्फळ प्रयत्न करते आहे—मिष्किल आणि किणकिणत्या अशा एकेरी अक्षरांच्या स्वरात. पण त्याचा शोक अशाने आवरणारा नाही. थोड्याच वेळात (कवितेच्या दुसऱ्या भागात ) तो तिच्याकडे काळा टाय मागतो. पुनः मिष्किलपणातून कटुता कमी करण्याचा निष्फळ प्रयत्न होतो. शेवटी दोघे एकटे एकटेच !

' एकाशा '. एकाशा संध्याकाळी कवीचे मन नको असताना अकारण बेचैन होते. आणि जडसा विमनस्कपणा व्यापून राहतो. त्याचे हे प्रतिबिंब. जर्द जख्खड बिनपावसाच्या संध्याकाळी मनास आलेली ही जडता अक्षरे जड आणि ढोबळ करते. कोमल भावस्थितीतला रेखीवपणा इथे रहात नाही. ' मेव्हणासा ', ' पाण्याच्या उतरणीवर वहात जावं तसा ' आणि ' आधुनिक चित्रासारखा ' या सहज पाठोपाठ येणाऱ्या प्रतिमा ' जडतेची गती ' आणि म्हणून ' विमनस्कपणाची लय' अधिक बद्ध करण्यास साहाय्य करतात. हे सारे अचूक साधले ते भावकंपनांचा आलेख नेमका टिपला गेल्यामुळेच. कवीची उदास भावस्थिती मग सहजच डोळ्यांपुढे येते.




कवीच्या भावस्थितीची नेमकी चित्रे दाखविणाऱ्या या र. कृ. जोशींच्या कविता मला फार उत्कट वाटल्या. कवीचा संज्ञाप्रवाह जेव्हा चेतविला गेला ( the point of ignition ) तेव्हा ज्या अक्षरलहरी त्यावरून वहात गेल्या, त्यांच्या कंपनाची चित्रे म्हणजे या अक्षर-कविता होत. आधुनिक मराठी काव्याच्या आविष्कारपद्धतीत हे एक नवे दालन खोलले जात आहे. हे दालन समृद्ध करण्याची सुसंधी आता लाभणार आहे. म्हणजे अक्षरकविता खरोखरी ' अ—क्षर ' होण्यास साहाय्यच होईल असा विश्वास वाटतो.

*q. & a.* *q. & a.* *q. & a.*

[मराठी वर्ग संघटनेच्या अभ्यासमंडळात श्री. कारेकर यांनी हे टिपण वाचून दाखविले. नंतर या टिपणावर बरीच चर्चा झाली. त्या चर्चेतील महत्त्वाचा भाग प्रश्नोत्तर रूपाने जसाच्या तसा पुढे दिला आहे.]

*q.* आधीच कविता छापणे डोईजड होते. त्यात अशा कवितांचे ब्लॉक्स करून छापणे न परवडणारेच आहे ना ?

*a.* प्रश्न ठीक आहे. पण व्यावहारिक आहे. कलावंताच्य आविष्करणाला खर्च फार पडणार आहे म्हणून ती आविष्कारपद्धती कोंडून ठेवणे हे कलेच्या क्षेत्रात अनीतीचे. ब्लॉक्स करून छापणे आर्थिक अडचणींमुळे कठीण असेल तर कविता कवीच्या कागदावर तरी राहील ना ? शुद्ध कलाविचारात आविष्करणाची cost काढण्याचा विचार अटळ (?) असला तरी नकोसा असतो.

*q.* या कवितांची नावे प्रचलित पद्धत सोडून कवितांच्या शेवटी का दिली आहेत ? मला वाटते, ती प्रथम दिली असती तर

वाचकाला अर्थ समजण्यास प्रथमपासूनच मदत झाली असती.

*a.* होय. सर्वसाधारणपणे पाहता ते खरेच आहे. पण आधी कविता सुचते आणि मग कवी त्या कवितेपासून थोडा अलग होऊन तिच्याकडे पाहतो. आणि मग आपल्या कवितेला काही नामाभिधान करतो. म्हणजे नाम खरोखरी नंतरच येते. पण आजपर्यंत 'शीर्षक' किंवा 'मथळा' या शब्दांच्या अर्थामुळेच केवळ 'शीर्षक' देण्याचा प्रघात पडला. यापेक्षा त्यास फारसा अर्थ नाही.

कवितेचा अर्थ समजण्यास शीर्षकाने मदत करावी ही अपेक्षा मला वाटते, या आधुनिक प्रगतीच्या काळात फार सामान्य आहे.

*q.* पण कवितेचे नाव शेवटी दिल्याने तरी काय साधते ?

*a.* फारच काही साधून जाते, असे मला मनापासून वाटते. कविता वाचून संपल्यावर तिचा परिणाम मनावर उमटून राहतो. नंतर कवितेचे नाव वाचल्यावर त्या नावात संपूर्ण कवितेचा आठव ग्रथित केलेला असल्याने त्या नावाचा उच्चार मनातील पूर्वक्षणी उमटलेल्या कवितेच्या परिणामाला जागा करतो व कविता वाचून संपली तरी ती मनात निनादत उठते.

*q.* ही कविता आम्हांला दुर्बोध वाटली. पण आता ती काहीशी अर्थवाही वाटते. तुम्ही सांगण्यात काही जादू केली आहे काय ?

*a* यात माझी काहीच जादू नाही. मी नवी कविता तन्मयतेने वाचतो. नव्या प्रामाणिक अभिव्यक्तीवर माझा विश्वास आहे. ती अभिव्यक्ती समजावून घेण्याची, तो मूड जाणवून घेण्याची धडपड मी करतो. तिचा हा परिणाम असावा. जादूबिदू कुछ नही !

*q.* तुम्ही या कवितांचे जे अर्थ सांगितलेत तेच र. कृ. जोशींना अभिप्रेत आहेत काय ?

*a.* ते मी कसे सांगणार ? रसिकाची संस्कारक्षमता किती, त्याची संवेदनशक्ती किती, त्याची भावस्थिती कोणत्या प्रकारची आहे, त्याची बौद्धिक पातळी, कवितेची समज किती यावर अशा गोष्टी अवलंबून असतात. कवीला स्वतःला अभिप्रेत असलेला अर्थ, त्याच्यातील आणि रसिकांतील या भेदामुळे बदलल्यासारखा वाटेलही. पण मूलत: **अर्थ-परिणाम** बदलत नाही.

*q.* र. कृ. जोशींनी या कविता ज्या पद्धतीने लिहिल्या तशा पद्धतीने इतर कवींनी आपापल्या कविता लिहाव्यात काय ? प्रत्येक कवीला अशी पद्धती साधेल असे तर दिसत नाही.

*a.* अशा भावस्थितिदर्शक अक्षर-पद्धतीने प्रत्येक कवी कविता लिहू शकला तर ती गोष्ट हवीच आहे. पण त्याच्या चित्रकृति-निर्मितीच्या मर्यादांच्या जाणिवेमुळे कविता अशाच लिहाव्यात असा हट्टाग्रह मुळीच नाही.

*q.* प्रत्येक कवीकडून जर ही अपेक्षा नसेल तर त्याचा अर्थ असा की अभिव्यक्तीची ही पद्धती अपरिहार्य नाही पण 'कवी' बाजूला ठेवून 'कविते'च्या संदर्भात या अभिव्यक्तिपद्धतीची—माध्यमविषयक प्रयोगाची — चर्चा करणे हे अधिक बरे. मुळातच प्रत्येक कविता व्यक्त होताना अशाच वेगवेगळ्या अक्षररेखाटनातून व्यक्त होणे हे कविताप्रत्ययाच्या दृष्टीने अपरिहार्य आहे का ?

*a.* होय. कविताप्रत्ययाच्या दृष्टीने हे अपरिहार्यच आहे. कारण कवीच्या मनात विशिष्ट अनुभवामुळे कंपित झालेले भावाकार...हा जणू चैतन्याचा साक्षात्कार.... असतो...आणि त्याचे दर्शन जसेच्या तसे रसिकाला होण्यातच त्याचे सार्थक असते. या आविष्कार—पद्धतीने ही गोष्ट साधू शकेल.

*q.* आजपर्यंत अनुभवाला अधिकाधिक मूळच्या सचेतन स्वरूपात रूप देता यावे यासाठी अलंकारांच्या ऐवजी प्रतिमांचा उपयोग केला गेला. आता या प्रतिमाही अपुऱ्या वाटू लागल्यामुळे अक्षरकवितांतल्या प्रयोगासारखे प्रयोग केले पाहिजेत असे वाटू लागले आहे काय ?

*a.* प्रतिमा अपुऱ्या पडू लागल्या आहेत असे मी कधीच म्हटलेले नाही. उलट प्रतिमा दुथडी भरून वाहतानाच आढळतील. ही आविष्कारपद्धती प्रतिमांच्या उणिवेमुळे मुळीच आली नाही. प्रतिमा तर विपुल आहेतच. परंतु कवीला आपला अनुभव अधिक सरसतेने व्यक्त करण्याची तळमळ असल्यामुळेच ही आविष्कारपद्धती अनुसरली गेली आहे असे वाटते.

*q.* जर मूळ अनुभव जसाच्या तसा मूर्त व्हावा यासाठी कलावंताची धडपड चालत असेल आणि या धडपडीतून ही नवी अक्षरवाटिका सिद्ध झाली असेल, तर मग त्याच कारणासाठी अक्षरवाटिकेच्या जोडीला विविधरंगांचा आणि त्याहीपुढे जाऊन विभिन्न सुरांचा उपयोग करणे हेही क्रमप्राप्तच ठरते, असे तुम्हांला वाटते का ?

*a*. निश्चितच. विविध रंगांचा आणि सुरांचा वापर करता आला तर अगदी बहारीचे काम होईल असे मला वाटते. कवितेतल्या अनुभवाला रंगांचे पंख आणि स्वरांचे कंठ फुटले तर ते कोणत्या काळच्या कवीला नको आहे ? बोलपटांच्या बाबतीत ही गोष्ट अनुभवास येत आहेच. प्रथम मूकपट होता. पुढे त्यात बोल भरल्यानंतर जिवंतपणा आला. तर पुढे रंग व सूर भरल्यावर तर ती कलाकृती चैतन्याने न्हाऊ लागली. आता पाश्चात्य देशांत तर असे प्रयोग चालले आहेत की चित्रपटाच्या वेळी चित्रगृहात भावानुरूप गंधही दरवळत राहावा.

*q*. आजपर्यंत साहित्यकला ही मनोगम्य मानली जात होती. ती आता, चित्र, संगीत या कलांच्या माध्यमाचे मिश्रण साहित्यकलेच्या माध्यमात केल्याने इतर कलांच्या प्रमाणे इंद्रियगम्य होणार नाही काय ?

*a*. साहित्येतर कला केवळ इंद्रियगम्यच म्हणता येतील की काय याविषयी शंका वाटते. आणि ' इंद्रियगम्यता ' ही अपराधीपणाची भावना उत्पन्न करणारी गोष्ट का मानली जावी हेच कळत नाही. साहित्यातून ऐंद्रिय संवेदनांचाही आविष्कार होत असेल–म्हणजेच कवि-मनाचा अनुभव समग्र असा व्यक्त होत असेल, तर साहित्यात ' इंद्रियगम्यते 'चा शिरकाव होत आहे म्हणून बाऊ वाटण्याचे कारण नाही. मला वाटते, शुद्धतेपेक्षा प्रत्ययकारकता ही कलांच्या वा माध्यमांच्या बाबतीतली महत्त्वाची गोष्ट आहे. तेव्हा माध्यम–संकरामुळे साहित्य-कलेच्या शुद्धतेचे काय होईल म्हणून धास्तावण्याची किंवा व्याकुळ होण्याची मुळीच आवश्यकता नाही.

*q*. मर्ढेकरांनी जसा कलांचा सोपान कल्पिला, की ज्याच्या सर्वांत खालच्या पायरीवर साहित्य आहे व सगळ्यांत वरच्या पायरीवर संगीत आहे, तसाच तुम्ही रचीत आहात. मग अक्षरांची वळणे न बदलता केवळ रंगांचा उपयोग करून किंवा रंगांचाही उपयोग न करता केवळ स्वरांचा उपयोग करून जे जाणवले ते व्यक्त करणे अधिक श्रेय-स्कर, असे तुम्हांला वाटत नाही का ?

*a*. जरूर वाटते. पण अक्षरांपेक्षा रेखांतून, रेखांपेक्षा रंगांतून व रंगांपेक्षा स्वरांतून अगदी कमालीची परिणाम-कारक अभिव्यक्ती साधते, म्हणून क्रमश: अक्षरांकडून रेखांकडे, रेखांकडून रंगांकडे व रंगांकडून स्वरांकडे जाण्या-पेक्षा रेखा–रंग-स्वरांनी जे साधता येते ते अक्षर-प्रयोग करून साधण्याचा प्रयत्न का करू नये ? हा प्रयत्न हे एक आव्हान असेल. पण ते का स्वीकारू नये ! अनुभवाभिव्यक्तीची आव्हाने जित्याजागत्या जिद्दीच्या कलावंतांनी नाही स्वीकारावयाची तर कुणी ? र. कृ. जोशींनी आव्हान स्वीकारले व त्याला यशस्वी प्रत्युत्तर दिले म्हणून तर त्यांची मला मातब्बरी वाटते !

S S S S S S

चर्चा पुष्कळ झाली. निदान आणखी व्हावी अशा पुष्कळ गोष्टी तरी आतापर्यंत नक्कीच चर्चेत आल्या. कारेकरांच्या टिपणाचे व वाचनाचे हे यशच.... कारेकरांचे टिपण काहीसे आडदांड पद्धतीने लिहिलेले व धक्के देणारे असले तरी, त्यांची कलाप्रेमी भूमिका लक्षात घेता, ते अधिक्षेपार्ह ठरू नये.... शिवाय विचारांच्या वाढीच्या दृष्टीने, शास्त्राच्या काटेकोर सिद्धतेच्या दृष्टीने चर्चा व्हावी, तत्त्वमंथन व्हावे एवढ्यासाठी असे आडदांड, धक्के देणारे काही तरी मुळात असावेच लागते !

S S S S S S

**[ ' अक्षरकवितां'तील ओळींचे पुनर्मुद्रण सत्यकथेच्या सौजन्याने. ]**

$



प्रा. चंद्रशेखर बर्वे

# काय लिहावं ? कसं लिहावं ?

मित्रहो ! तुमच्याशी थोडं हितगुज करायचं ठरवलं आहे, तुमच्या ' परशुरामीय 'साठी येणाऱ्या लेखनाविषयी. पुष्कळदा असं होतं की मोठ्या उत्साहानं तुम्ही साहित्य आणून देता; पण बहुधा त्याचा स्वीकार केला जात नाही. स्वाभाविकपणेच तुम्ही हिरमुसले होता, नाउमेद होता. अशा वेळी तुमच्या मनात येत असेल की आपलं साहित्य का स्वीकारलं गेलं नाही; काय लिहिलं, कसं लिहिलं म्हणजे ते स्वीकारलं जाईल ! प्रत्येक वेळी व्यक्तिशः तुम्हा सर्वांना या प्रश्नांची उत्तरं देता येत नाहीत. ती केव्हा तरी द्यायला हवीत असं मात्र सारखं वाटत असतं, आणि म्हणूनच या ठिकाणी तुमच्याबरोबर तसं काही बोलायचं ठरवलं आहे. यातून तुम्हांला आवश्यक ते मार्गदर्शन मिळेल असं वाटतं.

या वर्षी, आधुनिक मराठी कवितेचे प्रवर्तक कवी केशवसुत यांची जन्मशताब्दी साजरी केली जाणार आहे. या निमित्तानं केशवसुतांच्यावर बरंच लिहिलं जाईल. तुम्हीसुद्धा काही लिहायला हरकत नाही. केशवसुतांनी आधुनिक मराठी कवितेचं प्रवर्तन केलं म्हणजे नेमकं काय केलं, मर्ढेकरांच्यापासून जी नवी कविता लिहिली गेली ती वाचून मग केशवसुतांची कविता वाचल्यावर तिच्याविषयी कोणत्या प्रतिक्रिया होतात, केशवसुत व मर्ढेकर यांच्या कवितांची तुलना केली तर काय दिसतं, अशांसारख्या एखाद्या प्रश्नाच्या अनुरोधानं विचार करता येईल. या दृष्टीनं येत्या सुटीत केशवसुत, मर्ढेकर व काही प्रातिनिधिक नवकवी यांच्या कविता तुम्ही वाचाव्या, या कवींविषयी रा. श्री. जोग, म. श्री. पंडित, श्री. के. क्षीरसागर, गंगाधर गाडगीळ यांसारख्या टीकाकारांनी जे लिहून ठेवलं आहे ते वाचावं आणि एखादा पाच सहा पृष्ठांचा लेख लिहून काढावा. अर्थात कमीत कमी या लेखात मांडणी तरी तुमची स्वतःची हवी. काही स्वतंत्र मतप्रतिपादन करण्याचा प्रयत्न तुम्ही केलात तर केव्हाही तो स्वागतार्हच ठरेल.

गेल्या वर्षी सुविख्यात साहित्यिक सॉमरसेट मॉम यांचं निधन झालं; तर रशियन लेखक शोलोखोव यांना नोबेल पारितोषिक मिळून त्यांचं नाव सर्वत्र गाजलं. मॉमची ' ऑफ ह्यूमन बॉंडेज ' सारखी कादंबरी, त्यांचं ' सेक्रेड फ्लेम 'सारखं नाटक, ' समिंग अप 'सारखं आत्मचरित्रात्मक पुस्तक किंवा शोलोखोव यांची ' अँड क्वाएट फ्लोज् दि डॉन ' ही कादंबरी...... यांतल्या कोणत्या तरी एका पुस्तकाचा विवेचक परिचय तुम्ही करून देऊ शकाल. एखाद्यानं मॉमच्या कादंबऱ्यांवर किंवा शोलोखोवच्या कथाकादंबऱ्यांवर लेख लिहिण्याचा प्रयत्न करून पाहवा. हे लेखक मोठे का ठरले, त्यांचं साहित्य कशासाठी गौरवास्पद ठरलं, त्यांच्या विशिष्ट साहित्यकृती कोणत्या साहित्यगुणांमुळे मोठ्या झाल्या यांसारख्या प्रश्नांच्या अनुरोधानं हा प्रयत्न करावा. यासाठी रिचर्ड कॉर्डेल, आय. जी. लेझनेव यांसारख्या टीकाकारांच्या लेखनाचा मागोवा घ्यायला मुळीच हरकत नाही. मात्र त्यांचंच म्हणणं आपल्या भाषेत उतरवून काढू नये.

काही महिन्यांपूर्वी ' तू वेडा कुंभार ', ' बाधा ' या नाटकांचे चांगले प्रयोग झाले; ' हॅम्लेट ' ( रशियन ), ' फेस इन दि रेन ' यांसारखे उत्तम चित्रपट येऊन गेले; लक्ष्मीशंकर यांच्या गायनाचा व बिरजू महाराज यांच्या नृत्याचा असे काही बहारदार कार्यक्रम झाले. यांतला एखादा प्रयोग तुम्ही पाहिला असेल, एखादा चित्रपट बघितला असेल, एखाद्या कार्यक्रमाला तुम्ही गेला असाल. त्या प्रयोगाचं मार्मिक परीक्षण करण्याचा किंवा त्या चित्रपटाचं सुरेख समीक्षण करण्याचा किंवा त्या कार्यक्रमाचं जाणकारीनं रसग्रहण करण्याचा प्रयत्न तुम्ही का करून पहात नाही ? त्यात खंद्या टीकाकारांसारखं यश तुम्हांला कदाचित मिळणार नाही. पण म्हणून प्रयत्नच करू नये असं थोडंच आहे ! प्रयत्नाचं चांगलं फळ केव्हा ना केव्हा मिळाल्याशिवाय राहणार नाही. प्रयत्न करताना वाटलं तर ' मनोहर ', ' माणूस 'सारख्या नियतकालिकांतून येणारी ( दर्जेदार ) परीक्षणं-समीक्षणं-रसग्रहणं डोळ्यांपुढे ठेवावी.

आता थोडंसं ललितलेखांविषयी. तुम्ही सुट्टीत

प्रवासाला जात असाल, काही नमुनेदार माणसं तुम्हांला भेटत असतील, कधी टेकडीवर फेरफटका मारायला तुम्ही जात असाल, कधी रात्रीच्या वेळी रस्त्यावरून भटकत असाल. तुम्ही जर डोळसपणानं सगळीकडे हिंडलात, बारकाईनं अवतीभोवती पाहिलंत, येणाऱ्या अनुभवांवर काही स्वैर चिंतन केलंत तर तुम्हांला छानसं प्रवासचित्र रेखाटता येईल, व्यक्तिचित्र रंगवता येईल, ललितनिबंध लिहिता येईल. प्रदेशांकडे, निसर्गाकडे, वास्तूंकडे, व्यक्तींकडे कसं पहायचं, कोणत्या दिशेनं चिंतन करीत जायचं, वर्णनकौशल्य कसं कमवायचं, भाषेवर प्रभुत्व कसं मिळवायचं हे रा. भि. जोशी, अनंत काणेकर, गंगाधर गाडगीळ, पु. ल. देशपांडे, वि. द. घाटे, गो. वि. ( विंदा ) करंदीकर, दुर्गाबाई भागवत यांच्यासारख्या लेखकांच्या लेखनातून तुम्हांला शिकता येईल.

काय लिहायचं, कसं लिहायचं या प्रश्नांविषयी जे सांगितलं आहे त्यावरून तुम्हांला थोडा तरी बोध होईल असं वाटतं. काही उपयुक्त साह्यक पुस्तकांची सूची पुढे दिली आहे. सुट्टीत ती ( व त्यांसारखी मिळतील ती चांगली ) पुस्तके मनःपूर्वक व लक्षपूर्वक वाचा : साहित्याकडे, जीवनाकडे कसं पहायचं, त्यावर विचार कसा करायचा, त्याचं समीक्षण वा चित्रण कसं करायचं, त्यासाठी आवश्यक ती भाषा कशी हस्तगत करायची-घडवायची, इत्यादी गोष्टी त्यांतून शिका; आणि मग स्वतंत्रपणे पहाण्याचा, विचार करण्याचा व लिहिण्याचा प्रयत्न करा. अभ्यास व प्रयत्न यांच्यायोगे हळूहळू भरघोस यश तुम्हांला नक्की मिळेल. मग तुमचं साहित्य ' परशुरामीय ' चेच काय, पण ' वसंत ', ' सत्यकथा ' यांसारख्या मोठ्या मासिकांचे संपादकसुद्धा आनंदानं स्वीकारतील !

* * *

**सूची :** ( पुढील पुस्तके सुट्टीत ग्रंथालयात वाचण्यासाठी दिली जातील. )

१. केशवसुत – प्रा. रा. श्री. जोग.
२. ' समग्र केशवसुत ' – प्रा. भ. श्री. पंडित.
३. वादसंवाद–प्रा. श्री. के. क्षीरसागर. ( केशवसुतांवरील लेखासाठी )
४. खडक आणि पाणी – प्रा. गंगाधर गाडगीळ. ( केशवसुतांवरील लेखासाठी )
५. S. Maugham : A Biographincal And Critical study – Richard Cordell.
६. S. Maugham – John Brophy.
७. रंग आणि रेषा, रंग आणि गंध – श्री. वि. स. खांडेकर.
८. मनोहरची आकाशवाणी, मुजरे– प्रा. ना. सी. फडके.
९. चतुरंगरेखा – श्री. गोपालकृष्ण भोबे.
१०. रियाझ-श्री. मधुकर मंगरूळकर.
११. मजल दरमजल – प्रा. रा. भि. जोशी.
१२. सोनेरी उन्हात पाचूची बेटं – प्रा. अनंत काणेकर.
१३. साता समुद्रांपलीकडे – प्रा. गंगाधर गाडगीळ.
१४. अपूर्वाई – श्री. पु. ल. देशपांडे.
१५. व्यक्ती आणि वल्ली – श्री. पु. ल. देशपांडे.
१६. पांढरे केस, हिरवी मनं – श्री. वि. द. घाटे.
१७. स्पर्शाची पालवी – प्रा. विंदा करंदीकर
१८. आकाशाचा अर्थ – प्रा. विंदा करंदीकर.
१९. ऋतुचक्र – दुर्गाबाई भागवत.
२०. भावमुद्रा – दुर्गाबाई भागवत.





• सा त

• क वि ता

## क क्षा

तुझ्यासाठी सारा
रातचा जागर
जगाचा विसर तुझ्यापायी.

जागल्या लोचनी
दाटती ओघळ
स्मृतीचे मोहळ उठू पाहे.

स्वप्नील दिसांचा
नकोचि आठव
सुकलेले भाव सलतात.

शल्ये साहूनीहि
तुझीच प्रतीक्षा
कधी तरी कक्षा मिटतील !

△ **अशोक पटवर्धन**
तृतीय वर्ष साहित्य ●

## थेंब

कुणा खुणाविसि सान पाखरा
बोलविसी का उगा पुन्हा
मिटून घे रे चोच आपुली
नको चेतवू मुक्या मना
तुझ्या गीतिचे शब्दच सुकता
कवितेनेही जावे थकुनी
मिटल्या ओठी, फक्त झरावा
अनुभूतीचा थेंब मनी !

△ **जयश्री नरगुंदकर**
द्वितीय वर्ष साहित्य ●

# ही सात शल्ये

वेगाने फुलपाखरे उडति ही, पाणी नदीला कमी,
गोट्या होत महाग, चेंडु पळवी भय्या शिव्या देऊनी ।
काचा त्या खिडक्यांस, रक्षक उभा सर्वत्र आंब्यातळी,
काठी झाकुनही लगेच दिसते; ही सात शल्ये मनी ॥

रात्रीही पथि तो प्रकाश असणे, आरक्षके हिंडणे,
दारे, भिंत्ति कठीण, त्यात तुटती माझी हत्यारे जुनी ।
देवे निर्मियला ध्वनी नि दिधली दृष्टी मनुष्यास ही,
सायासेहि कुठे ' नया ' न गवसे; ही सात शल्ये मनी ॥

आहे बॅट निरुंद, रुंद पण ती उत्तुंग स्टंपत्रयी,
वेगाने क्षणि चेंडु हा उडतसे, स्टंपी बसे गुंतुनी ।
धावे वायुबलेच फील्डर, मला धापा सदा लागती,
हाता उंचवुनीच पंच वदतो; ही सात शल्ये मनी ॥

काव्यामाजिहि ' अर्थ ' लोक बघती, 'अर्थस्थिती ' खालवे,
दाढीवीण कवी नवा न गमतो, दारू मिळे मोजुनी ।
नाही शिल्लक आगळा विषयही, 'ते चौर्य' लोका कळे,
कोणी ' हा कवडा ' म्हणून हसती, ही सात शल्ये मनी ॥

वाढे भाव मतास, भानगड ' ती ' आताचि लोका दिसे,
पैसा संपतसे, प्रचारक करी संपास लोभावुनी ।
टोमॅटो कुजकेच फार पिकती, माझ्या सभा निर्जन,
मोठी खोट अनामतीत बसते, ही सात शल्ये मनी ॥

' कॉपीकार्य ' परीक्षका न रुचते, येते परीक्षा सदा,
होणे पास जरूर, प्रश्न निवती गाईड ना पाहुनी ।
शाळा एकच वाजता न सुटते, रोजी हजेरी असे,
जाई पुस्तकही घरी ' प्रगति 'चे ही, सात शल्ये मनी ॥

धक्का देइ दुचाकि, मोटर खडी अंगावरी काढते,
डोळे वीज मिटे सदैव सहसा, पाणी बसे आटुनी ।
लाभे खोपटही न, ' लग्नऋतु ' ते जीवावर बेतती,
लोकी 'सौख्य पुण्यात' हेचि म्हणणे, ही सात शल्ये मनी ॥

△ अविनाश साठये
द्वितीय वर्ष शास्त्र ●

# चंदन वृक्ष

अशाश्वताच्या पानावरूनी
गंध हुंगितो शाश्वततेचा
त्या गंधाचे फूल दिसेना
त्यास शोधणे ध्यास जिवाचा

पुष्पहीन या झाडावरचे
पान पान अन् गंधित झाले
तुमजे कोठुन गंध येतसे
शोधायाचे वेड लागले

अनेक पाने गळून पडली
त्यांच्या जागी दुसरी पाने
गंध परी तो तसाच राहे
करीत गंधित दुसरी पाने

असे असावे असे वाटते,
मोठा चंदन–वृक्ष असावा,
खरे काय ते कोणा उमजे ?
पानांनी नित तर्क करावा !

△ अविनाश चाफेकर
द्वितीय वर्ष साहित्य ●

# माड

अस्मानाच्या निळ्या छतावरि
उभा ठाकला माड समोर
दूर झोपडी आणि बंगला
या दोहोंतिल मोजी अंतर !

△ ' मी '
पदवीपूर्व शास्त्र ●

## हे मृत्यो !

हे मृत्यो, तू अटळ आहेस,
जन्मापासूनच माणसाभोवती तुझ्या घिरट्या चालू
असतात
पण —
अशा अवेळी तू झडप का घालावीस ?
का असा दावा साधावास ?
हे मृत्यो, तू...तू भित्रा आहेस,
तू भ्याड आहेस,
मांजराच्या चोरपावलानं येऊन,
बेसावध असातानाच, पाठीमागून वार करण्याचा तुझा
धर्म !
तू विघ्नसंतोषी आहेस,
पण तरीसुद्धा,
का असा दावा साधावास ?
का असा घात करावास ?
समोर उभा राह्यला असतास—
तर आमच्या 'लाल'नं तुझं आव्हान हसतमुखानंच
स्वीकारलं असतं
अरे !
तो भारताचा 'सरताज' आहे,
तो आघाडीवरचा 'बहादूर' आहे !
आघाडीवर ज्यानं तोफा डागल्या —
— त्याच्या मनासारख्या विशाल गगनातून
मुक्त संचारासाठी
त्यानंच ना लालरूसवरून शांतीचं शुभ्र कबुतर सोडलं ?
आणि —
त्या प्रामाणिकतेशी, मानवतेशी तू दगाबाजी करावीस ?
धिःकार धिःकार असो तुझा !
मृत्यो ! तू दुष्ट आहेस,
त्या रात्री चांदण्यात नहात असलेली
भरतभूमी तुझ्याच्यानं पाहवली नाही,
की,
नव्या वर्षाचे संदेश, सोनेरी किरणं
घेऊन येणारा आमचा 'लाल' तुला बघवला नाही ?
मातृभूमीपासून दूर दूर असताना तिथं, त्याला
त्याच्या परमदैवताचं दर्शनसुद्धा मिळालं नाही.
का असा दावा साधलास ?
अरे !
निदान त्याला मातृभूमीची माती तरी पाहू द्यायचीस ?
आज तो हवा होता...
अठरा महिन्यांच्या काळात अठरा अध्यायी
गीता ज्यानं काळाच्या फलकावर कोरली,
तो आज हवा होता...
तो आज हवा होता

△ **शशिकांत पटवर्धन**
पदवीपूर्व साहित्य ●

## आ ठ व ण

हृदयाच्या जखमेवरील
आठवणींची खपली
काढू नकोस !
आठवणींच्या सुखावरील
समाधानाची सावली
चोरू नकोस !

△ **अनिल किणीकर**
तृतीय वर्ष साहित्य ●



'परशुरामीय' संपादक मंडळ



'एस्. पी. रिव्ह्यू' संपादक मंडळ



जिमखाना मॅनेजिंग कमिटी



# हिंदी विभाग

## दिल और आँखें

पहलेसेही बैरन हैं ये आँख और दिल अपने
ना इनकी है बात बनी कब, हरदम हैं बेगाने ॥

इक दीवाना राहपे आके नैन मिलाकर चला गया
ना आँखोंपे गुजर गयी, पर दिल भोला-सा खो गया
हो गया मजबूर वह बेचारा, धीरज अपना बँधाने ॥ १ ॥

आँखें बोली " भोले दिल तू, मंज़िलका ना तुझे पता "
दिलने कहा, "हम लुट गये तेरे कारण पर ना तुझे ख़ता"
तूने मिलाया मुझे किसीसे अब क्यों न हम दीवाने ॥ २ ॥

दिलने था चाहा भेद छुपाना अपनी तरफसे खूब भला
पर आँखोंने, दुश्मन दिलके, राज़को उसके किया खुला
दिल कहता है, बैरन आँखियाँ, ठहरीं मुझे सताने ॥ ३ ॥

पर हमने है जाना इतना, है इनमें यदि झगड़ा
है इन दोनोंके ही कारण, प्यारका नाम जहाँमें बड़ा
खुदा करे, हो ताल्लुक इनमें, प्यारकी जवाँ दुनिया बसाने
॥ ४ ॥

△ इंद्रायणी गाडगीळ
प्रथम वर्ष साहित्य ●

## कुछ शेर

१. लगता था यह देख रही है मेरी निगाहोंमें
हाय ! उन्हें थी पसंद मेरी कमीज ! धुली हुई 'सर्फ'में !

२. ली हाथमें लेखनी पड गये साहित्यके पीछे
बादमें समझ गये कि कोरे पृष्ठही लग रहे थे अच्छे !

३. चाहते थे जानना इश्ककी हकीकत, थी शायद
चेतावनी जवानीकी
न पाया इश्क, न समझी हकीकत, खो बैठे
जवानी भी !

४. सामनेसे जब गुजरती, तो गिरा देती थीं पलकें
लगता था जमीं देख रही है, वह शरमाके
मगर हाय ! एक दिन उन्होंने तिरछी नजरसे देखा
उनके नैनोंका कानापन लग रहा था बहुतही फीका !

△ शशिकला डिंगणकर
तृतीय वर्ष साहित्य ●

LEARN

The Banking Habit With :

# THE BANK OF MAHARASHTRA LTD

*Your Bank with the Personal Touch*
*At your service, for years to come.*

**C. V. Joag**
General Manager.

## अपूर्व संयोग

चार वर्ष बीत गये, अब है वियोग
आखिर मानव जीवन है भी क्या ?
चिर वियोग ! चिर वियोग ! !
आज स्कूलसे विदा, कल कॉलेजसे विदा
कभी अचेतनसे, कभी सचेतनसे
जीवन भर विदा ही विदा !
और आखिर !
एक दिन...एक दिन जीवनसे विदा !
आखिर मानव जीवन है भी क्या ?
चिर वियोग ! चिर वियोग ! !
हर एक क्षणसे लेते हैं विदा
हर एक क्षण होता है जुदा
होती है चाह कि रुक जाऊँ क्षणभर
लेकिन ?...लेकिन...
नामंजूर है रुकना, नामंजूर है थकना
हरदम चलना यही है जीना !
आखिर मानव जीवन भी क्या ?
चिर वियोग ! चिर वियोग ! !
लेकिन !...लेकिन नहीं !
क्योंकि,
इन्हीं नश्वर क्षणोंको बनाती है चिरंतन
मानव की प्रतिभा, जो है नित्य नव नूतन
बाँध देती है क्षणोंको अनुभूतिके साथ
और लेते हैं वे क्षण अमरत्वकी साँस
मानव जीवन नहीं है वियोग
नश्वर–शाश्वतका यह अपूर्व संयोग

△ शशिकला डिंगणकर
तृतीय वर्ष साहित्य ●



**नीलादेवी दुबे**, तृतीयवर्ष साहित्य

# स्वर्गमें अकाल

इंद्रदेव के महलमें टेलिफोन की घंटी बजी। इंद्रदेव सुखनिद्रासे जाग गये। सबेरे चाय पीते पीते 'स्वर्ग-सत्ता', 'स्वर्गशक्ति' आदि बर्तमानपत्र वे पढ रहे थे। एक अप्सराके नृत्यके छायाचित्र और वृत्तान्त पढनेमें वे मग्न हो गये थे। इतनेमें टेलिफोनकी घंटी बजी। देवदूतने टेलिफोन उठाया और इंद्रदेव से कहा "महाराज, देवसभाकी मुख्य कचहरीका फोन है।" इंद्रने संत्रस्त भावसे फोन लिया और कहा "कौन है?" "मैं हूँ नारद"। स्वर्गके मंत्री-मंडलमें नारद नभोवाणी और वार्ताहरके मंत्री थे। इंद्रदेवने कहा, "क्या है?" "बडी चिंतायुक्त खबर है, आपके विरुद्ध अविश्वासका प्रस्ताव पेश करनेवाले हैं।"

यह वार्ता सुनकर इंद्रदेव भौंचक्के रह गये। क्योंकि स्वर्गमें अपनी सत्ता अनादि कालतक रहनेवाली है, यह जो उनका विश्वास था, वह चूर चूर हो गया। वे बोल उठे "फौरन यहाँ चले आओ।" थोडी ही देरमें हाथमें वीणा लिये हुऐ नारद वहाँ आये। वे गुस्सेसे लाल-पीले हो गये थे। आते ही बोले "मैंने आपसे पहले ही कहा था कि पृथ्वीपर जो पार्लमेंट और इलेक्शन है वह स्वर्गमें न लाइए। आपने मेरी बात नहीं मानी। अब अविश्वासका प्रस्ताव पास हुआ तो बैठो हाथपर हाथ धरें।"

बात कुछ ऐसी थी कि एक दिन इंद्रने नारदसे कहा था, इस स्वर्गलोकमें बिना कामके भटकना और अमृत पीकर अप्सराओंका वही नृत्य हमेशा देखना, इन सब बातोंसे मैं तंग आ गया हूँ। अब हम सैर करके आएँगे।" उस समय नारदमुनिने अपनी बात इंद्रके गलेमें उतरवाई थी कि वे पृथ्वीपर एक बार हो आएँगे।

पृथ्वीपर जो राज्यकारोबार की पद्धति थी वह इंद्रको बेहद पसंद आई और वे कहने लगे, "अरे वाह! यह लोकतंत्र-प्रणाली मुझे बहुत पसंद है, इलेक्शन, प्रचार, प्रस्ताव, ये सभी प्रकार बहुत मनोरंजक हैं। ऐसी पद्धति स्वर्गमें अवश्य लानी चाहिए। उसके बिना मजा नहीं।"

नारदने इस अविचारसे इंद्रको परावृत्त करनेका बहुत प्रयत्न किया, परंतु वे टससे मस नहीं हुए। उन्होंने अपनी अलकापुरीमें प्रजासत्ताक राज्यकी घोषणा की। उम्मीदवारोंका चुनाव, प्रचार की तैयारी की गई और अंतमें इंद्रने इलेक्शन जीत ली। इंद्रदेवने अपने मंत्री-मंडलकी स्थापना की। अर्थमंत्री और रसद मंत्री के स्थानपर कुबेरजीको नियुक्त किया गया। वरुण कृषि-मंत्री हो गये। धन्वंतरी अश्विनीकुमार आरोग्य-मंत्री और अन्न-मंत्रीपद पर अन्नपूर्णा को नियुक्त किया गया। परलोकसंबंध और संरक्षण विभाग पंतप्रधान इंद्रदेवने अपने हाथमें ले लिया। नारदजी अर्थात्‌ही नभोवाणी और वृत्तप्रसार मंत्री तथा राष्ट्राध्यक्षके स्थानपर विष्णुजीको नियुक्त किया गया। ये सभी अपने अपने क्षेत्रमें तज्ज्ञ, सर्वश्रेष्ठ व्यक्ति थे; अतः सभी क्षेत्रका कारोबार सुव्यवस्थित, रीतिसे चल रहा होगा, और स्वर्गमें सभी सुखी हैं ऐसी इंद्रकी कल्पना थी। परंतु अचानक नारद उनके सामने उपस्थित हुआ।

इंद्रने तीखी निगाहसे नारदकी ओर देखा और पूछा,— "अविश्वासका कारण?" "अनाज का अकाल"— इति नारद "क्या कहा, अनाज नहीं मिलता? तो देवता क्या खाते हैं?" "बात कुछ ऐसी है कि आज तक परिस्थिति ठीक थी। लेकिन दिन-ब-दिन देवताओंकी संख्या बढने लगी है। और पृथ्वीके असंख्य लोग स्वर्गमें आ रहे हैं। आपने अमृतपर भी निर्बंध नहीं डाला। और स्वर्गमें लोकतंत्र-प्रणाली जबसे शुरू हुई है तब से आपने देवताओंको चमत्कारोंसे अनाज निर्माण करनेकी मनाही की है इसलिए अनाज कम पड गया।"

नारदमुनिकी ये बातें सुनकर इंद्रदेवकी आँखोंके सामने अंधेरा छा गया। उन्होंने नारदसे पूछा— "फिर ऐसे समय पृथ्वीपर लोग क्या करते हैं?"

नारदमुनिने तत्परतासे जवाब दिया "वहाँ दूसरे राष्ट्रकी मदद ली जाती है। और बहुत शोर हुआ तो गोलीबार किया जाता है। लेकिन हम क्या करें? गोलीबार

करके कुछ फायदा नहीं; क्योंकि देवता-लोग अमृत पी-पीकर अमर बन गये हैं ।" नारदकी ये बातें सुनकर इंद्रदेव काँप उठे । उन्होंने फौरन मंत्रीमंडलकी बैठक बुलवानेके लिये नारदसे कहा ।

सभी मंत्रीमहोदयके आनेपर इंद्रने गंभीर वाणीसे भाषण शुरू किया– "सहयोगियो ! स्वर्गमें अनाज मिलना कितना मुश्किल हो गया है यह बात आप अच्छी तरह जानते हैं । पृथ्वीपर भी अनाज नहीं मिलता, इसीलिये वे देवताओंको भोग नहीं चढाते । और पृथ्वीके बहुसंख्य लोग स्वर्गमें आ रहे हैं । अतः इस प्रश्नपर हमें जल्दीसे निर्णय लेना होगा ।" इंद्रदेवकी बातें सुनकर कुबेरजी बोले,——

"सर्वप्रथम जनताको धीरज देना होगा, कि यह समस्या हम हल कर रहे हैं अतः चिंताकी कोई बात नहीं । अपनी कार्रवाइयोंका बहुत प्रचार करना आवश्यक है ।" सहसा इंद्रदेवने कुबेर से पूछा,— "हमारे यहाँ गोदाममें फिलहाल कितना अनाज है ?" कुबेरजी अप्रसन्नतासे बोले "कुछ कल्पना नहीं सर, क्योंकि मैं आजकल नृत्यगायन आदि सांस्कृतिक कार्यक्रमोंमें अध्यक्ष-पदका स्थान भूषित कर रहा हूँ । बादमें सेक्रेटरीसे पूछ-ताछ करके बताऊँगा ।

कुबेरजी की तरह वरुण, नारद, शंकरजी आदि मंत्रीमहोदयोंने ऐसी ही ऊटपटांग बातें इंद्रसे कहीं । अंतमें इंद्रने देवताओंको आदेश दिया कि हर महीनेके तीन सप्ताह बिना भोजन और पानीके बिताया करो, उसके साथ ही एकादशी, संकष्टी आदि व्रतोंके बहाने बीच-बीचमें उपवास भी करने चाहिए ।

प्रचार शुरू हुआ । विरोधी पक्ष (असुर) भी अविश्वासका प्रस्ताव प्रस्तुत करनेके संबंधमें प्रचार करने लगे । अखबारोंमें रसद मंत्रीजीके व्यंग्यचित्र आने लगे, जिनके नीचे "अनाज-समस्या दूर करनेके विचारमें रसद मंत्री गढ गये हैं ।" जैसे स्पष्टीकरण लिखे जाते थे। रेडिओपर मंत्रीजी लंबे लंबे भाषण देने लगे । इस प्रसंगपर नाटक भी खेला गया, जिसका नाम था "उपवासकी विभीषिका" । परंतु नाटकका एक भी टिकट नहीं बेचा गया और नाटकोंके पात्रोंको और व्यवस्थापकोंको उपवास करना पडा । सरकार द्वारा छः महीने उपवास करनेवालोंको 'उपवास रत्न', 'उपवास पंडित' आदि उपाधियाँ जाहीर की गईं। अनाजकी रसद सरकारको देनेवाले व्यापारी देवताओंको 'व्यापार भूषण' और किसानोंको 'कृषिरत्न' आदि उपाधियाँ जाहीर की गईं । लेकिन खुद देवता–लोग इस समस्यासे तंग आ गये थे, और आपसमें असंतोष की मात्रा भी दिन–ब–दिन बढने लगी थी । अतः सरकारका प्रचार फीका पड गया और विरोधी असुर पक्ष प्रबल होने लगा ।

एक दिन अखबारमें एक सनसनाटी वार्ता प्रसिद्ध हुई जिसका आशय यह था:– गृहमंत्री शंकर व्याख्यान देने गये थे । श्रोता कम थे, परंतु शंकरजीके माथेसे बहनेवाली गंगाका जल भरनेके लिये पार्वती, रुक्मिणी, आदि देवस्त्रियाँ और रंभा, मेनका आदि अप्सरायें हाथमें कलश लेकर एक लंबी कतार बनाये खडी थीं । गृहमंत्रीजी भाषण दे रहे थे और पीछे सब स्त्रियाँ पानी भर रहीं थीं । उनका भाषण खत्म हुआ लेकिन इनका पानी भरना अभी बाकी था । इसीलिये सभाके अध्यक्ष महोदयने शंकरजीसे प्रार्थना की कि इन स्त्रियोंको पानी भरना है अतः आप और थोडी देरके लिए अपना भाषण चालू रखें । गृहमंत्री मिस्टर शंकरजी यह सुनकर आगबबुला हो गये, उन्होंने सभाका त्याग किया और फलतः स्वर्गमें जगह–जगह दंगे–फसाद मच गये ।

मंत्री–मंडल का अधिवेशन फिरसे शुरू हुआ । एक सभासद ने कहा "जब अनाज के गोदाम लूटनेका प्रयत्न किया गया, उस समय पुलिसने देवताओंको बुरी तरह मारपीट की । गृहमंत्री शंकरजी के पास सब लोगोंने शिकायत की थी लेकिन उन्होंने उसपर तनिक भी ध्यान नहीं दिया ।" विरोधी पक्षके एक असुर सभासदने जोरसे चिल्लाकर पूछा—"उस वक्त शंकरजी क्या भाँग पी रहे थे ?" यह सुनकर शंकरजीने अपना तृतीय नेत्र खोलकर उस सभासदको वहीं भस्म कर दिया ।

इस अनपेक्षित घटनासे सभा का वातावरण और क्षुब्ध हो गया । इस अवस्थामें अगर मतदान लिया गया तो मंत्री-मंडल का पराभव निश्चित होगा, यह बात इंद्रको अच्छी तरह मालूम थी, इसीलिये देवता–सभाका अधिवेशन अनिश्चित तारीखतक स्थगित करनेकी सलाह उन्होंने स्पीकर बृहस्पतिको दी । इस समय तक देवताओंने टेबल फेंक दिये थे, कुर्सियोंको बिखेरकर एक दूसरेपर फेंकनेका उपक्रम आरंभ किया था । स्पीकर बृहस्पतिसे किसीने मायक्रोफोन छीन लिया था । अंतमें मार्शलकी मददसे सभागृह बरखास्त किया गया ।

दूसरे ही दिन राष्ट्राध्यक्ष विष्णुजीने लोकतंत्र–प्रणाली को तिलांजली दी। और स्वर्गका कारोबार पहले जैसा चलानेकी आज्ञा की। यह वार्ता जब शंकरजीने सुनी तब मुस्कराहटसे उनके होंठ खिल पडे, अत्यानंदसे अमृत प्राशन करके वे पर्वत की ओर चल पडे। नारदमुनि 'नारायण' 'नारायण' करते हुए कोई नई बात सोचनेमें—फिरसे मग्न हो गये। और इंद्रदेव?...वे फिरसे अमृत पीकर अप्सराओंका वही नृत्य देखते देखते निराशाके भँवरमें डूब गये।

[श्री. रमेश मंत्रीजीके एक लेखपर आधारित]



**शीला बिजलानी** तृतीय वर्ष साहित्य

# शौक अपने अपने

देखा गया है, हर आदमी को किसी न किसी प्रकारका शौक होता है *जिसे अंग्रेजीमें* Hobby *या* Fad कहते हैं। अपने शौक पूरे करनेके लिए लोग उसके पीछे दीवाने बने रहते हैं। चाहे लोग भलेही पागल कहें फिर भी वे अपने पागल पनमें एक संतोष महसूस करते हैं।

अपने दिल–बहलावके लिए कोई टिकट, सिक्के, मशहूर कलाकारों या नेताओंके दस्तखत 'Autograph' इकट्ठे करते हैं तो कुछ लोगोंको जानवर पालनेमें मजा आता है। कई लोग सफर करनेमें बेहद खुशी पाते हैं तो कोई एकही जगह बैठे बैठे घंटों किताब लिए पढते हैं। मेरे भाई को तो विदेशियों से पत्रव्यवहार करके नये नये दोस्त, सहेलियाँ बनाने का शौक रहा है, लेकिन न जाने इन अजनबियोंकी दोस्ती कहाँतक सफल रहेगी। मतलब यह है कि तरह–तरह के लोगोंको तरह तरह की चीजोंमें आनंद नजर आता है। जैसे कहा गया है 'जितने मुँह उतनी बातें' उसी प्रकार यह भी सही है कि 'जितने लोग उतने शौक'।

मुझे भी एक शौक है। लेकिन बात यह है कि आप इसे शौक मानेंगेभी या नहीं। आप जो चाहें सो मान लीजिए मेरा तो यह शौक है— "खुशियाँ बाँटनेका, दूसरोंके दिलको खुशी देनेका। अब आप शायद चौंक जायँ और कहें– "यह भी कैसा अजीब शौक है!" जो कुछ भी हो, मुझे तो सारे जीवन का सार इसीमें नजर आता है। दंड किसी भूखे गरीब भिखमंगेको दस नये पैसे देकर जितनी खुशी मुझे हासिल होती है उतनी सौ रुपये पाकर भी नहीं होती। मुझे यकीन हो गया है कि *असली सुख अपनी खुशियाँ दूसरोंको देनेसे मिलता है* दूसरोंकी खुशियाँ छीननेसे नहीं।

किसीने सच फरमाया है—

"ले ले दर्द पराया, कर दे दूर गमका साया,
तेरी खुशी तुझको मिलही जाएगी,।
जिया अपने खातिर तो वह क्या जिया।
किया खुद को खुश तो अरे क्या किया।
तू बहार बन जा सारी दुनिया पे छा
तेरी कश्ती भी किनारे लगही जाएगी।
तू दुनियामें अपना निशाँ छोड जा।
रहे याद, वह दास्ताँ छोड जा।
जो हैं दर्दके मारे
बन जा उसके सहारे
तुझे तेरी मंजिल मिल ही जायेगी॥"

इस शौकके सिलसिलेमें मुझे अक्सर अपनी तमन्नाओंका त्याग भी करना पडता है, किन्तु उस त्यागसे आनेवाले आनंद को देखते हुए मैं तनिक भी नहीं झिझकती। त्याग का अन्य शब्दोंमें मतलब होता है, 'खुदसे ज्यादा दूसरोंसे प्रेम करना' बस यही मेरा शौक है। इस बात को आप जरा गौरसे सोच कर देखिए कि हम कितनी छोटी छोटी बातोंसे दूसरोंका दिल तोड देते हैं।

रास्तेपर कितने नंगेबदन भूखे बच्चे बडी आशा लेकर सिर्फ एक सिक्केकी याचना करते हैं लेकिन ज्यादहतर लोग उन्हें डाँटकर, आँखें दिखाकर भगा देते हैं जैसे उन्होंने कोई चोरी की हो या कोई पाप किया हो।

ऐसे मौकेका मैं प्रायः फायदा उठाती हूँ। परसों यूँ हुआ कि मैं कॉलेजसे घर लौट रही थी, स्टापपर बसकी राह देख रही थी कि एक बच्चेने इस तरह गिड-गिडाकर आके कहा कि मुझसे देखा न गया, मैंने एक बार उस साँवले दुबले बच्चेको स्नेह, सहानुभूति से देखा और बगैर ज्यादा सोचे दस पैसे दे दिये। दुर्भाग्य-वश यह मेरे केवल बचे हुए दस पैसे थे अतः मैं स्टाप छोडकर चल पडी। वह लडका इस तरह देख रहा था मानो पूछ रहा था-- "मैं आपका किस तरह शुक्रिया अदा करूँ?"

दस साल पहलेकी बात है। हमारे पडोसमें एक नन्ही सी प्यारी छः वर्षकी लडकी हमारे घर खेलने आया करती थी। एक दिन मैं बडी उमंगोंसे एक नाय-लॉन की तितली (ब्रोच) खरीद लायी उसे जब वह दिखाई तो वह उसपर लट्टू हो गई, घबराती-घबराती बोली, "दीदी यह मुझे देंगी?" मैं जरा सोच में पड गई, क्या इसे इतनी महँगी, शौक से खरीदी हुई चीज दे दूँ? अगर दे दूँ तो एक दिन खेलकर यह कहीं खो बैठेगी।

मैंने देखा वह अबतक मेरे उत्तरके, या यूँ कहें कि तितलीके इंतजार में आस लगाये निहार रही थी। फिर मैंने धीरेसे उसे अपनी बाँहोंमें खींच लिया और वह तितली उसके फ्रॉकपर चिपका दी। फिर वह मेरी आँखोंमें और मैं उसकी आँखोंमें हँस-हँसकर देखती रहीं। उसके बाद हम वहाँसे जगह छोडकर चले गये। कुछ दिन ही पहले अचानक वह अपनी माँके साथ आती दिखायी दी, " मैंने पूछा "क्यों रीटा मुझे पहचानती हो?" आप कल्पना कर सकते हैं, उसने क्या जवाब दिया होगा! जवाब था "Of course, (क्यों नहीं), मेरे पास अब भी आपकी तितली रखी है।"

मेरे आश्चर्य और खुशीका ठिकाना ही न रहा।

विशेषकर मुझे नन्हें नन्हें बच्चोंको खुश रखनेका ज्यादा शौक है। उन्हें खुश करनेके लिए सिर्फ एक प्यारभरी नजर और मुस्कान काफी होती है, उनकी कली खिलनेमें क्या वक्त लगेगा। फिर भी मैं फुरसतके समय यह सोचती रहती हूँ कि उन्हें किस तरह अपनाऊँ। इसलिए छोटी-छोटी कहानियाँ, बिनाका टूथ पेस्ट के लॉकेट लैंडस्केप, चित्र, डाकटिकट, रंगबिरंगे चमकीले कागज आटोग्राफ आदि का मुझे ज्यादा शौक न होते हुए भी उनके लिये संग्रह करती हूँ और मौका पाकर बाँट देती हूँ, बस यह कहिये कि दूसरोंका शौक पूरा करनाही मेरा शौक है।

छुट्टी के दिन मेरा दोस्तो और सहेलियोंके साथ चित्रपट देखनेका प्रोग्राम नहीं होता। शायद मेरी छुट्टी का एक एक दिन मेरे छोटे दोस्त और सहेलियाँ गिनते रहते हैं। सुबह होते ही हर एक अपनी अपनी फर-माइश लेकर चले आता है, "दीदी मुझे स्टँपस् दो, चित्र निकालनेमें मेरी सहायता करो, मैं यह हिसाब नहीं हल कर सकती, आँटी हमें कहानी सुनाओ" आदि। ज्यादहतर लोग जिसे परेशानी कहते हैं, उसीसे मेरा दिल बहल जाता है।

आदमी जब यह महसूस करता है कि उसे कोई चाहता है, या आदमी जब खुद किसीको चाहने लगता है तो आप जानते हैं उसकी खुशीकी सीमा कहाँ होती है? मैं जानती हूँ, इसलिए मेरी हमेशा यही कोशिश रहती है कि हर सामने वाले व्यक्तिको मुझसे कुछ संतोष प्राप्त हो।

आज यह देखा जाता है कि लोग ऊँचे लोगोंको गिरानेमें, गिरे हुओंको ठुकराने और पत्थर मारनेमें विजय मानते हैं, यहाँ तक कि अपने घरोंमें अगर कोई लाचार बूढी दादी या नानी हो तो सारा दिन उसे छेडने और हँसी उडानेमें छोटे बेटे–बेटियाँ जीत सम-झती हैं। ऐसे समयमें मुझे ऐसा खयाल आता है क्यों न उनसे प्यारसे बातें करें, उन्हें कोई अच्छी किताब सुनाएँ, उनके रंगीन दिनोंकी बातें पूछें और यह न महसूस होने दें कि वह दुनियामें सिर्फ अकेले हैं, बल्कि उनकेभी कोई साथी हैं, यह सोचकर मैं अपना थोडा समय इन बूढी जानों को मंदिर देवालय फिरानेमें भी बिताती हूँ।



# संस्कृत विभाग

## लुना–१

दृष्टा योजनराशिभिर्व्यवहितैः कालादनादेर्नरैः
स्पृष्टैकेन कुरङ्गकेण दधती कौमारभारं चिरम् ।
यान्ती कान्तविवर्जिता प्रतनुतां पुष्टापि दिव्यै रसैः
सासूया च कुलं घ्नती विरहिणामन्येषु सौम्या सती ॥
त्वं संप्रत्यनुकम्पिता शशिकले ! दैवेन दुश्चेतसा
सौभाग्यं समुपस्थितास्युपगतस्त्वामद्य दूतो नृणाम् ।
यस्त्वां प्राप्स्यति तु स्वयंवरवधूं तेनेतरे संगरं
कुर्युर्नः प्रलयंकरं, शिव हरे ! मा भूदयं संगमः ! ! ॥

**कण्टकार्जुनः**

## निराशस्य मनसः विलपितानि

मनोरथाय नाशंसे किं मनः खिद्यसे वृथा ।
*वारंवारं प्रयत्यापि वैफल्यं लभसेऽन्ततः ॥*
चरन् वै मधु विन्दति चर तस्मात् अखण्डितम् ।
परं त्विदं विजानीहि दैवं दद्यात् करं न ते ॥

यत्ने कृते न सिद्धिश्चेत् को दोषस्तत्र ते वद ।
विज्ञाय यत्नमातिष्ठ मा फलेषु रतिं कुरु ॥
आशा नाम मनुष्याणां काचिद् आश्चर्यशृङ्खला ।
जानन्त्येव न बद्धाहमनयास्मि निराशया ॥

**लीलावती वर्तक**
प्रथम वर्ष साहित्य

## छात्रगीता

कॅण्टीन्-सिने-प्रीतिकथाविहीनः
साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः
स्तुवन्तु कामं गुरवस्तमेव
छात्रास्तु तं प्राहुरतीव मूढम्

त्रयो विद्यार्थिनां मन्त्राः –
कॉपी क्लासश्च दीपिका
यस्तान्नानुसरत्यज्ञः
सोऽवश्यमयशोऽश्नुते

कल्पना : **अशराफ शेख**
प्रथम वर्ष साहित्य



**अशोक मोहोळ**
आंतरविद्यापीठ क्रिकेट



**तानाजी गाडे**
आंतरविद्यापीठ कबड्डी



**अशोक शिंदे**
आंतरविद्यापीठ कबड्डी



**नीला गोखले**
आंतरविद्यापीठ पोहोणे



**सुरेश नांगरे**
आंतरविद्यापीठ कबड्डी
संघनायक
आंतरविद्यापीठ कुस्ती



**प्रभाकर धुपकर**
आंतरविद्यापीठ खो खो



**शकुंतला घाटे**
आंतरविद्यापीठ पोहोणे



**मधू साळवी**
आंतरविद्यापीठ क्रिकेट



**रजनी चापेकर**
थाळीफेक उच्चांक



**ठकसेन बानखेले**
आंतरमहाविद्यालयीन कुस्ती



**राजू लोखंडे**
विद्यापीठ व रणजी ट्रॉफी
क्रिकेट



**सतीश नातू**
आंतरविद्यापीठ खो खो



**सूर्यकांत भोतलिंग**
पुणे विद्यापीठ हॉकी



**प. स. गोखले**
आंतरविद्यापीठ बास्केट बॉल



**दिलीप आगटे**
आंतरविद्यापीठ बास्केट बॉल



**श्याम पुरोहित**
आंतरविद्यापीठ खो खो



**सुहास नेऊरगावकर**
आंतरविद्यापीठ पोहोणे
( विभागून )



**अरविंद मेहेंदळे**
आंतरविद्यापीठ क्रिकेट



जयश्री कानिटकर तृतीय वर्ष साहित्य

# हर्षाची नाटके : प्रियदर्शिका, रत्नावली, नागानंद

[ आपटे पारितोषिक मिळालेल्या निबंधाचा संक्षेप. ]

**प्रियदर्शिका** ही राजा उदयनाच्या एका प्रेमकथेवर आधारित नाटिका आहे. एक हलकीफुलकी खेळकर, बोलकी कथा हर्षाने या नाटकात रंगवली आहे. अवघ्या चार अंकांत कौशल्यपूर्ण रीतीने हर्षाने कथानकाचा विकास घडवला आहे.

या नाटकात एकातून एक अशा रीतीने निघणाऱ्या प्रसंगांच्या साखळीने वाचकाचे चित्त आकर्षून घेतले जाते. प्रयत्नपूर्वक प्रसंगांची मांडणी करून सुरुवात व अन्त यांचा सांधा हर्षाने सुंदर जुळवला आहे. त्यामुळे प्रत्येक प्रसंगात आपली उत्कंठा ताणून धरण्याचे विलक्षण सामर्थ्य आहे. तिसऱ्या अंकात निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीचे रेशमी धागे हर्षाने शेवटच्या अंकात हलक्या हाताने उकलले आहेत. अशा या कथानकाला त्यातील व्यक्तिरेखांमुळे अधिकच रंग भरलेला आहे.

यातील प्रमुख व्यक्तिरेखा राजा उदयनाची. भासाच्या गुणप्रेमी, छातीठोकपणे आह्वान स्वीकारणारा व नाइलाज म्हणून दुसरा विवाह करणारा अशा उदयनापेक्षा यातील उदयन भिन्न आहे. ह्यातील उदयन कलासक्त आहे. राणीवर त्याचे विलक्षण प्रेम आहे तरी तो भ्रमरवृत्तीचा आहे. तसाच तो ' दक्षिण ' नायक आहे. आपली चूक देवी वासवदत्तेच्या लक्षात आल्यावर तो तिच्या पायाही पडतो. त्यामुळे त्याचे एकंदर व्यक्तिमत्त्व पाहता भासाच्या उदयनापेक्षा तो खाली आल्यासारखा वाटतो. परंतु नाटकाचा एकंदर विषयच हलक्याफुलक्या रीतीने प्रेमकथा रंगविणे हा असल्याने, हे तितकेसे विसंगत वाटू नये. याउलट भासाचे कथानक वासवदत्तेभोवतीच गुंतलेले असल्याने त्यानुसार भासाने स्वभावपरिपोष केला आहे.

हर्षाने यात राजकारण हे पार्श्वभूमी म्हणून राबवले आहे. या नाटकात उदयन हा ' राजा 'ही वाटतो. मालविकाग्निमित्रातही राजकारण पार्श्वभूमिभूत आहे; पण अग्निमित्र हा तितका राजकारणी वाटत नाही. असा हा गुणज्ञ, मार्मिक व राजकारणी राजा हर्षाने रंगविला आहे.

दुसरी व्यक्तिरेखा प्रियदर्शिकेची. ही नृत्यगीतवादनकुशल आहे. ती अतिशय भित्री आहे व त्यामुळेच राजाची व तिची पहिली भेट घडू शकते. ती अभिजात आहे व अतिशय सुंदर आहे. अशी ही ' मुग्धा नायिका ' हर्षाने रंगवली आहे. हिची व्यक्तिरेखा अतिशय धूसर आहे.

तिसरी व्यक्तिरेखा वासवदत्तेची. ही भासाच्या वासवदत्तेपेक्षा कालिदासाच्या धारिणीशीच मिळतीजुळती आहे. अभिजात विनय, दीर्घरोषता व त्याबरोबरच अंतःकरणाची मृदू वृत्ती हे तिचे गुण प्रकर्षाने जाणवतात.

विदूषक हा यातील ' कामतन्त्रसचिव ' राजाची व आरण्यकेची पहिली भेट यानेच घडवून आणली. पण विदूषकात असलेल्या परंपरागत झोपाळूपणामुळे घडवून आणलेले कटही बिघडतात. प्रियदर्शिकेची सुटका तो अंगभूत चातुर्याने घडवून आणतो. मार्मिकता व मूर्खपणा यांचा विलक्षण संगम असलेला हा ' महाब्राह्मण ' आहे.

अशा व्यक्तिरेखांत काही व्यक्तिरेखा हर्षाने धूसर ठेवल्या आहेत. पण त्याही अशा कौशल्याने की त्यांवर काही आक्षेप येऊ शकत नाहीत.

या नाटकातील हर्षाचे विशेष कौशल्य दिसते ते ' गर्भनाटका 'च्या रचनेत. दासगुप्ता हे या संदर्भात लिहितात, ' The only original feature of the प्रियदर्शिका is the effective introduction of a play within a play as an integral part of the action; ......' ( History of Sanskrit Literature; Page 258.)

अशा तऱ्हेने गर्भनाटक ही हर्षाची स्वतःची निर्मिती असली तरी हर्षाने इतरांचेही ऋण त्यात घेतले आहे. विशेषतः कालिदासाचे ऋण तर वारंवार घेतलेले आढळते.

तरीही तांत्रिक दृष्ट्या निर्दोष रचना हे हर्षाचे खास

# शेवानी ग्रुप्स्

सेल !!! सेल !!! सेल !!!

बॉम्बे टाइप सेल

## साडी विभाग

कांजीवरम् प्लेन प्युअर सिल्क, ड्रेलॉन, टेट्रॉन ब्रोशो,
नॉयलॉन व जॉर्जेट प्लेन व प्रिंटेड, चिकनस्,
व भारतातील सुप्रसिद्ध मिल्स्च्या फुलवायल्स्.

**शेवानी अॅण्ड को.**

दी बँक ऑफ महाराष्ट्र रोडच्या समोरच्या रोडला
७७५/२ फडतरे चौक, पुणे २.

☎ ५४५५१

**ब्लाउज्पीस् विभाग**

मिल चिकन व्हाइट व रंगीत
प्युअर सिल्क, फुललोन २ × २
प्रिंटेड लोन, फुलवायल,
वायल चिकन, कटवर्क,
पॉपलिन लोन
१६७० कलर्समध्ये मॅचिंग
ब्लाउजपीस मिळतील.

शेवानी ग्रुप्स्

**जेण्टस विभाग**

टेरिलिन, टेरिकॉट, शर्टिंग,
कोटिंग, हरक, चीट,
प्रिंटेड लोन व ब्लाउज्पीसेस्
शेवानी क्लॉथ डेपो
कुंटे चौक,
लक्ष्मी रोड,
पुणे ... २.

टीप :— वरील शेवानी ग्रुप्स्च्या दुकानी मुंबई भावात माल विकला जातो.

कौशल्य आहे. पण कथानकाचा विकास करायला फारसा वाव नसल्यामुळे नाटकाच्या सौंदर्याला बांध पडला आहे. त्यामुळेच C. Kunhan Raja-ना शंका येते की हे हर्षाचेच नाटक आहे किंवा काय ? हर्षाचे खरे नाटक ' रत्नावली 'च.

**रत्नावली** हे हर्षाचे सर्वांत सुंदर नाटक. वत्सराज उदयनाच्या कथासरित्सागरातील प्रेमप्रकरणाच्या कथेचा आधार घेऊन हर्षाने रत्नावलीचे संविधानक रचले आहे.

या नाटकात हर्षाच्या प्रतिभेचा आगळा आविष्कार आपल्याला पहायला मिळतो. या नाटकाची शैली प्रसन्न आहे. हर्षाच्या परिपक्व लेखनाचे सौंदर्य यात फुललेले आढळते. यात व्यक्तिरेखांचे चित्रण अतिशय सूक्ष्म रीतीने केले आहे. निसर्गाचा एक अभिनव आविष्कार यात आढळतो. चित्ररेखी वर्णनांचा वेगळा नमुना यात आपल्याला पहायला मिळतो.

यातील नायक उदयनही प्रियदर्शिकेतील उदयनासारखाच आहे. तो गुणज्ञ आहे, रसिक आहे, दक्षिण आहे, त्याचबरोबर मधुकरवृत्तीचा आहे. यातील उदयन तसेच प्रियदर्शिकेतील उदयन हे दोघेही गुणवान आहेत, पण त्याचबरोबर ' वाग्विवीर ' आहेत. रागावलेल्या देवी वासवदत्तेचा अनुनय करायलाही हा मागेपुढे पाहत नाही. पण रत्नावलीतील उदयनाची कल्पनाशक्ती अधिक तरल आहे. अंतःपुराला आग लागल्याचे कळल्यावर त्याला राणी वासवदत्ता जळून जाणार अशी भीती वाटते, शेजारी राणी असूनही.

हा उदयन भासाच्या उदयनापेक्षा मालविकाग्निमित्रातील अग्निमित्राशी अधिक जुळता आहे. पण कालिदासाचा एक दोष हर्षाने टाळला आहे. व तो म्हणजे अग्निमित्राचा मुलगा रणांगणावर गेलेला असता तो आपली सून शोभेल अशा स्त्रीच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करीत असतो, तसा उदयन नाही. त्यामुळे त्याच्या व्यक्तिरेखेला कुठेही ढळ पोचत नाही.

या नाटकाची नायिका रत्नावली. ती ' मुग्धा नायिका ' आहे. तिच्या स्वभावातील सूक्ष्म मर्मे यात दाखवली आहेत. ती ' अतिकोपना ' आहे. शिवाय अतिशय भावनाशील आहे. त्याचबरोबर तिला आपल्या कुलाचा अभिमान आहे. आपल्याला उपवनात न्यायला वसंतक आला नाही, हे कळल्यावर आपल्याला कुणी ओळखण्यापेक्षा प्राणत्याग करणे बरे असे मानून ती आत्मघातालाही प्रवृत्त होते. आशा-निराशेच्या दोलायमान स्थितीतील तिची मानसिक स्थिती हर्षाने फार सुंदर रंगवली आहे. कालिदासाच्या मालविकेभोवतीचे धूसर वलय हर्षाने दूर केलेले आहे.

तिसरी व्यक्तिरेखा वासवदत्तेची. हिच्या व्यक्तिरेखेत असूयेची छटाही दाखवली आहे. राजाची वृत्ती माहीत असल्यामुळे ती रत्नावलीला राजाच्या दृष्टीस पडू देत नाही. यातच तिच्या स्त्रीसुलभ स्वभावाचा पैलू हर्षाने दाखवला आहे. ती ' परिजनवत्सला ' आहे. संतापली तरी ती राजाशी अतिशय विनयाने वागते. त्या ठिकाणचे संभाषण हर्षाने फार मधुर शब्दांत केले आहे.

चौथी व्यक्तिरेखा वसंतकाची. तो बुद्धिमान् पण कुरूप व मूर्ख आहे. त्याचे संपूर्ण चित्रणच अतिशय खुमासदार रीतीने केले आहे. या विदूषकात भासाच्या स्वप्नवासवदत्तातील विदूषक, कालिदासाच्या मालविकाग्निमित्रातील विदूषकाचे चातुर्य, विक्रमोर्वशीयातील विदूषकाचा मूर्खपणा या गोष्टी एकत्र साधल्या आहेत.

यातील दुसरी महत्त्वाची बुद्धिमान् व्यक्तिरेखा सुसंगतेची. ती चतुर, मन जाणणारी आहे.

हे संपूर्ण नाटक वसंतऋतूच्या रम्य पार्श्वभूमीवरच घडते. हर्षाचे निसर्गवर्णन हे केवळ वर्णन नव्हे. पुढील घटनांची सूचना हर्षाने त्यातून अगदी सहजपणाने दिली आहे. लिखाणातील हे त्याचे विशेष कौशल्य आहे. चंद्रोदयाचे वर्णन करताना राजा अगदी सहजपणे ' प्राची 'ला प्रणयविह्वल रमणीची उपमा देतो. त्याच वेळी ज्याला आपण मदन समजलो तो आपला भावी पती आहे हे कळल्याने रत्नावली विरहव्याकुल बनते.

म्हणजे हर्षाचा निसर्ग जिवंत नसेल, मानवी भावनांशी त्याचा अतूट सांधाही जुळलेला नसेल, किंबहुना तो भावनांशी एकरूप झालेला दाखवणे हर्षाच्या आटोक्यातही नसेल; पण एवढे मात्र निश्चित की पुढे होणारी घटना सूचित करण्यासाठी त्याला निसर्ग निःसंशय रीतीने उपयोगी पडला आहे व यातच त्याच्या लेखनाचे कौशल्य भरलेले आहे.

हर्ष लेखनातील सूक्ष्म बारकावेही कटाक्षाने पाळतो. याच नाटकात 'मदन' या अर्थी त्याने विशिष्ट पात्रांच्या तोंडी विशिष्ट शब्दांची योजना केली आहे. देवी वासवदत्ता नेहमी मदनाला ' प्रद्युम्न ' म्हणते, तर प्रियकर अजून प्रत्यक्ष सांनिध्यात न आलेली रत्नावली मदनाला ' अनंग ' असे संबोधते. तसेच ' रमणीय '

हा शब्द ' रमण्याः इदम् ' या व्युत्पत्तिलभ्य अर्थाने हर्षाने योजला आहे. त्याचप्रमाणे ' अनभ्रा वृष्टि ' व ' अकालवातावलि ' या शब्दांना विशिष्ट अर्थ हर्षानेच प्राप्त करून दिला आहे.

एकंदरीत हर्षाची शैली येथे खेळकर, सुंदर वाटते. स्वाभाविक संवाद, नाट्यच्छन्नपूर्ण वाक्ये व मार्मिकता याने लेखनाला डौल आला आहे. क्वचित् कोमल, भावमधुर शब्द वाचताना वाटते की हर्ष लेखणी धरतो जणू फुलाच्या हातांनी व त्यांतून रंगवतो भावकाव्य.

त्याच दृष्टीने सारिकेची योजना व रत्नमालेचा उपयोग हर्षाने करून घेतला आहे.

अर्थात या नाटकातही काही दोष आढळतात. ऐंद्र-जालिकाचा प्रयोग जरी यशस्वी रीतीने घडवला तरी त्यात कृत्रिमता येते. त्याचप्रमाणे ज्या रत्नमालेवरून व्यापारी रत्नमालेला ओळखतो, त्या रत्नमालेवरून राजवाड्यात तिच्या अभिजातत्वाबद्दल काहीही शंका येत नाही हेही चमत्कारिकच वाटते. एकंदरीत या नाटकात दैववादाकडे झुकणारी प्रवृत्ती अधिक आढळते. दैवाचा फार मोठा हात या घटनांमागे आहे.

हर्षाच्या या दोन नाटकांची तुलना कालिदासकृतीशी नेहमी केली जाते. पण मला असे वाटते की कालिदासातील काही दोष हर्षाने सुधारले आहेत. कालिदासाचे ऋण जरी त्याने घेतले तरी त्याला साज मात्र स्वतःचा चढवला आहे; व म्हणून म्हणावेसे वाटते –

त एव पदविन्यासास्त एवार्थविभूतयः ।
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥

म्हणजेच कालिदासाने चाकोरी घडवली व हर्षाने ती रुळवली.

अशा एकाच विषयावरच्या दोन नाटिका हर्षाने रचिल्या; पण त्यांच्या शैलींत भिन्नता आहे व म्हणूनच त्या स्वतंत्र रीतीने उभ्या राहू शकतात. दासगुप्ता–दे लिहितात, " It is remarkable that even if the प्रियदर्शिका and रत्नावली inexplicably choose the same theme and pattern, they are still separately enjoyable as pretty little plays of light-hearted love effectively devised and executed." ( Page 261. )

पण या दोन्हीपेक्षा भिन्न विषयावरील नाटक म्हणजे हर्षाचे **नागानन्द.** यात हर्षाचा कल बौद्धांकडे अधिक झुकलेला आहे. विद्याधरकुलात जन्मलेल्या जीमूतवाहन या बोधिसत्वाची कथा जरा गंभीर वातावरणात रंगवलेली आहे. जीमूतवाहनाच्या त्यागाभोवती सर्व नाटक फिरते ठेवले आहे. बृहत्कथामंजरीतील सोळाव्या वेतालात दिलेल्या कथेचा यासाठी आधार घेतला आहे.

हे एक विलक्षण नाटक आहे. यात करुण, रौद्र, बीभत्स, अद्‌भुत व शृङ्गार अशा सर्व रसांचा प्रत्यय घडवला आहे. त्यात कारुण्याचा व रौद्राचा आविष्कार सुंदर दाखवला आहे. त्यांचा मनावरील भार कमी करण्यासाठी विनोदाचाही वापर केलेला आहे. एकातून एक प्रसंग निघतात. त्यांची मांडणी सुंदर, लक्षणीय आहे. त्यांच्या जोडीला प्रत्येक व्यक्तीचे अलौकिक दर्शन घडवून सुंदर परिणाम साधला आहे.

यातील नायक हा विद्याधरांचा राजा असला तरी विरक्त आहे. मातृपितृभक्ती हा त्याचा विशेष स्वभाव आहे. तसेच तो अतिशय कोमल मनोवृत्तीचा आहे. नागाचे दुःख पाहून तो कळवळतो व ते दुःख दूर करण्यासाठी स्वप्राणांची आहुती द्यायलाही मागेपुढे पाहत नाही. स्वदेहाबद्दल त्याला अजिबात आसक्ती नाही. त्याची सुखाची कल्पना आहे –

शय्या शाद्वलमासनं शुचिशिला सद्म द्रुमाणामधः
शीतं निर्झरवारि पानमशनं कन्दाः सहाया मृगाः ॥

त्याची दानाची कल्पना फार मोठी आहे. बौद्ध कल्पनेनुसार स्वदेहदान, ' अज्झत्तिक दान ' हेच सर्वश्रेष्ठ दान होय; व जीमूतवाहनाच्या या महान त्यागानेच हर्ष भारावून गेला आहे, व त्याचा कल बौद्धांकडे अधिक झुकलेला असल्याने त्याच्या अंतरंगांतून हे चित्रण उमटले ते अनासक्त जीमूतवाहनाचे !

त्याचबरोबर या नाटकात ' प्रियकर जीमूतवाहन 'ही आढळतो. पण त्यामुळेच त्याची उदात्त व्यक्तिरेखा दुभंगल्यासारखी वाटते. विरक्त नायक हा प्रेमपाशात गुरफटतो, इतकेच नव्हे तर सामान्याप्रमाणे उसासे सोडीत बसतो हेच आश्चर्यकारक वाटते. मलयवतीला दृष्टान्त देणाऱ्या गौरीची कदाचित ही किमया असेल. पण त्याने सुंदर व्यक्तिरेखा थोडी भंगल्यासारखी वाटते.

दुसरी व्यक्तिरेखा मलयवतीची. ती गौरीची निष्ठावान भक्त आहे. त्या निष्ठेच्या जोरावरच ती गौरीला आर्त विनंती करू शकते. तशीच ती नम्र व विनयशील आहे.

या नाटकातील विदूषकाची योजना प्रामुख्याने प्रसंगाचा भार हलका करण्यासाठी विनोदी पात्र म्हणून केली आहे.

शंखचूड नाग हाही राजाची आज्ञा काटेकोर रीतीने पाळणारा, उदात्त, मातृवत्सल, कनवाळू रंगविला आहे.

अशा तऱ्हेने एक गंभीर वातावरण संपूर्ण नाटकभर पसरले आहे. विरक्तीचे तत्त्वज्ञान सुंदर संवादाद्वारा सांगितले आहे. त्यामुळे त्याला एक वेगळीच धार येते. नाटकाचे कथानक अगदी सुसंगत रीतीने पुढे जाते. त्यामुळे रचनेला एक घाट प्राप्त झाला आहे.

सहजसुंदर संवाद व पल्लेदार वाक्ये; प्रणयी जीवांच्या मदनतापाचे वर्णन, त्याचबरोबर तितक्याच प्रभावी रीतीने पुत्रमृत्यूच्या घटनेने विलाप करणाऱ्या मातेचे करुण चित्रण हर्षाने साधले आहे. मृदू, करुणगर्भ शब्दांतून येथे विलापाचे आर्त सूर घुमतात; हतबल झालेल्या पित्याचा आत्मघाताचा निश्चय दिसतो तो येथेच. असे अंतःकरणातून स्फुरलेले विविध रसांनी ओथंबलेले काव्य येथेच आढळते. मृदू, मुलायम शब्दांनी भावनेची तार छेडली जाते आणि त्यातून जन्माला येते भावकाव्य.

या नाटकाची भूमीही – 'सिद्धाश्रम' – विलक्षण आहे. या सर्व नाटकाची पार्श्वभूमी दैवी आहे. मानवी पातळीपेक्षा वर वावरणाऱ्या या सर्व व्यक्ती आहेत. या नाटकातही बराचसा हात दैवाचा ( Destiny ) आहे. एकंदरीत अतिमानवी पात्रांचे एक सुंदर चित्रण करण्याचा प्रयत्न हर्षाने केला आहे. या नाटकाच्या शीर्षकातही त्याने आपला हेतू प्रकट केला आहे.

असे असले तरी यात काही विसंगतीही आढळतात. शेवटपर्यंत लेखकाच्या मनावर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव असला तरी अंती गौरीची कृपा नायकाला वाचवते ही विसंगतीच वाटते. पण जरी हर्षाचा कल बुद्धाकडे असला तरी त्याचे आराध्य दैवत 'गौरी' आहे हे त्याच्या इतर नाटकांवरून दिसते. त्यामुळे बौद्ध तत्त्वज्ञान स्वीकारले तरी जुन्या निष्ठा टाकणे त्याला जड गेले असावे. ती त्याच्या मनाची धारणाच होऊ शकली नाही. शिवाय गौरी या देवतेमुळेच त्याला इष्ट अन्त साधता आला.

दुसरा आक्षेप असा की एक प्रभावी शोकांतिका हर्षाने सुखान्त करून तिची परिणामकारकता कमी केली. पण विसंगतीचा धोका पत्करूनही त्याने ती सुखांतिका केली याचे कारण तो भरताच्या नाट्यपरंपरेला धरून वागणारा आहे व त्यानुसार त्याने नाट्यरचना केली.

नाटकाची अंतर्गत बांधणी रेखीव असली तरी एकंदर नाट्यवस्तूच विस्कळित आहे. म्हणून एका उदात्त पण विस्कळित कथेवर रचलेले नाटक हा एकच परिणाम मनावर ठसतो.

या तिन्ही नाटकांतून नाटककार हर्षाचे एक विशिष्ट स्वरूप नजरेस पडते. हर्षाचा प्रमुख गुण योजनाबद्धता. 'नासूचितस्य पात्रस्य प्रवेशो निर्गमोऽपि वा' हा नियम त्याने काटेकोर रीतीने पाळला आहे. त्याचा दुसरा विशेष म्हणजे नाट्यशास्त्राच्या नियमानुसार केलेली निर्दोष रचना. क्वचित लिखाणातून अभिप्राय व्यक्त होत नसेल; पण नाट्यशास्त्राच्या नियमांबाहेर त्याचे नाटक जात नाही. दोन्ही नाटिका हे त्याचे चांगले उदाहरण आहे. त्याचबरोबर हर्ष सूचकतेने जे साधावयाचे ते सहज साधून जातो. रत्नावलीतील नवमालिका व नागानंदातील चूडामणी ही याची सुंदर निदर्शने आहेत. हर्ष हा कविताकामिनीचा हर्ष आहे, कारण त्याचा विनोदही तसाच प्रसन्न आहे. मोजक्या शब्दांत रेखीव वर्णन किंवा महान आशय सांगणे हीही हर्षाची एक विलक्षण हातोटी आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते की हर्ष हा शब्दप्रभू आहे. त्याच्या प्रतिभेची झेप कालिदासाइतकी मोठी नसेल, करुणेचे पडसाद भवभूतीच्या करुणाविष्काराइतके भारावून सोडणारे नसतील. पण तो कलाकार खासच आहे. प्रतिभा नसली तरी त्याची दृष्टी कलाकाराची आहे आणि नाटकाच्या रसग्रहणाच्या शेवटी हीच जाणीव उरते,–' Essentially, a decorative artist, he embroiders a commonplace tale with fine arabesques, and furnishes feasts of colour and sound by pictures of a spring... ' ( दासगुप्ता–दे : A History of Sanskrit Literature – Classical Period; पृ. २६२. )

अविनाश साठये द्वितीय वर्ष शास्त्र



# गांधीजींचा गीताविषयक दृष्टिकोण

[ देशमुख पारितोषिक आणि गोंधळेकर पारितोषिक मिळालेल्या निबंधाचा संक्षेप ]

राजकारण, समाजसुधारणा, नेतृत्व इ० विविध अंगांमध्ये आध्यात्मिकता हा गांधीजींचा गुणधर्म सूत्ररूपाने सापडतो. मोक्ष आणि परम शांती यांच्या प्राप्तीसाठी आपल्या साऱ्या हालचाली – राजकारणसुद्धा – असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या विविध उपक्रमांची संगती ते साधनेशी कशी जोडतात हे त्यांच्या गीताविषयक दृष्टिकोणात स्पष्ट होते.

गीतेच्या त्यांच्या भाषांतरास त्यांनी दिलेले नाव त्यांचे प्रतिपाद्य स्पष्ट करण्यास पुरेसे आहे; ते म्हणजे 'अनासक्तियोग'. अनासक्तीच्या उपदेशात गीतेची अपूर्वता असल्याने तेच गीतेचे तात्पर्य व प्रतिपाद्य असे त्यांचें मत आहे.

कर्म हे नेहमीच दोषयुक्त असते; पण ते सोडून देणे मात्र कोणालाच शक्य नाही. म्हणजे कर्म व पर्यायाने दोष हे दोन्हीही मानवाला अपरिहार्य. दोषयुक्ताला मुक्तीचा संभवच नाही. तेव्हा मोक्षासाठी आवश्यक असा जो दोषपरिहार तो केवळ अनासक्तीने शक्य असल्याने गांधीजी त्यास अतिशय महत्त्व देतात व गीतेचे मुख्य प्रतिपाद्य मानतात.

गांधीजींच्या दृष्टीने अनासक्ती आणि सत्य-अहिंसा एकच; अनासक्तीसाठी अहिंसा अपरिहार्य आहे. असत्य भाषण किंवा आचरण, फसवाफसवी, मिथ्या अहंकार या साऱ्या बंधक अतएव त्याज्य गोष्टी लोभ, मोह, स्वार्थ, आसक्ती यांतून जन्मतात. दुसऱ्याची कोणतीही हिंसा – मारणे, जीव घेणे, कठोर बोलणे, लुबाडणे – या साऱ्या गोष्टीही स्वतःच्या पोळीवर तूप ओढण्याच्या राक्षसी वृत्तीतूनच जन्मतात. गंमत म्हणून हिंसा करणारे लोकही स्वतःला मिळणाऱ्या आसुरी आनंदाच्या आसक्तीनेच ती करतात. एकूण आसक्ती हा असत्य आणि हिंसा यांचा गाभा आहे. त्यामुळे अनासक्तीसाठी म्हणजे पर्यायाने मोक्षासाठी ही कर्मे निषिद्ध असली पाहिजेत.

यामुळे गांधीजी सत्यालाच परमेश्वर मानतात. त्या परमेश्वराची भेट झाली नसली तरी त्यासाठी सर्वस्व समर्पण करायला ते तयार होते. सत्याचे सम्यग्दर्शन जरी अनासक्तालाच शक्य असले तरी साधकावस्थेत प्रामाणिकपणे भासेल ते सत्य मानावे, व यात चुका झाल्यास त्या कबूल करून जे नवीन सिद्ध होईल त्या सत्याची उपासना करावी, असे त्यांचे म्हणणे आहे. अहिंसा हे तर सत्याचे प्राणतत्त्व. अहिंसा हेच सत्य व हिंसा मिथ्या असल्याने सत्योपासकास अहिंसा अपरिहार्य आहे.

याप्रमाणे अनासक्तीची दोन अपरिहार्य साधने त्यांनी मांडली आहेत. पण प्रत्यक्ष साधनेस याहून स्पष्ट साधने लागतात. अनासक्ती, सत्य, अहिंसा हे विचार अव्यक्त, अतिव्याप्त आहेत. ही धोरणे रोजच्या व्यवहारात कशी पाळावीत हे कळण्यासाठी ज्ञान, म्हणजे विशिष्ट प्रकारची बहुश्रुतता, लागते. मोहवश, आसक्त मुमुक्षूला हे 'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया' या मार्गाने मिळवावे लागते. पण गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणे कोरडे ज्ञान माजते. त्यामुळे भक्ती हवी. भक्ती ही स्थितप्रज्ञतेप्रमाणे एक वृत्ती आहे, बाह्य कृती किंवा टिळे-माळा वगैरे उपचार नव्हे. ज्ञान व भक्ती यांची पराकाष्ठा म्हणजे मोक्ष.

याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे सेवाकर्म. अनासक्ती, ज्ञान, भक्ती, कर्मफलत्याग इ० सर्वांची कसोटी कृतीत – सेवाकर्मात – लागते. ज्ञान्याला किंवा भक्ताला कर्माची जरूर नाही, सेवेची आवश्यकता नाही, यावर त्यांनी कडाडून हल्ला चढविला आहे. 'कर्मणैव हि संसिद्धिम्' ( गीता ३-२० ) आणि 'उत्सीदेयुरिमे लोका...' ( गीता ३-२४ ) यांच्या आधारे त्यांनी सेवाकर्म किंवा अनासक्तिपूर्वक केलेले कोणतेही कर्म याचा स्वरूपतः

त्याग सर्वस्वी अमान्य केला आहे. योगारूढही लोकसंग्रहार्थ केलेल्या कर्मांशिवाय जगूच शकत नाही असे त्यांचे मत आहे. एकूण या बाबतीत ते लो० टिळकांच्या पक्षाचे आहेत; फक्त ज्ञान्यानेही करावयाचे कर्म कोणतेही चालणार नाही, तर सेवाकर्म हवे, हा त्यांचा खास जादा मुद्दा आहे.

मुमुक्षूला तीन वृत्ती व तीन कृती आचराव्या लागतात. सत्य ही पहिली वृत्ती म्हणजे जगात वागण्याचा स्वाभाविक आधार. अनासक्ती व अहिंसा या दुसऱ्या व तिसऱ्या वृत्ती. आपली जगाशी होणारी क्रिया व प्रतिक्रिया ( aciton & reaction ) अनुक्रमे अनासक्ती व अहिंसा यांच्या निकषावर ठरवावी.

ज्ञान ऊर्फ विवेक हे बौद्धिक कर्म आपल्या बौद्धिक शुद्धतेसाठी आवश्यक आहे. भक्ती हे मानस कर्म चित्तशुद्धीसाठी व अहंकारविनाशासाठी लागते. सेवा या शारीरिक कर्मामुळे मानसिक व बौद्धिक साधना व्यवस्थित चालतात, दंभासारखे विकार दूर होतात.

अनासक्ती हा या सर्व वृत्तींचा व कृतींचा स्थायी भाव होय. यांचा आश्रय मोक्षापर्यंत, यांची पराकाष्ठा होई-पर्यंत करावाच लागतो. याला अपवाद नाही. यात पूर्वापर नाही, अर्थात संपूर्ण साधनाकालात हा उपदेश अबाधित आहे. याचाच संपूर्ण पुरस्कार गीतेत नसेल, पण याला विरोधी गीतेत काही नाही व यावर गीतेचा विशेष भर आहे, असा गांधीजींचा दावा आहे.

गीता व महाभारत प्रायः रूपकात्मक आहेत, महा-भारतीय पात्रांचे व्यक्तिमत्त्व बहुतांशी काल्पनिक आहे, अशी मते गांधीजींनी मांडली आहेत. गीता युद्धाला, हिंसेला प्रवृत्त करते, या विधानावर त्यांनी हल्ला चढविला आहे. गीतेतील काही श्लोक अहिंसेला विरोधी गेले, तरी सबंध गीता हिंसेच्या चौकटीत बसविणे त्याहून कठीण आहे, असे ते म्हणतात.

गांधीजींनी गीतेचा अर्थ हा शास्त्रार्थ लावण्याच्या स्वत: ठरविलेल्या काही प्रमाणांच्या आधाराने लावलेला दिसतो. ही प्रमाणे अशी आहेत :—

( १ ) सत्य व अहिंसा या मूलभूत तत्त्वांच्या विरोधी जाणारे शास्त्र मिथ्या असणार. म्हणून सत्य व अहिंसा यांना विरोधी न जाणारा शास्त्रार्थ सांगावयास हवा. ‘ ज्याला सत्याच्या सत्यतेविषयी शंका आहे त्याच्यासाठी शास्त्र नाहीच. ... ज्याला शास्त्रात अहिंसा सापडली नाही त्याला धोका आहे, पण त्याचा उद्धार नाहीच असे नाही ... अहिंसा सत्याचे प्राणतत्त्व आहे ... हे सत्यार्थी आधीच पाहून घेईल. ’

( २ ) शास्त्रार्थ साक्षेपाने न बघता त्याचा केवळ सूर तपासावा, असे त्यांचे मत आहे. भक्ती, दया, प्रेम यांनी ओथंबलेले तुलसीरामायण ‘ ढोर, गँवार, शूद्र अरु नारी । ये सब ताडनके अधिकारी ॥ ’ या वचनाचाही पुरस्कार करते, असे मानता येणार नाही. हे वचन उपेक्षावे लागेल.

( ३ ) कवी ( क्रान्तदर्शी ) आपला सिद्धान्त योग्य प्रकारे व संपूर्ण प्रमाणात व्यक्त करू शकतोच असे नाही. तेव्हा मूळ शास्त्रार्थात आपल्या रसिकतेनुसार कल्पनांची व अर्थांची भर टाकावी. रसग्रहण करताना आपण काव्याचे जसे अर्थ लावतो, तसे शास्त्रार्थ काढण्यास काहीच हरकत नाही.

( ४ ) दुसऱ्या निकषाने दूर न सारण्यासारखा जबरदस्त श्लोक शास्त्रात आला, तर खुशाल ‘ याचा अर्थ न लावणे हा आमच्या बुद्धीचा कच्चेपणा होय, सिद्धान्ताचा नव्हे ’ असे जाहीर करावे व आपलाच अर्थ प्रस्थापित करावा.

यावरून ‘ प्रत्येकाला सोयीनुसार वाटतो तो शास्त्रार्थ ’ इतके सोपे स्वरूप या नियमांचे आहे हे ताबडतोब लक्षात येते. अर्थात् अशा निकषांचा काहीच उपयोग नाही. पण इतकी उघडपणे पोरकट वाटणारी प्रमाणे गांधीजींनी का मांडली, याचा विचार केला तर गांधीजींच्या मनात ठाण मांडून बसलेल्या मनोरम स्वप्नभूमीचे दर्शन होते. त्यांच्या विचारातील सारी सुसंगती आणि विसंगती, त्यांचे सारे यशापयश, त्यांचे सारे अतिरेकी विचार व ओढाताण यांचा जन्म या स्वप्नभूमीच्या शक्यतेच्या गृहीत-कृत्यात झालेला दिसतो, या गृहीताचा फोलपणा पाहण्या-पूर्वी त्यांच्या स्वप्नभूमीचे दर्शन घेणे उपयुक्त व आवश्यक आहे.

ही स्वप्नभूमी एका आदर्श समाजाच्या रूपाने पसरली आहे. येथे प्रत्येकजण अहिंसक व सत्यवादी आहे. दुसऱ्यावर प्रेम करण्यात, परोपकारासाठी देह खर्ची घालण्यात प्रत्येकजण आपल्या जीवनाचे सार्थक मानतो. येथे दुष्टाला शिक्षा करावी लागत नाही; प्रेम व दया यापुढे तो आपोआपच नमतो. येथे आक्रमकावरही कोणी शस्त्र उचलणार नाही. प्रेम, दया आणि आत्मसमर्पण यांनी ते आक्रमकांना नमवतील; हिंसेला व्यापून त्यांची अहिंसा दशांगुळे उरेल. हिंसेची अपार शक्ती असूनही ते अहिंसक,

शांत व सदाचारी असतील. थोडक्यात म्हणजे येथे प्रत्येकजण जीवन्मुक्त असेल. अहिंसा, प्रेम, शांती यांचीच उपासना करणारा, ती पुरेशी नसली तरी बलिदानास सज्ज असणारा समाजच येथे पोहोचतो; 'शठे शाठ्यं समाचरेत्' म्हणणारा नव्हे.

या कोटीला पोचणाऱ्या एकेकट्या व्यक्तीचा उपयोग नाही, या मार्गाने जाणारा समाज हवा, अशी प्रामाणिक तळमळ गांधीजींना होती. या परम सत्याच्या उपासनेसाठी त्यांनी सारी व्यावहारिक सत्ये व प्रत्यक्ष अनुभव धुडकावले, बुद्धीला आणि शास्त्रालाही असत्य दिसणारे सिद्धान्त दडपून मांडले, आचरण्याचा आग्रह धरला, शास्त्रांची ओढाताण केली. व्यावहारिक सिद्धान्त व संकेत या मूलभूत श्रेष्ठ सत्यांपुढे कायमचे टिकणार नाहीत, ही त्यांची पक्की धारणा होती. आपाततः हे सुसंगत — एवढेच नव्हे तर विलोभनीय — दिसते; पण यातील मूळ गृहीतकृत्य चुकीचे असल्याचे विचारांती दिसते.

हिंसेत अहिंसा असू शकते; अत्याचाराला अटकाव करताना, स्त्रीबालकांचे रक्षण करताना केलेली हिंसा क्षम्य आहे, हिंसेचा यांत्रिक त्याग नव्हे तर ज्ञानपूर्वक अनासक्त आचरण आवश्यक आहे, हे सारे त्यांनीच मान्य केलेले दिसते. समाज हा अहिंसा व सत्य यांचा अधिकारी असू शकत नाही, कारण सामाजिक आणि राजकीय हालचाली व्यावहारिक पातळीवरच चालू शकतात. अहिंसा व सत्य यांचा अधिकारी व्यक्तीच असू शकते हे त्यांनीही मान्य केलेले आहे. युद्धे जगात सतत राहणार; हेतू शुद्ध असल्यास त्यातूनही जगाचे कल्याण करता येईल, हेही तेच म्हणतात.

अशा परिस्थितीत शुद्ध अहिंसात्मक बलिदानमय मार्ग अनावश्यक व अशक्य आहे हे स्पष्ट होते. अर्थातच स्वप्नभूमीच्या विशिष्ट रस्त्याचे सत्याहिंसादी सिद्धान्तांच्या अबाधित आचरणाचे त्यांचे स्वप्न व्यवहारात उतरणे अशक्य असल्याचे सिद्ध होते. व्यवहारात ते स्वप्न उतरवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्नही केवळ अंधारात चाचपडण्यासारखे होते व त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही, हे त्यांच्याच निवेदनातून स्पष्ट दिसते. त्यांच्या मृत्यूनंतरही अहिंसा आणि शांती यांच्या बुरख्याखाली हिंसा व अत्याचार यांनाच थैमान घालावयास मिळते, असे दिसून आले आहे.

आज ( मूळ निबंध लिहिण्याच्या वेळी, जेव्हा कै. लालबहादूर शास्त्री होते व आक्रमकांना धडा शिकवत होते ) धर्मासाठी, सत्यासाठी केलेल्या हिंसेचे गुण प्रकट होत आहेत. खऱ्या शूराच्या हिंसेचा आणि अहिंसेचा प्रत्यय येत आहे, त्यांच्या कल्पनेच्या संपूर्ण विरुद्ध मार्गाने — निर्भय हिंसेने ! थोडक्यात म्हणजे गांधीजींच्या धोरणांचा व्यावहारिक पराजय आज पूर्ण झाला आहे.

भारतीय जीवनाची अंतिम ध्येयेच गांधीजींनी मांडली. पण सामाजिक धोरणे रजःसत्त्वयुक्त व धर्माधिष्ठित आणि व्यक्तिगत धोरणे पूर्ण सात्त्विक व गुणातीततेला आदर्श मानणारी, असा इहामुत्र कल्याणाचा मार्ग त्यांनी सोडला आणि परमार्थ व व्यवहार यांचा संकर केला.

हिंदू तत्त्वज्ञानाची उच्च तत्त्वे घेऊन हवे तसे साधनेचे मार्ग कल्पिले, तर केवळ तत्त्वांवर तोही वाद टिकू शकणार नाही हे यातून स्पष्ट व्हावे. परमार्थ हा व्यवहाराच्या चौकटीत कसाही ठोकता येत नाही. 'A circle cannot be squared.' 'अग्रतश्चतुरो वेदान्' हेही 'पृष्ठतः सशरं धनुः' असल्याशिवाय विजयी होत नाहीत हे यातून सिद्ध झाले आहे. तत्त्वनिष्ठेच्या आणि समर्पणाच्या धुंदीत व्यक्ती राहील, पण समाज फार काळ राहू शकणार नाही, याचीही प्रचीती आली आहे.

किंमत थोडी असली तरी हे शहाणपण मोलाचे आहे. याचे योग्य जतन व्हावयास मात्र हवे.

दोष असले तरी गांधीजींच्या दृष्टिकोणाची काही खास वैशिष्ट्ये उल्लेखनीय आहेत. परमार्थाच्या सामाजिक विवेचनाची ती परमावधी आहे; कारण राजकारणातूनही मोक्ष मिळावयास काय हरकत आहे, असे गांधीजींचे मत होते. याबरोबरच ध्येयसाधनेची विलक्षण तळमळ आणि चुका कबूल करण्यात असाधारण प्रामाणिकपणा व निःसंकोचपणा हे त्यांचे विलोभनीय गुण आहेत. ईश्वरानेच काही काम करून घेण्यासाठी त्यांच्या डोळ्यावर झापड आणली असावी, हे त्यांचे विधान या गुणांचे दर्शन घेतल्यावर दुःखाने पुन्हा उच्चारावेसे वाटते.

दुर्दैवाने या गुणांमुळेच की काय, पूर्वसूरींच्या विचारांच्या अभ्यासाचा अभाव, अवास्तव धाडसी आत्मविश्वास आणि विसंगती व पूर्वोत्तरविरोध यांविषयी बेफिकिरी हे दोष त्यांच्या लिखाणात सापडतात. पूर्वोत्तरविरुद्ध अर्थांपैकी नंतरचा अर्थ ( कालदृष्ट्या ) म्हणजे खरा अभिप्राय समजावा, असे ते एका ठिकाणी लिहितात, तर कोणाला जुना अर्थच बरा वाटल्यास तो घ्यावा,

असेही ते लिहितात. नक्की सत्य कोणते हे त्यांनाही माहीत नाही. तसेच ज्याला स्वतःला आतला आदेश कळत नाही व ज्याची गांधीजींवर श्रद्धा आहे त्यानेच त्यांचा सल्ला मानावा हेही तेच सांगतात.

एकूण अनिश्चितपणा, गुळमुळीतपणा, स्थिर भूमिकेचा अभाव हे त्यांच्या प्रतिपादनात प्रकर्षाने दिसतात. असे असूनही त्यांनी शांतीच्या साधनेचा पुन्हा एकवार पाया घातला व उच्च भारतीय तत्त्वे जगापुढे मांडली, हे नाकारता येणार नाही. तंत्र चुकले तरी योग्य मंत्र त्यांनी सांगितला. गीताभाष्यकारांत मात्र अतिरेकी समाजवादी प्रतिपादन याहून महत्त्व त्यांना देता येणार नाही.

साररूपाने, फसलेला का होईना पण उच्च सामाजिक साधनेचा एक उज्ज्वल व प्रामाणिक प्रयत्न हे त्यांच्या दृष्टिकोणाचे महत्त्व अजरामर राहील.



कृ. श्री. अर्जुनवाडकर

# निबन्धशिशू

## १ : कष्टोऽयं खलु भृत्यभावः

भृत्यस्य जीवितं बहवः शोचन्ति। स्वामिनं च दूषयन्ति। स्वामी किल गुणे वर्तमानमपि सेवकं दूषयति। मौनमपि दूषयति, प्रवचनपटुत्वमपि; पार्श्वस्थत्वं दूषयति, दूरस्थत्वमपि। न क्षान्तिः अस्य रुचये, नापि अक्षान्तिः। अतः किल 'सेवाधर्मः परमगहनः, योगिनामप्यगम्यः'। अमात्यस्यापि किल सेवाभावः दुःखम् आवहति। अमात्यप्रवरः यौगन्धरायणोऽपि आह – 'कष्टोऽयं खलु भृत्यभावः'।

वयं तु मन्यामहे – स्यान्नाम पुराकाले भृत्यत्वं कष्टावहम्। अद्यतने तु काले 'कष्टोऽयं खलु स्वामिभावः' इत्येव वक्तव्यं संवृत्तम्। अद्यत्वे हि सर्वेषां सेवकानां संघाः भवन्ति; ते च सति असति च अवसरे कर्मस्तम्भान् – 'सम्पान्'- आयोजयन्ति, (तदुक्तम् – 'सम्पे शक्तिः कलौ युगे') तर्जयन्ति च तपस्विनः स्वामिजनान्। समयं च इत्थम् उपन्यस्यन्ति – 'अल्पं कर्म, विपुलं वेतनम्, सप्ताहस्य दिनद्वयं विरामः, वर्षस्य मासषट्कं सानुज्ञं कर्मोपरमः (रजा), वर्षान्ते मासचतुष्टयवेतनप्रमाणं परितोषदानम् (बोनसः), दीपावल्यां होलिकायां च पुष्टिधनम् (पोस्तम्), मासे मासे वस्त्रदानम्,' इत्यादि, इत्यादि। स्वामिनश्च अगतिकाः सन्तः तत् सर्वम् अनुमन्यन्ते।

अहो, ईदृशेन स्वातन्त्र्येण लाभेन च ईश्वरस्यापि भृत्यत्वे लोभः उत्पद्येत, किमुत मानुषाणाम्!

## २ : प्रातिवेशिकः

'प्रातिवेशिकः' इति हि तादृशः विषयः, यम् अधिकृत्य सर्वेऽपि बहु बहु वक्तुमिच्छन्ति। विरलाः खलु जनाः, ये प्रातिवेशिकाः सन्तोऽपि 'सन्तः' इति जनैः स्तूयन्ते। प्रायेण हि सुजनाः अपि अदूरवर्तिनः दुर्जनायन्ते, दुर्जनाश्च दूरवर्तिनः सुजनायन्ते। तथाहि – मम गृहात् चतुर्थे ततोऽपि वा परतरस्मिन् गृहे वसन्तः जनाः मां विद्वांसं विनीतं विवेकिनं च मन्यन्ते। मम गृहस्य पश्चात् अनन्तरे गृहे वर्तमानास्तु मां मूढम् उन्मत्तं दुर्वृत्तं परपीडनैकशीलं दुर्वाससमिव मन्यन्ते। ईदृशस्य नरापसदस्य दिवा दर्शनमपि मा भूत् इति एतैः पाश्चात्त्यैः गृहयोः मध्ये सार्धपुरुषतुङ्गा भित्तिरपि विरचिता, या खलु अस्माभिः 'बर्लिनभित्तिः' इति संज्ञापिता। तस्याः इतस्त्याः वयं 'पश्चिमबर्लिनीयाः' जाताः, ततस्त्याश्च प्रातिवेशिकाः 'पूर्वबर्लिनीयाः' कृताः। संप्रति पश्चिमबर्लिनीयस्य नारिकेल तरोःछायामपि इतरे न सहन्ते; ते कुठारेण स्वक्षेत्रप्रविष्टाः नारिकेलशाखाः छिन्दन्ति। ततश्च अस्मदीयाः अपि पूर्वबर्लिनीयानां श्वानं स्वैरम् उद्यानप्रविष्टं न सहन्ते; लोष्टपाषाणलगुडैः च तं यथाशक्ति ताडयन्ति। एवं सर्वे उद्योगं लभन्ते! युक्तमाह कौटिल्यः, 'भूम्यनन्तरः सहजः शत्रुः' इति।

## इंग्रजी संभाषणकला

**व. दे. ठाकूर**

**The Art of English Conversation**

या पुस्तकातील संवादांची प्रॅक्टिस करता करता तुम्ही स्वतःच सफाईदार इंग्रजी बोलू लागाल.

**पृष्ठे ५३४ : मूल्य रु. ५-५०**
**पोस्टेज १-५०**

**मॅजेस्टिक बुक स्टॉल**

**शनिपाराजवळ, पुणे २.**

*FAIR PRICE*
*WIDE RANGE FOR CHOICE*
*& EXCELLENT SERVICE*
*IN*

## PEN TRADERS

☆

**LEADING FOUNTAIN PEN HOUSE**

290 Narayan, Laxmi Road,
Poona 2.

आम्लपित्त, जुनाट अतिसार, शूल, आव संग्रहणी, व तज्जन्य विकारावर गुणकारी

## - पंचामृतगुटी -

दी आयुर्वेद रसशाळा पुणे,
पुणे ४

**- शाखा -**

अमरावती, मुंबई, बेळगाव, दिल्ली, हुबळी, जोधपूर, कोल्हापूर, इंदोर, पुणे व सांगली, नागपूर.

**पार्टी, संमेलने, लग्नसमारंभासाठी ऑर्डरी स्वीकारल्या जातील.**

卐

**आमचेकडे नेहमी मिळणारे ताजे, गरम व चवदार पदार्थ**

卐

**सर्व प्रकारचे फरसाण मिळेल.**

## किरण
## विश्रांती गृह

**गोखले हॉलसमोर, पुणे २.**

# ENGLISH

## Hardly can I Recover!

**Hardly can I Recover !**
I remember thee every instant,
' Lthough thou art so distant
In torture we parted
And my desire thwarted,
So agonizing was the farewell
That in separation I can't fare well !
So deep is the wound
And the grief so profound,
That hardly can I recover,
Till thou, the Saviour, reappear !

**Vijay Madge**
First Year B. A.

## A Few Lines

A palacial building overlooking the green;
Where many a parrot at play is seen.
Cute and tiny flowers fashioned by Him,
Adorn the velvety lawn and the saplings slim.

And I cannot help but gaze
At the learned walls which the arches interlace.

The trees in front slender and tall,
Do bow low whatever may befall.
Then why not we the highest of all,
Honour by deeds the founder's call ?

**Kumud Shintre**
Third Year B. A.

## GOLDEN JUBILEE OF S. P. COLLEGE

I

Forteen June ' sixty five has a special claim
As a red letter day in college history,
For those sunny hours proclaim
Glory and glamour of its story.

II

This great institute for fifty years
Has won a noble fame;
Today it wins joyous cheers
From many a celebrated name.

III

Fifty years since this college was started,
' New Poona College ' was its name
From then with fifty years it has parted
and dazzles with resplendent fame.

IV

Our library has been a thing of pride
So has our ' Study Room '
And our swimming Pool so long and wide
Is a place to drive away gloom !

V

Main attention on development intellectual
Is given by Principal and followers
Equal concentration on growth physical
For we want ' Well built Scholars '.

VI

Palacial place and a large play ground
A decent hostel with a Rector kind
Equipped laboratories with instruments sound
Are radiant facets of this gem you find.

VII

This is a time of ' Golden Jubilee '
Here reverberates the sound of bands
Let us wait for ' Diamond Jubilee '
With hope in heart and ' folded hands '.

**Vilas Bhat**
Third Year B. A.



Vidyagauri Malegaonkar, Third Year B. A.

# HAMLET : A FASCINATING CHARACTER

Hamlet is not Shakespeare's greatest tragedy, not the most perfect work of art. But Hamlet is Shakespeare's most fascinating creation; a creation of some heaven-sent moments. After having read Hamlet we have a feeling of a strange dreadful quietness, which comes after the bursting of a terrible volcano; and what tortures our mind is the painful utterence of Ophelia, " O what a noble mind is here o'erthrown ! " We are awe-stricken at the soul's infinity, its weakness and courage, its frailty and strength. Hamlet stands alone and we forget the rest. He needs nothing else to perfect him.

The play opens and Hamlet is presented before us as a youth, fresh from Wittenberg; a young man with great moral ideals; having very fine delicate sense of humour; enjoying all the delights that life had to offer; with a mind very sensitive, emotional as well as intellectual; with a heart so golden; of such deem tenderness, his parents must have been idols for him. This princely royal personality is on the threshold of life.

And now imagine how the event must have worked upon his mind - a mind which has that peculiar mould. His mother's degradation suddenly flashes on him the sordidness of life; it shocks his whole being and leaves him bitter and melancholy. Has sensuality makes him see his own flesh er ugly and debased.

His brooding melancholy leads him to take a morbid pleasure in making things worse than they are. The overwhelming moral shock shatters his zest for life and faith in it. He comes to know his mother's ingratitude; and all women become ungrateful for him. " O let me not think on't " he says, " Frailty ! thy name is woman. " And later in the play-scene when the prologue is over, Hamlet asks, " Is this a prologue or the posy of a ring ? " Ophelia answers, " 'T is brief my lord ". and Hamlet exclaims, " As woman's love. " His mother's behaviour gives him a sense of disgust and thus he tends towards this generalization.

The shock is complete when Hamlet meets the ghost. Hamlet had doubted some foul play before his father's spirit appeared to him; and no sooner is it confirmed by the ghost than he cries, " O my prophetic soul, Mine uncle ! "

Here the shock is complete. We have seen Hamlet before the shock, we will now see him after the horrible calamity.

And see how beautifully Campbell points out the heart of tragedy : " A nature so accomplished in all that might have adorned a throne, should find himself in such a world- his father murdered; his mother corrupted; his hopes for life destroyed, his love embittered; and nothing left to live for except the doubtful and desperate purpose of a questionable revenage, to be followed inevitably by his own destruction, that is the tragedy. "

**And indeed it is the tragedy.** The pathos lies in the contrast between what he might have become and what he has to become. In every Shakespeare's tragedy the central feeling is the impression of waste. In Hamlet it is very poignant. Everywhere we see astounding virtues that call forth our attention and worship and everywhere we see them perishing and destroying themselves. All these noble virtues in another circumstances might have reformed the world. "For he was likely, " says Fortinbras, " had he he been put on to have prov'd himself most royally. " And thus we say with Campbell : " In Hamlet the nature is of the greatest, the passion of the noblest, the possibilities of good are boundless, the circumstances overwhleming, and the defect of quality most venial. "

And our fascination for him is always a strange perennial fascination. We have seen him savage to his friends, to Polonious and to Ophelia – indeed his attitude towards her is the greatest of all puzzles in the play. We see him delaying the very action which his father's spirit entreated him to perform.

We know all this and in spite of these glimpses in his character, discordant though

they are with our usual scale of values, they do not distract from our general sense the nobility and the greatness of man. The glory of his divine soul abides with him.

We love him for the unbounded delight and faith he has in everything that is good and beautiful. His brooding melancholy leaves him morbid and cynical towards life. We know what the overwhelming shock must have meant to him, whose heart is so tender and passionate in nature. And yet how noble he is when he appreciates the infinite qualities of man.

" What a piece of work is a man ! How noble in reason ! how infinite in faculty ! in form and moving how express and admirable ! in action how like an angel ! in apprehension how like a god ! the beauty of the world ! the paragon of animals ! And yet to me what is this quintessence of dust ! Man delights not me, no; nor woman either, though by your smiling you seem to say so. "

The same nobility is seen in his conversation with his mother in the closet scene. Prof. Bradley says : " The truth is that though Hamlet hates his uncle and acknowledges the duty of vengeance, his whole heart is never in this feeling or this task. But his whole heart is in his horror at his mother's fall and in his longing to raise her". That is why he could not perform the deed of vengeance wisely. But in this higher purpose of raising his mother's soul, he is all powerful, magnificent and dignified. And thus by ' speaking daggers ' with her, he rings out the confession from her mouth.

The other reason why we love Hamlet is that we find something in him which we ourselves have experienced sometimes. We might not have felt it so acutely as he feels it. We might not have thought over it so intensely as he thinks over it. May be because our calamity is not so great as his calamity. May be because our nature is not so passionate and sensitive as his nature is. And again the nature that Hamlet possesses is so rare and divine that it is impossible to find it everywhere. Thus how many times must we have pondered like him on the gloomy thoughts of death.

Another reason why we love Hamlet is for his admirable, almost touching devotion to his father. When his mother asks him, " Why it seems so particular with thee? " he is outraged and disgusted at her flippancy.

But Hamlet does not love his father for the grandeur of his kingly nature. We find something unique in Hamlet's nature when he says to Horatio :

" He was a man, take him for all in all. "

While reading Hamlet we wonder at the depth of Shakespeare's knowledge of human nature. How difficult it is to understand the mysteries of human nature. How difficult it is to understand the mysteries of human soul. I remember Victor Hugo when he says, : " There is a spectacle grander than the ocean and it is the sky; there is a spectacle grander than the sky and it is the interior of the soul. " In spite of all the theories put forth in explantion of Hamlet's delay in acting, the reason still remains a puzzle. A puzzle not only for us but for Hamlet as well. The reproaches he gives to himself represent his bewildermnt and anger for his ' brestial oblivion. '



# SYNGE'S NORA

**Rajanikant Belsare** Second Year B. A.

' The Shadow of the Glen ' belongs to Synge's early years of literary exploration. A Discovery of Yeats, Synge unwittingly toed the line of Chekhov and for the first time juxtaposed the tragic in human life with the comic. Synge, being one of the greatest Irish dramtists, has always been a literary concern for research and this starts right from his first play. Like Bernard Shaw's Candida, Synge's Nora is an enigmatical character. It's a great surprise that she has been understood in widey. divergent manner. The confusion starls when the critic has in mind Ibsen's Norta These critics take Synge's Nora as a representative of the dauntless modern woman. There are others like W. B. Yeats for example who discard her as a faithless wife. This

bitter controversy is the apology for this study.

The theme is the simulation of death by the elderly husband Dan Burke to trap his younger wife Nora with her lover. The very opening of the play gives us grounds for having a qualm about her character. Her husband wants to put her to a test and this in itself is the manifestation of her dubious behaviour in married life. We have to take the intentions of her husband quite seriously because for him it is the matter of the totality of his emotions. Being a farmer and that too old, he has none to bank upon. But he does not get a favourable response from Nora in this respect. It will not be too presumptuous to say that she is misnomer as a wife. She is devoid of the emotions and feelings that are expected of a wifely woman. Marital fidelity is always a matter of kind and not of degrees; so all the critics seem to have neglected the Code of Christian Marital Morality when they make an allowance for her behaviour. Nora's infidelity is painful because she is at home with the situation. She does not experience any emotional perturbance when she parts from her life companion. Even in her final estrangement from her husband, she is filled with an overflowing joy and accepts her exit with a romantic and gay abandon, that too with the unfortunate final fling at her husband. Nora fervently desires to get the pleasures in life. As a panacea to her ennui she has taken to flirting. She has a comparatively large number of lovers. This explains her pretext to go to Michael Dara, when even the corpse of her husband is still unremoved. When Michael comes she wants complete privacy and therefore she asks the tramp to go inside. Her ideals of marriage are exposed when she goes along with the tramp for she finds ' a fine bit of talk ' in him. She accepts him as a mere relief. Thus the plethora of passions marks her romantic affairs.

This is consistently shown and the remnant of her traits are in keeping with her general make-up. The first being the material interest and the second her inseasoned quest for youth. Her lust for money, property and security is conspicuously seen throughout. Synge might have employed, like Bernard Shaw, an attack on the conventional marriage institution and this is launched in a very succinct and trenchant manner. He has made Nora to confess her security in relation to marrigage. She says superciliously, " What way would I live, if I didn't marry a man with a bit of farm and cows on it and sheep on the back hills ? " To Nora property is a footrule to measure one's stature. She counts the piles of money with unquenching enthusiasm and when Michael tells her of of his bargain of lambs, the first thing she asks him is, " What was it you got ? "

Along with her material interest goes her remarkable quest for youth. She dislikes her old husband in particular and the old age in general. This is the reason why she draws a nauseating picture of an old man who is tooth-less and having rough words, in a very contemptuous manner. She says " We'll all be getting old, but it is a queer thing surely. " Nora is somewhat an escapist trying to run away from the inevitable old-age. It will not be wrong to suggest that Nora's approach to life is hedonistic.

This is a naturalistic portrayal of a farm-woman. The only touch of grace that goes to her credit is her inability for pretending artificial emotions. She is unable to feign what she does not feel. She calls a spade a a spade and retorts to her husband under his very nose. She condemns him not only when he was lying as a corpse but also when he has the breath of life in him. On the other hand her sorrow for Darcy is genuine.

Thus we find that the seamy side of her character is intentionally enhanced by Synge. This is no conjecture for she herself says, "What way would a woman live in a lonesome place like this and she not making a talk with the men passing ? " Owing to all this she fails to claim our sympathy and it will be haphazard to be an advocate for her behaviour. In this light we can understand why Maud Gonne, a great intellectual and politician of Ireland left the theatre protesting against what she called the author's libel of womanhood.

The name Nora reminds us of Ibsen's Nora. This happens because the denoument is the same - Nora leaving her husband. But we must not fail to note the striking distinction that while Ibsen's Nora leaves her husband out of her frustration coming out of her complete devotion to her husband, Synge's Nora goes out becuase she is starkly failthless.

ooo




**निर्मला मोकाशी** तृतीय वर्ष साहित्य

# भारतातील स्वातंत्र्योत्तर कालातील समाज परिवर्तन



[ डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे निबंधस्पर्धा पारितोषिक मिळालेल्या निबंधाचा संक्षेप ]

१५ ऑगस्ट १९४७ ! हा सुवर्णदिन कोण विसरेल ! भारतमातेच्या पायांतील शृंखला त्या दिवशी गळून पडल्या. त्या दिवसापासून आपला भारतीय समाज, कात टाकलेल्या जीवाप्रमाणे, दुप्पट जोमाने वाढतो आहे, प्रगत होत आहे.

स्वातंत्र्यपरिसाच्या स्पर्शाबरोबर आपल्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक, आर्थिक वगैरे सर्व क्षेत्रांत कायापालट घडला. आजच्या ह्या पंचवार्षिक योजना जिल्हा विकास-योजना, समाज-विकास-योजना, सर्वांना समान हक्क व सर्वांसाठी सारखे नियम-कायदे, नागरिक ह्या दृष्टीने सर्व एकाच पातळीवरचे, आर्थिक विकासात सर्वांना समान संधी–वगैरे सर्व त्या परिसस्पर्शाचे परिणाम होत.

आर्थिक क्षेत्रात पूर्वी संस्थानिक, जमीनदार व भांडवलदार यांचे वर्चस्व होते. समता, हक्क या गोष्टींची कल्पनाच नव्हती. या एके ठिकाणी साचलेल्या संपत्तीचे समप्रमाणात विभाजन करण्याचा प्रयत्न काँग्रेसने थोड्याफार प्रमाणात यशस्वी करून दाखवला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नव्या जीवनाच्या आकांक्षा वाढू लागल्या. रूढिग्रस्त व मागासलेल्या भारतीय समाजाला सुजाण व समृद्ध करण्यासाठी, आर्थिक स्थिती संपन्न करण्यासाठी पंचवार्षिक योजना आखल्या गेल्या, त्याप्रमाणे त्या प्रत्यक्ष कार्यवाहीत आणल्या गेल्या. ग्रामीण जनतेला सुधारण्यासाठी समाज-विकास-योजनांचे आंदोलन उभे केले गेले.

आर्थिक विषमता ह्या दुहेरी समस्येचे निराकरण करण्यासाठी समताधिष्ठित समाज निर्माण व्हावा असे लोकशाहीनिष्ठ सामाजिक–राजकीय धोरण आपण स्वीकारले.

धर्म, वंश, पंथ, भाषा यांच्यामुळे होणाऱ्या भेदांपेक्षा उत्पादनातील संबंध व संपत्तीचे विभाजन यामुळे होणारे गट हे जरा वेगळ्या स्वरूपाचे असतात. आर्थिक परिस्थितीचा समाजजीवनावर मूलगामी परिणाम घडत असतो. म्हणून त्यासाठी उत्पादनतंत्राचा विकास, उत्पादनसाधनांमध्ये प्रगती, कामगार व धनी यांचे यांचे संबंध सुधारणे, आर्थिक हितसंबंध चांगले राखणे ह्या गोष्टींकडे लक्ष दिले.

भारतीय समाजात शहरे व मोठी गावे हा संघटित व बोलका भाग आहे. ग्रामीण भारत हा उपेक्षित व विस्कळित असा आहे. शहरातील चैनी, परोपजीवी दलालांची, व्यापाऱ्यांची सतत सेवा करून बिचारी खेडी अगदीच सामान्य दर्जाची राहिली, पहिल्या पंचवार्षिक योजनेने ह्या अनिष्ट प्रथेस योग्य वळण देण्याचा प्रयत्न केला, दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक मोहिमेने साक्षरता-प्रसार, खेड्यांचे आरोग्य, एकूण–व्यवस्था सुधारणे,

शिक्षणाच्या सोयी, दारूबंदी, शेतीसाठी पाटबंधारे कालवे इ. गोष्टींकडे लक्ष दिले.

ग्रामीण भागातील जनतेच्या मूलभूत गरजा पुऱ्या करण्यासाठी ग्रामपंचायती स्थापून, पंचायती-राज्यांची सुरुवात केली आहे. दोन लक्ष तीस हजार सहकारी संस्था स्थापन करून भारतात सहकारी समाज उदयास येत आहे. सहकारी चळवळीच्या मार्फत कर्ज, खरेदी, विक्री, शिक्षण वगैरे कामे, तसेच कारागीर व इतर लोकांसाठी व्यवसायात्मक सहकारी संस्था स्थापिल्या आहेत.

तीन पंचवार्षिक योजना पुऱ्या करून, देशभर उद्योगधंद्यांची वाढ, औद्योगिक पुनर्घटना बऱ्याच प्रमाणात केली आहे. शेतीविषयक निरनिराळ्या योजना आखून, शेतीची पुनर्घटना करून, शेतकऱ्यांना विशेष शिक्षण देऊन, शेतीची परिस्थिती सुधारली जात आहे. देशाची ८३ टक्के प्रजा ही खेड्यांत रहात असल्यामुळे, ग्रामीण जनतेचे दारिद्र्य, बेकारी व असुरक्षितता या गोष्टींवर भर दिला जात आहे.

लहान शेतकऱ्याला, लहान उद्योगधंद्यांना संरक्षण देणे हे आपल्या आर्थिक धोरणाचे एक अंग आहे. त्या दृष्टीने कूळ-कायदे, सावकारी नियंत्रण कायदे, जमीन वाटप योजना, कसेल त्याची जमीन हे कायदे लागू केले आहेत.

ग्रामीण भागांत शेती सुधारायची आणि उद्योगधंद्यांचे जाळे निर्माण करायचे हे आर्थिक विकासाचे मुख्य कार्यक्रम ! आर्थिक विकासासाठी माल-साठवणुकीची गोदामे, जलद मालवाहतुकीची साधने, त्यासाठी आवश्यक असलेल्या सडका, तार-पोस्ट-टेलिफोन इ. जलद संदेशवाहक साधनांची सोय, वीज-पाणीपुरवठा, तेल व कोळसा या औद्योगिक इंधनांचा पुरवठा, सिमेंट-लाकूड-लोखंड इ. इमारती सामानाचा पुरवठा वगैरे गोष्टी केल्या जात आहेत. याखेरीज विकसनशील अर्थव्यवस्थेला आवश्यक असलेल्या — शेती व उद्योगधंद्यांना भांडवल-पुरवठा करणाऱ्या बँका, सहकारी सोसायट्या, पतपेढ्या, पैशाची देवाणघेवाण सुलभ करणाऱ्या बँका, शेतीमालाच्या खरेदीविक्रीसाठी नियंत्रित बाजारपेठा — या संस्था आहेत. सरकारी उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत पब्लिक कॉर्पोरेशन, संमिश्र कंपन्या, सरकारी खात्यांमार्फत व्यवस्थापन असे अनेक भिन्न भिन्न प्रयोग चालू आहेत.

खेडोपाड्यांपर्यंत आर्थिक विकास पोहोचावा म्हणून समाज-विकास योजना, राष्ट्रीय योजना, जिल्ह्याची—राज्याची योजना असा नियोजनबद्ध विकास सध्या होत आहे. विकासाच्या आकांक्षेने जाग्या झालेल्या समाजाला सरकारने पैसा, साधने, तंत्रज्ञ इ. स्वरूपांत बरीच मदत केली. पण एवढे करूनही अपेक्षेप्रमाणे विकास घडून आला नाही, हे निश्चित !

१९४७ पर्यंत भारत म्हणजे एक गुलाम, परतंत्र राष्ट्र म्हणून ओळखले जात होते. आता आपल्याला आपले स्वतःचे, वेगळे, विशिष्ट असे स्थान प्राप्त झाल्याने, आपल्या फायद्यातोट्याबाबत आपला समाज जागरुक आहे. भारताचे सत्त्व आणि स्वत्व आता जगाच्या प्रांगणात दिसून येऊ लागले आहे.

आता भाषण-लेखन-मुद्रण-स्वातंत्र्य लाभल्याने जनता अधिक निर्भय झाली आहे. चालू राजकारणावर, सरकारच्या कारभारावर, आपल्या धोरणावर चर्चा करू लागली आहे. राज्यकर्त्यांना पाठिंबा किंवा वेळप्रसंगी कडक विरोध करून आपले मत सक्रिय प्रगट करू लागली आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकसत्ता हे क्रांतिकारक तत्त्व आले. त्याच्या आगमनाबरोबर समाजाच्या सर्व रचनेत आमूलाग्र परिवर्तन घडून आले. धर्म, नीती, शिक्षण, समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था वगैरे कोणतेच क्षेत्र जुन्या रूपांत टिकू शकले नाही.

आता व्यक्ती, वैयक्तिक जीवन, व्यक्तिगत स्वातंत्र्य यांना महत्व आले आहे. एक स्वतःसिद्ध व स्वयंपूर्ण मानव या दृष्टीने व्यक्तीकडे पाहिले जाते. सगळी समाजरचना ‘ व्यक्ती हीच अंतिम ! ’ या तत्त्वावर होत आहे. मानवाचे सुख, त्याचा गुणविकास, त्याच्या व्यक्तित्वाचा उत्कर्ष हे मूलभूत ध्येय झाले आहे. आपल्या गुणांप्रमाणे व्यक्तीला समाजात स्थान मिळू लागले आहे.

अनियंत्रित राज्यसत्तेच्या युगातून लोकसत्तेच्या युगात येताना, समाजाच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. या प्रत्येक क्षेत्रातील जुने तत्त्वज्ञान सोडून नव्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला गेला. जुने युग अंधनिष्ठेचे, शब्दप्रामाण्याचे विषमतेचे, पारतंत्र्याचे होते. आताचे हे नवीन युग व्यक्तित्वाचे, बुद्धिप्रामाण्याचे, समतेचे व स्वातंत्र्याचे आहे. जुनी समाजव्यवस्था बदलताना लोकक्षोभाचे अनेक प्रसंग आले, त्यातूनच नवीन तत्त्वे उदयास आली, ती लोकांना हळूहळू पटली आणि नवीन समाजव्यवस्था दृढमूल झाली.

स्वातंत्र्यानंतर पाश्चात्त्य आचारविचारांची देवाण-घेवाण अर्थातच झाली. पाश्चात्य संस्कृतीच्या, विशेषतः इंग्रजी विद्येच्या प्रसारामुळे या भरतभूमीत एक अपूर्व मन्वंतर झाले.—या भूमीतून बराच काळ लुप्त झालेले सामुदायिक किंवा सार्वजनिक जीवन पुन्हा अवतीर्ण झाले. अखिल भरतभूचे धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक भावनिक वगैरे सर्व तऱ्हांचे प्रश्न, सुखदुःखे एकच आहेत अशी अखिल भारतीय भावना निर्माण झाली. आपल्या देशाच्या भवितव्याविषयी जनता एकजुटीने विचार करू लागली. सुदैवाने सर्व धर्मांचे लोक, भटक्या जाती, रानटी वन्य जमाती आपल्या ह्या लोकशाहीत मिसळून गेल्या आहेत.

गेल्या शंभर-दीडशे वर्षांत जगाच्या जीवनात एक फार मोठा बदल घडून येत आहे या जीवनातील प्रत्येक क्षेत्र अधिकाधिक तंत्राधीन व शास्त्राधीन होत आहे. मग आपला देश त्याला अपवाद कसा राहील? आपले आर्थिक जीवन, लष्करी व्यवस्था, लोकायत्त जीवन, देशाचे एकूण सगळे व्यवहार हे त्या परिवर्तना-पासून दूर कसे रहातील? ह्या परिवर्तनाच्या लाटेत आपला देशही ढवळून निघत आहे.

स्वातंत्र्यानंतर पहिले मोठे काम काय झाले असेल तर भारतात जी लहानमोठी संस्थाने विखुरलेली होती ती विसर्जित करण्यात आली. भारताची घटना तयार करून तिचा अंमल चालू झाला. या घटनेने भारताच्या इतिहासात एका नवीन युगाला प्रारंभ झाला.

संस्थानी लोकांप्रमाणेच, आपल्यातून बाजूला पड-लेल्या तीन जमाती — अस्पृश्य जाती, गुन्हेगार व आदिवासी जन! आता ह्यांना आपल्यासारखेच सर्व हक्क-अधिकार मिळाले आहेत. त्यांना काही सवलती देऊन त्यांच्या उन्नतीचे प्रयत्न चालू आहेत. दलित वर्गाच्या विकासासाठी, मागासलेल्या जातींसाठी सरकार जास्तीत जास्त काळजी घेत आहे. त्यामुळे — माझ्या गुणाप्रमाणे मला समाजात स्थान मिळेल — ही कर्तृत्वाची खरी प्रेरक असलेली भावना आता जनमानसात निर्माण झाली आहे.

| वोस्तोक १ | १२·४·६१ | रशिया | द्वादशी | यूरी गागारिन |
| वोस्तोक २ | ६·८·६१ | रशिया | दशमी | टिटोव्ह |
| वोस्तोक ३ | ११·८·६२ | रशिया | दशमी | निकोलायेव |
| वोस्तोक ४ | १२·८·६२ | रशिया | एकादशी | कर्नल पोपोविच् |
| Luna 6 ( Towards moon ) | ८·६·६५ | रशिया | दशमी | |
| टिटान २ | ३·६·६५ | अमेरिका | चतुर्थी | मॅक्डेविट व्हाइट |
| Echo II | २५·१·६४ | अमेरिका | एकादशी | To test the effect of cosmic rays |
| Luna 9 | २·२·६६ | रशिया | द्वादशी | चंद्रावर रॉकेट उतरवण्याचा यशस्वी प्रयोग |

P. N. 54386

*For Quality*

Artists, Drawing &

Engineering materials

Visit

**V. G. Gokhale**

**& Co.**

**257, Budhwar Peth, POONA 2.**

*With the*

*compliments from*

**HOLLYWOOD**

**PHOTO**

**STUDIO**

POONA 4.

**Phone No. (With Ext.) 57575**

महाराष्ट्राची तीन लोकप्रिय मासिके

**कि र्लो स्क र**

[ स्थापना १९२० ]

वार्षिक वर्गणी रु. १०

**म नो ह र**

[ स्थापना १९३४ ]

वार्षिक वर्गणी रु. ९

**स्त्री**

[ स्थापना १९३० ]

वार्षिक वर्गणी रु. १०

आपणही नियमितपणे वाचता ना ?

किर्लोस्कर प्रेस, स्वारगेट, पुणे ९

[ प्रोप्रा. किर्लोस्कर ब्रदर्स लि. ]

# प्रकाश

# वॉच कंपनी

१ बुधवार पेठ, बाजीराव रोड,

विश्रामबाग वाड्यासमोर, पुणे २

सर्व प्रकारची घड्याळे विक्री व दुरुस्तीचे

विश्वसनीय केंद्र

या कोष्टकावरून असे आढळते की रशियाची यशस्वी ठरलेली अवकाशयाने एकादशी-दशमी व द्वादशी या तिथींना सोडली आहेत. अमेरिकेच्या यानांपैकी सर्वात यशस्वी ठरलेले अवकाशयान हे चतुर्थीला सोडले आहे. यावरूनच असे वाटते की अवकाश-निरीक्षणाचे प्रयोग विशिष्ट कालातच यशस्वी ठरतात व त्यादृष्टीने '**एकादशी**' ही तिथी अधिक, सोयीची आहे व हेही रशियाच्या अधिक यशाचे एक गमक असू शकेल.

यासंबंधी विचार करता असे दिसते की ही कलागणना चांद्रपद्धतीने केलेली आहे. चंद्राचा या विषयाशी असलेला संबंध सर्वच अवकाश-अभ्यासक मान्य करतात. याच दृष्टीने चंद्राची स्थिती, पृथ्वी व चंद्र यांचे असलेले आकर्षण, पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण व अंतराळातील परिस्थिती यांचा निकटचा संबंध आहे. या दृष्टीनेच एकादशीला अशी स्थिती असू शकेल की ज्यावेळी चंद्राचे आकर्षण व अंतराळातील परिस्थिती यांच्या संघर्षातून यानाला सहजपणे बाहेर पडून बिनधोकरीतीने अंतराळाचे निरीक्षण करता येईल. अर्थात हे गूढ प्रगत राष्ट्रांतील ज्योतिर्गणिती व अवकाशज्ञातेच उकलू शकतील.

अमेरिकेच्या बाबतीत चतुर्थी (पंचमी) ही तिथी अधिक परिणामकारक ठरते. हा तिथीचा फरक कदाचित् पूर्वपश्चिमगोलार्धातील फरकामुळे घडत असेल. शिवाय चंद्राच्या कलांचा व तिथींचा विचार केल्यास असे लक्षात येते की शुद्ध एकादशी व वद्य चतुर्थी तसेच वद्य एकादशी व शुद्ध चतुर्थी यावेळी चंद्राची अवकाशातील परिस्थिती सारखीच असते. त्या दृष्टीनेच तिथींचे हे गूढ काय आहे या प्रश्नाला असे उत्तर देता येते की चंद्राच्या आकर्षणाशी, त्याच्या अंतराळातील स्थितीशी व कलांशी याचा निकटचा संबंध आहे. व त्या दृष्टीनेच उड्डाणाचा अचूक क्षण गाठणे आवश्यक असते. या संदर्भात 'अमेरिकन वार्ताहर पुरवणीत' (७ नो. १९५८ चंद्राच्या रोखाने पायोनियरची झेप) असा उल्लेख आढळतो... "...या सर्व गोष्टींसाठी अचूकतेची जरूरी आहे; कारण प्रत्येक महिन्याच्या केवळ तीन दिवसांत आणि या अवधीतही हां हां म्हणता निघून जाणाऱ्या केवळ अठरा मिनिटांत पृथ्वी व चंद्र एकमेकांपासून इतक्या जवळ अंतरावर येतात की एखादा अग्निबाण नेमका त्याच वेळी अचूकपणे फेकला गेला व त्याचे मार्गदर्शन अचूकपणे करण्यात आले तरच तो चंद्रापुढे जाऊ शकेल व हळूहळू त्याच्या क्षेत्रात जाऊन कक्षा पकडील." ... पृष्ठ ८.

यानुसारच अंतराळप्रवासाचा असा एखादा क्षण असेल की ज्यावेळी मानव पृथ्वीची कक्षा ओलांडून अनंत अवकाशात विहार करू शकेल, त्यावेळी त्याला साहाय्य असेल त्या क्षणी असणाऱ्या अवकाशातील विशिष्ट परिस्थितीचे. केवळ चंद्रावर स्वारी करणे याच उद्देशाने नव्हे तर अन्य ग्रहांचे ज्ञान करून घेण्याच्या इच्छेने पृथ्वीच्या कक्षेबाहेर पाऊल टाकणाऱ्या मानवाचे उद्दिष्ट सफल करायला हा क्षण साहाय्यकारी ठरेल व या दृष्टीने **एकादशी** व **चतुर्थी** महत्त्वाची ठरू शकेल.
(प्रा. पी. एल्. लोकगारीवार यांच्या दै. सकाळमध्ये प्रसिद्ध झालेल्या निरीक्षणांच्या आधारे)



# कै. श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित यांचे दि. ८–११–१९६५ रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झाले. निधनसमयी ते ६७ वर्षांचे होते. आपले सर परशुरामभाऊ महाविद्यालय व शिक्षण प्रसारक मंडळी यांच्याशी त्यांचा घनिष्ट संबंध होता, व या शिक्षण–संस्थांच्या हिताची त्यांनी सतत चिंता वाहिली. त्यांच्या निधनाने आपल्यासंस्थेचा एक मित्र, हितकर्ता व मार्गदर्शक नाहीसा झाला आहे.

श्रीमंत जगन्नाथ महाराज हे लोकमान्य टिळकांच्या कुटुंबीय मंडळींपैकीच समजले जात. लोकमान्यांनी त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम केले. लोकमान्यांचे स्नेही सरदार बाबा महाराज यांच्या द्वितीय पत्नी श्रीमंत ताई महाराज यांनी लोकमान्यांच्या उपस्थितीत श्रीमंत जगन्नाथ महाराज यांस १९०१ साली विधिपूर्वक दत्तक घेतले. तेव्हापासून सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड देऊन लोकमान्यांनी श्रीमंत जगन्नाथ महाराज यांचे शिक्षण व संगोपन केले.

१९१६ साली आपल्या महाविद्यालयाची स्थापना झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी लोकमान्यांची प्रेरणा, प्रोत्साहन व पुढाकार असल्याने शिक्षणकार्याला चालना मिळाली. लोकमान्यांच्या प्रेरणेमुळे श्रीमंत जगन्नाथ महाराज यांच्याकडून सध्याची आपल्या महाविद्यालयाची पंचवीस एकर प्रशस्त भूमी दि. ३१-५-१९१८ रोजी शि. प्र. मंडळीस कराराने मिळाली. श्रीमंत जगन्नाथ महाराज यांच्या औदार्यामुळेच आपल्या महाविद्यालयाची सध्याची भव्य वास्तू ' भाऊमहाराज बागे 'त उभी आहे ! सन्मानाने उभी राहून विद्यादान करीत आहे !! श्रीमंत जगन्नाथ महाराज यांच्या शिक्षणप्रेमाचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण करीत आहे !!!

श्रीमंत जगन्नाथ महाराज हे शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे १९३५ ते १९५० या काळात सदस्य होते. त्यांचे मार्गदर्शन शि. प्र. मंडळीस नेहमीच मोलाचे वाटत आले. श्रीमंतांचा पुण्यातील व महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक, औद्योगिक, धार्मिक व क्रीडाविषयक संस्थांशी सल्लागार या नात्याने संबंध आला होता. त्यांच्या निधनाने लोकमान्यांच्या प्रभावळीतील एका राष्ट्रप्रेमी, कर्मनिष्ठ, शिक्षणकार्याविषयी सक्रिय आस्था बाळगणाऱ्या कर्तबगार व्यक्तीस आपण मुकलो आहोत. श्रीमंतांच्या कुटुंबीय मंडळींच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो.



कै. श्रीमंत सरदार
जगन्नाथ महाराज पंडित



श्रीमंत जगन्नाथ महाराज व लोकमान्य टिळक
( एक दुर्मिळ छायाचित्र. 'केसरी' च्या सौजन्याने. )



कै. प्राचार्य रघुनाथ दामोदर करमरकर
( १८९३–१९६५ )

संस्कृत विद्येचे थोर उपासक



आपल्या महाविद्यालयाचे
प्राचार्य
( १९३३–१९४५ )



यू. टी. सी. मधील
अधिकारी

थोर व्यक्तिमत्त्वाची विविध दर्शने



पुणे विद्यापीठाचे कुलगुरु

# कै. प्राचार्य रघुनाथ दामोदर करमरकर

आपल्या महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य रघुनाथ दामोदर करमरकर यांचे दि. २८ नोव्हेंबर, १९६५ रोजी शोचनीय निधन झाले. मृत्युसमयी प्राचार्य करमरकर बहात्तर वर्षांचे होते. प्राचार्य करमरकरांच्या निधनाने आपल्या महाविद्यालयाचा एक **थोर शिल्पकार** काळाने हिरावून नेला आहे.

प्राचार्य र. दा. करमरकर यांचा जन्म दि. २८ ऑगस्ट १८९३ रोजी सातारा जिल्ह्यातील भिलवडी येथे झाला. शालेय आयुष्यात अनेक पारितोषिके व शिष्यवृत्त्या त्यांनी संपादन केल्या. १९०९ साली ते प्रवेश परीक्षा सन्मानाने उत्तीर्ण झाले. वडिलांचे अकाली निधन झाल्यामुळे दुर्धर प्रसंग निर्माण झाला असताही साधी राहणी, कर्तव्यदक्षता, कष्टाळू वृत्ती व जिद्द या गुणांमुळे, फर्ग्युसन कॉलेज व डेक्कन कॉलेज येथे उच्च शिक्षण घेऊन त्यांनी एम्. ए. ही पदवी मिळविली. उच्चशिक्षणकालात त्यांनी संस्कृत विषयाची अनेक पारितोषिके मिळविली. संस्कृत व वेदान्त विषयातील नैपुण्यासाठी असलेली भगवानदास पुरुषोत्तमदास शिष्यवृत्ती व झाला वेदान्त पारितोषिक त्यांनी मिळविले. विद्यार्थिदशेत सुरू केलेला ज्ञानाचा व्यासंग त्यांनी अखंडपणे अखेरपर्यंत चालू ठेवला.

सरकारी नोकरीऐवजी शिक्षणक्षेत्रात कार्य करून देशाची सेवा करण्याचे थोर व्रत त्यांनी अंगिकारले. १९१६ साली ते शिक्षण प्रसारक मंडळीचे आजीव सदस्य झाले. न्यू पूना कॉलेज या नावाने आपल्या महाविद्यालयाची १९१६ साली स्थापना झाली. तेव्हापासून १९४८ साली सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांनी संस्कृत विषयाचे अध्यापन उत्तम रीतीने केले; महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाच्या विविध योजना आखून त्या समर्थपणे व कर्तबगारीने कार्यवाहीत आणल्या. आपल्या महाविद्यालयास १९३३ ते १९४५ ही बारा वर्षे प्राचार्य करमरकर यांचे प्राचार्य या नात्याने बहुमोल नेतृत्व लाभले. याच काळात आपल्या महाविद्यालयाची सर्व तऱ्हेने भरभराट झाली व ते स्थिरपद झाले. या सर्वांचे श्रेय प्राचार्य करमरकर यांनाच आहे. त्याग, सेवा, चारित्र्य, विद्याव्यासंग व शहाणपण या गुणांमुळे प्राचार्य करमरकरांनी शैक्षणिक क्षेत्रातील देशसेवेचा एक महान् आदर्श महाराष्ट्रात निर्माण केला. तो सर्वांस नेहमी स्फूर्ती व प्रेरणा देत राहील.

त्यांच्या कार्यांचे क्षेत्र व्यापक होते. कुशल अध्यापक, व्यासंगी संशोधक, समर्थ ग्रंथकार, कर्तबगार प्रशासक, शिस्तप्रिय लष्करी अधिकारी, दूरदृष्टीचे शिक्षण-तज्ज्ञ म्हणून प्राचार्यांनी सर्वत्र लौकिक मिळविला. मुंबई व पुणे विद्यापीठांत त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. त्यांच्या निधनाने विद्याव्यासंग आणि भलेपणा यांची मूर्ती आपणामधून आता नाहीशी झाली आहे. प्राचार्य करमरकर यांच्या पुण्यस्मृतीस आमचे शतशः प्रणाम. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो.

डॉ. रा. ना. दांडेकर संस्कृत विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ



# संस्कृत विद्येचे थोर उपासक प्राचार्य करमरकर

प्राचार्य रघुनाथ दामोदर करमरकर यांच्या नुकत्याच झालेल्या निधनामुळे संस्कृत विद्येच्या प्रगतीत एक मोठा अन्तराय निर्माण झाला आहे. कारण, प्राचार्य करमरकर यांनी जरी अनेक क्षेत्रांत महत्त्वाची कामगिरी केली असली तरी संस्कृतविद्येविषयी नितांत आस्था हाच त्यांच्या कर्तृत्वाचा स्थायीभाव होता असे मला वाटते.

प्राचार्य करमरकर यांचा जन्म १८९३ साली झाला. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणक्रमांत अनेक पारितोषिके व शिष्यवृत्त्या संपादन करीत ते सन्मानपूर्वक एम्. ए. झाले. नंतर लगेच, त्या काळी महाराष्ट्रीय सुविद्य तरुणांना स्फूर्तिप्रद ठरलेल्या 'त्याग आणि सेवा' या व्रताचा अंगीकार करून, काही विशिष्ट ध्येयाने, त्यांनी शिक्षणक्षेत्रात प्रवेश केला; आणि शेवटपर्यंत त्या व्रताचे आणि ध्येयाचे निष्ठापूर्वक पालन केले. शिक्षण प्रसारक मंडळीचे आजीव सदस्य होऊन, त्या वेळी 'न्यू पूना कॉलेज' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या महाविद्यालयात करमरकर संस्कृत व इंग्रजी हे विषय शिकवू लागले व लवकरच त्यांनी एक नामवंत अध्यापक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून घेतली. काही वर्षांनी, 'न्यू पूना कॉलेज' चे 'सर परशुरामभाऊ कॉलेज' असे नामान्तर व रूपान्तर झाले, व त्या कॉलेजच्या प्रगतीस मोठीच चालना मिळाली. आणि १९३३ साली, करमरकर त्या कॉलेजचे प्राचार्य झाल्यानंतर, त्यांच्या प्राचार्यपदाच्या बारा वर्षांच्या अमदानीत त्या कॉलेजच्या सर्वांगीण प्रगतीचा उच्चबिन्दू गाठला गेला असे म्हणावयास हरकत नाही.

कॉलेजात असताना, संस्कृतच्या अध्यापनाव्यतिरिक्त अनेक कामे प्राचार्य करमरकर यांनी हाती घेतली व त्यांत नाव कमावले. यु. टी. सी. चे प्रमुख अधिकारी या नात्याने त्यांनी केलेली कामगिरी अविस्मरणीय ठरली आहे. मुंबई व पुणे येथील विद्यापीठांच्या कारभारांत ते तन्मयतेने आणि उपयुक्त रीतीने भाग घेत असत. पुणे विद्यापीठाच्या वाङ्मयशाखेचे अध्यक्ष, निरनिराळ्या विद्यापीठीय अधिकारमंडळांचे व समित्यांचे सदस्य व काही काल त्या विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून प्राचार्य करमरकर यांनी त्या विद्यापीठाच्या प्रारंभकालीन प्रगतीस मोठाच हातभार लावलेला आहे.

पण संस्कृत विद्येविषयी गाढ अभिमान हेच प्राचार्य करमरकर यांच्या जीवनाचे सारभूत सूत्र होते असे मला स्वानुभवावरून म्हणावेसे वाटते. संस्कृतचे एक अत्यंत यशस्वी प्राध्यापक म्हणून त्यांनी अगोदरच मान्यता मिळविली होती. संस्कृतच्या निरनिराळ्या विद्यापीठीय परीक्षांसाठी नेमलेल्या अनेक पाठ्यपुस्तकांच्या विद्वत्तापूर्ण पण विद्यार्थ्यांस व्यावहारिक दृष्टीनेही उपयुक्त ठरणाऱ्या, सटीक आवृत्त्या त्यांनी–काही स्वतंत्रपणे व काही आपले सतीर्थ्य प्राध्यापक अश्वत्थामाचार्य गजेन्द्रगडकर यांच्या सहकार्याने काढल्या. सामान्य विद्यार्थ्याला विषयाचे आकलन सुलभपणे व्हावे, पण त्याबरोबरच कुशाग्र बुद्धीच्या विद्यार्थ्यांस त्या विषयाचा अधिक खोल व मार्मिक अभ्यास करण्यास मदत व्हावी, अशा रीतीने या आवृत्त्यांची योजना केलेली आहे. काही वर्षांपूर्वी केवळ मुंबई प्रांतातीलच नव्हे तर अखिल भारतातील विद्यापीठीय संस्कृत-विद्यार्थ्यांस करमरकर–गजेन्द्रगडकर ही नावे वरदानरूप ठरली होती.

सर परशुरामभाऊ कॉलेजातून सेवानिवृत्त झाल्यावर थोड्याच दिवसांनी प्राध्यापक करमरकर यांची भांडारकर प्राच्यविद्या संशोधन-मंदिराच्या पदव्युत्तर अध्यापन व संशोधन या विभागांचे संचालक म्हणून नेमणूक झाली. आणि तेव्हापासून त्यांचे संशोधनकार्य विशेष जोमाने चालू झाले. अर्थात्, आपल्या संशोधनकार्याचा प्रारंभ त्यांनी आपल्या अध्यापकीय जीवनाच्या पहिल्या काही वर्षांतच केला होता. या त्यांच्या कार्याचे स्वरूप, ज्ञानात्मक ( academic ) आणि संघटनात्मक ( organizational ) असे, दोन प्रकारचे होते. १९१९

साली पुणे येथे अखिल भारतीय प्राच्यविद्यापरिषदेचे पहिले अधिवेशन भरले होते. प्राध्यापक करमरकर हे त्या अधिवेशनाचे एक कार्यवाह होते. भांडारकर प्राच्य. विद्या संशोधनमन्दिराचे कार्यवाह आणि त्या संस्थेच्या संशोधनपत्रिकेचे संपादक म्हणूनही त्यांनी काही वर्षे काम केले आहे. प्राच्यविद्यापरिषदेच्या निरनिराळ्या अधिवेशनांत त्यांनी वाचलेले " देवयान आणि पितृयाण ", " भगवद्गीता व ब्रह्मसूत्रे यांचा अन्योन्यसंबंध ", " कालिदासकृतींचे कालदृष्ट्या पौर्वापर्य ", इत्यादी विषयांवरील निबंध उल्लेखनीय आहेत. " ब्रह्मसूत्रावरील प्रमुख भाष्यकारांचा तौलनिक अभ्यास " हा त्यांचा प्रबंध मोठी मान्यता पावला आहे.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधनमन्दिराच्या संशोधन विभागाचे संचालक म्हणून प्राध्यापक करमरकर यांनी मार्गदर्शन केलेले अनेक विद्यार्थी मुंबई व पुणे येथील विद्यापीठांच्या पीएच्. डी. परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. पण मला मुख्यतः उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे— भांडारकर मन्दिरातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या महाभारताच्या पण्डितमान्य चिकित्सक आवृत्तीतील आश्वमेधिक पर्व आणि सभापर्वावरील देवबोधकृत " ज्ञान दीपिका " टीका यांचे संपादन; प्राच्यविद्यापरिषदेच्या ' धर्म आणि तत्त्वज्ञान ' तसेच ' अभिजात संस्कृत वाङ्मय ' या विभागांच्या अध्यक्षपदावरून केलेली अभिभाषणे; कर्नाटक विद्यापीठातर्फे झालेल्या व त्याच विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या " कालिदास ", " भवभूती, " आणि " बाण " या तीन व्याख्यानमाला; भांडारकरमंदिराच्या संशोधन ग्रंथमालेतील " अर्जुनोपाख्यान ", " वेदान्त-कल्पलतिका " आणि " अनुगीता " हे ग्रंथ; पुणे विद्यापीठाच्या संस्कृत-प्राकृत ग्रंथमालेत समाविष्ट केले गेलेले, संस्कृत मूल, इंग्रजी भाषांतर, आणि चिकित्सक टिप्पणी यांनी युक्त असलेले रामानुजाच्या " श्रीभाष्या " चे नवीन संस्करण, इत्यादी — त्यांच्या स्वतःच्या महत्त्वपूर्ण संशोधनकार्याचा. संस्कृतविषयक संशोधन आणि प्रचार यासंबंधी अनेक योजना प्राचार्य करकमरकर यांच्या मनात घोळत असत, व त्यांपैकी काही त्यांनी मजजवळ बोलूनही दाखविल्या होत्या. पण त्या योजना कार्यान्वित झालेल्या पाहण्यास ते आता आपणांत राहिले नाहीत ही दुःखाची गोष्ट आहे.

बुद्धिमान विद्यार्थी, यशस्वी प्राध्यापक, कर्तबगार प्राचार्य, यू. टी. सी. चे करडे अधिकारी, विद्यापीठीय कारभाराचे तज्ज्ञ, व्यासंगी संशोधक, संस्कृतविद्येचे निष्ठावंत अभिमानी इत्यादी निरनिराळ्या नात्यांनी प्राचार्य करमरकर यांनी शिक्षण क्षेत्राच्या विविध विभागांत आपल्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाची छाप पाडलेली आहे. अशा प्रकारचे सर्वगामी कर्तृत्व खरोखरच विरळा! शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने — आणि विशेषत: संस्कृतविद्येच्या उपासकांच्या वतीने — प्राचार्य करमरकर यांच्या स्मृतीस ही श्रद्धांजली मी आदरपूर्वक अर्पण करीत आहे.

# प्राचार्य करमरकर : शिक्षणक्षेत्रातील एक कर्तबगार व यशस्वी व्यक्तिमत्त्व

**पद्मश्री प्रा. दि. ब. देवधर** निवृत्त आजीव सभासद, शि. प्र. मंडळी

विद्यार्थिदशेत माझे निकटचे स्नेही व नंतर मेहुणे प्राचार्य करमरकर माझ्यापेक्षा वयाने थोडे लहान, व त्यांची प्रकृती अत्यंत निरोगी व राहणी नियमित असल्याने, त्यांच्या नावामागे कै. लावून त्यांना श्रद्धांजली वाहण्याचे दुःखद कर्तव्य करण्याचा प्रसंग येईल अशी मला त्याचप्रमाणे इतर कोणाही इष्ट मित्रांना मुळीच कल्पना नव्हती. परंतु अपघाताने अकस्मात् मृत्यू यावा अशी घटना अवघ्या दोन आठवड्याच्या आजारानंतर घडली व मोठा आधारवृक्ष उन्मळून पडल्याने, जशी त्याच्या शीतल छायेत राहणाऱ्या अनेकांची व्यथित अवस्था होते तशी आपत्ती, त्यांच्याशी संबंधित अनेक व्यक्ती व संस्थांवर कोसळली आहे यात शंका नाही.

काहींना मोठेपणा जन्मामुळे येतो, काहींच्यावर तो दैवामुळे लादला जातो, तर काही निवडक व्यक्ती मात्र स्वतःच्याच कर्तबगारीने मोठ्या पदावर चढतात, असे एक वचन प्रसिद्ध आहे. प्रा. करमरकर संपूर्णपणे स्वाव-

लंबी व स्वयंसिद्ध होते हे त्यांच्या विद्यार्थिदशेपासूनच्या निश्चयी कर्तृत्वावरून दिसून येते. ते शाळेत असतानाच वडिलांचा एकाएकी आधार तुटल्याने त्यांना केवळ आपलीच नव्हे, तर लहान चार बहिणींची व सर्वच कुटुंबाची जबाबदारी पत्करावी लागली. ती त्यांनी उत्तम अभ्यास करून, अनेक शिष्यवृत्त्या मिळवून, व स्वतः अत्यंत काटकसरीने वागून मोठ्या दक्षतेने पार पाडली व शेवटपर्यंत आपली अनेक कर्तव्ये करीत राहून कुटुंब-प्रमुख कसा असावा याचा आदर्श घालून दिला.

१९१६ साली सन्मानपूर्वक एम्. ए. झाल्याबरोबर मोठ्या पगाराच्या नोकरीचे आमिष बाजूस सारून, त्यांनी नवीन निघणाऱ्या न्यू पूना कॉलेजात ( हल्लीचे एस्. पी. कॉलेज ) संस्कृत विषयाच्या प्राध्यापकाची जबाबदारी दरमहा अवघ्या शंभर रुपयांवर तहाहयात पत्करली यात त्यांचा खरा स्वार्थत्याग व शिक्षणाची तळमळ दिसून आली. मीही लवकरच संस्कृत विषय घेऊन एम्.ए. झाल्या-वर, मला माझ्या क्रीडाक्षेत्रातील कामगिरीमुळे, इतरत्र आकर्षक नोकऱ्यांची अनेक निमंत्रणे आली. पण तीन प्रमुख कारणांमुळे मी शिक्षण प्रसारक मंडळीचा तहाहयात सभासद होण्याचे ठरविले. ज्या शाळेत प्रथमपासून मी शिक्षण घेतले ती शाळा चालविणाऱ्या संस्थेची सेवा करण्याची संधी मला मिळणार होती. पुण्यात राहून, महाराष्ट्र क्रिकेटची प्रतिष्ठा व प्रगती वाढविता येणार होती. शिवाय प्रा. करमरकरांचा सहकारी म्हणून आपल्या आवडत्या विषयाचे अध्यापन करता येणार होते.

शि. प्र. मंडळीचे आजीव सभासद झाल्यावर पुढे तीस वर्षे संस्थेची एकनिष्ठपणे सेवा केल्यावर आम्ही दोघे निवृत्त झालो. या दीर्घ मुदतीत, एस्. पी. कॉलेजमधून अनेक हुषार विद्यार्थी संस्कृत शाखेत बी. ए. व एम्. ए. पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण होऊन, पुढे नावलौकिकास चढ-लेले पाहण्याचे समाधान आम्हास मिळाले.

त्या काळात प्राध्यापक वर्गात पूर्ण सहकार व खेळी-मेळीचे वातावरण असल्याने कॉमनरूम ही एक खऱ्या विश्रांतीचे व आनंदाचे स्थान असे. प्रा. करमरकर जरी वरून तापट दिसले तरी विनोदप्रिय होते व त्यांच्या मार्मिक कोट्यांमुळे सर्वांची करमणूक होऊन उल्हासाचे वातावरण निर्माण होत असे. श्रेष्ठकनिष्ठभाव चुकूनसुद्धा प्राध्यापकवर्गात आढळून आला नाही.

१९३३ ते १९४६ पर्यंत प्राचार्यपदाची जबाबदारी त्यांच्यावर आली असताही, कॉमनरूममध्ये येऊन, सर्वांना भेटण्यास व त्यांच्या अडचणी समजून घेण्यास ते चुकत नसत. एवढेच नव्हे, तर सर्व प्राध्यापकांना त्यांच्या गुणांप्रमाणे विद्यापीठात व इतरत्र सन्मानाची पदे मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी सतत केला व सर्व दृष्टींनी कॉलेजचा लौकिक वाढवला.

प्रा. करमरकरांना प्रथमपासून लष्करी शिक्षणाची आवड होती. त्यामुळे कॉलेजमध्ये प्राध्यापक झाल्याबरोबर आम्ही दोघे त्यावेळच्या आय्. डी. एफ्. ( विद्यापीठा-साठी ) मध्ये प्रवेश केला. प्रथम काही वर्षे आम्हाला साधे सैनिक म्हणून रखडावे लागून, बरेच हाल सोसावे लागले. त्याची यत्किंचितही कल्पना हल्लीच्या सुधारलेल्या एन्. सी. सी. त येणार नाही. पुढे मोठ्या चळवळीनंतर आम्हाला व्हाइसराय कमिशने म्हणजे जमादार, फौजदार-पदे परीक्षेनंतर देण्यात आली. परंतु ती कनिष्ठ दर्जाची असल्याने, लष्करी शिक्षणाच्या प्रगतीला पोषक नाहीत हे सरकारला पटल्याने, पुढे यू. टी. सी.त हल्लीची किंग्ज कमिशने देण्याचे मान्य झाले. तरीपण सरकारी कॉलेज-मधील काही प्रोफेसर मात्र गोऱ्या वर्णाचे म्हणून एकदम आमच्या वरच्या दर्जाचे कॅप्टन, मेजर बनून नसत्या शिस्तीचा बाऊ करून आमच्यावर अधिकार गाजवीत.

खेळांना उत्तेजन देण्याचा लष्करात नेहमी प्रघात असताही, मला एका महत्त्वाच्या क्रिकेटसामन्यासाठी रजा नाकारण्यात आल्याने, १९२५ साली मला यू. टी. सी. चा राजीनामा द्यावा लागला. करमरकर त्यामुळे प्रक्षुब्ध झाले. पण, आपल्या विद्यार्थ्यांना कसेही करून लष्करी शिक्षण देण्याचे व्रत चालू ठेवले पाहिजे या एकाच भावनेने ते चिकाटीने काम करीत राहिले व त्यांनी पुष्कळ प्रयत्न करून, अनेक इष्ट असे बदल व सवलती विद्यार्थि–सैनिकांना मिळवून देण्यात यश मिळविले.

पुढे क्रमाक्रमाने प्राध्यापक अधिकाऱ्यांना वरच्या जागा देण्यात येऊन, करमरकर ले. कर्नल व मुख्या-धिकारी होऊन, त्या पलटणीतून सन्मानाने निवृत्त झाले. दरसाल पंधरा दिवस यू. टी. सी.चा जो कँप भरत असे, तो कष्टप्रद असला तरी करमरकरांच्या गप्पा गोष्टी व विनोद यामुळे सुखदायक वाटे. इतका की, 'गेले ते दिवस' असे उद्गार त्यावेळचे आमचे सहकारी प्राध्यापक व विद्यार्थी अजूनही काढतात.

प्रा. करमरकर विद्यार्थिदशेत टेनिस व क्रिकेट शक्य तेव्हा खेळले होते व खऱ्या खेळाडूचे जे अनेक गुण–

शिस्त, वक्तशीरपणा, साधेपणा, सचोटी, मनाचा मोकळे-पणा व स्पष्टवक्तेपणा, त्यांनी पूर्णपणे आत्मसात् केले होते. ते प्राचार्य असताना, कॉलेजमधील खेळांची व शारीरिक शिक्षणाची सर्व सूत्रे त्यानी मजकडे सोपविली होती. व त्यांच्या प्रोत्साहनाने एस्. पी. कॉलेजला क्रिकेट, व्हॉलीबॉल व बास्केटबॉल, ॲथलेटिक्स व अनेक देशी खेळांतही वारंवार अग्रपद मिळत गेले व अनेक लौकिकवान खेळाडू तयार झाले.

कॉलेजमधून निवृत्त झाल्यावरही, एम्. ए., पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांना त्यांनी विनावेतन मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्यानंतर प्रा. दांडेकर प्राचार्य झाले असताना, त्यांच्या विनंतीवरून करमरकरांनी एक वर्ष अध्यापन मोठ्या खिलाडू वृत्तीने विनावेतन केले. निवृत्तीनंतर, भांडारकर प्राच्यविद्यासंशोधन संस्थेत, त्यांनी अगदी अखेरच्या आजारापर्यंत, अत्यंत तत्परतेने, रविवारची सुट्टीही न घेता, आपले संशोधन, लेखन व विद्यादान चालू ठेवले. पुणे विद्यापीठ स्थापन झाल्यावर, कार्यकारी मंडळासह इतर सर्व शाखांत त्यांनी हौसेने काम केले. डॉ. जयकरांच्या आजारात, तीन महिने प्रा. करमरकरांकडे कुलगुरुपदाची जबाबदारीही आली व ती त्यांनी उत्तम रीतीने पार पाडली.

कोणतेही काम अंगावर घेतल्यावर, ते शक्य तितक्या लवकर पार पाडण्यावर त्यांचा कटाक्ष असे. नियमांचे ज्ञान, अनुभव, तडफ व हजरजबाबीपणा व शिस्त यांच्या जोरावर, ते मोठ्या मतभेदाच्या व व संघर्षाच्या सभा, विशेष वादविवाद वाढवू न देता किंवा भलती चर्चा होऊ न देता, सहज पार पाडीत. त्यामुळे कामाचा उरक होऊन, वेळ वाया जात नसे. ताबडतोब निर्णय करणे व तो लगेच अमलात आणणे हा जो यशस्वी सेनापतीचा मुख्य गुण, तो त्यांच्या वर्तनात प्रामुख्याने दिसे.

ज्याला एकदा आपला म्हटले, त्याला हरतऱ्हेने मदत करणे हेही त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. एखादे वेळी रागाच्या भरात जरी ते कोणाला टाकून बोलले तरी आपली चूक कळल्यावर त्याची क्षमा मागण्यास ते खेळाडूप्रमाणे तयार असत. या त्यांच्या मनमोकळेपणामुळे, त्यांनी शिक्षणक्षेत्राबाहेरचेसुद्धा अनेक स्नेही जोडले.

अशा साध्या, सरळ, कर्तव्यनिष्ठ विद्वानाच्या निधना-मुळे शिक्षणक्षेत्राची–विशेषतः संस्कृत वाङ्मयाची–फार मोठी हानी झाली आहे. एस्. पी. मंडळी व कॉलेज यांचा तर एक तज्ज्ञ व विश्वासार्ह सल्लागार नाहीसा झाला आहे. पार्थिव देहाने जरी ते गेले असले तरी भर्तृहरीने नीतिशतकात म्हटल्याप्रमाणे "नास्ति तेषां यशः काये, जरामरणजं भयम्" असे खास सांगता येईल.

फोन्स { पुणे : ५६४२८
श्रीपूर : पी. सी. ओ. }

॥ श्री ॥

तारेचा पत्ता : श्री { पुणे
श्रीपूर }

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस : ९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे २
फॅक्टरी : श्रीपूर, व्हाया अकलूज, जि. सोलापूर

卐 卐 卐

卐 शुभ्र दाणेदार साखरेचे आणि रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरिटचे उत्पादक 卐

*बृहन्महाराष्ट्रातील मध्यम वर्गाने गुंतविलेल्या भांडवलावर यशस्वी रीतीने*
*चालू असलेला हा साखर कारखाना मध्यमवर्गीयांचे भूषण होय !*

**गो. श्री. वाळिंबे**
बी. कॉम्.
मॅनेजर

**शं. ल. लिमये**
बी. एस्सी., एलएल्. बी., वकील
अध्यक्ष

## प्री-डिग्रीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तके

**१ अभिनव अर्थशास्त्र**
लेखक : बाळ गाडगीळ
मूल्य **पाच** रुपये

**२ आधुनिक जग (१४५० ते १९६०)**
लेखक : प्रा. जी. डी. कुलकर्णी
प्रा. कविता नरवणे
मूल्य **सहा** रुपये

**३ श्रीहर्षविरचिता रत्नावली**
संपादक : श्री. ना. बनहट्टी
वा. का. क्षीरसागर
मूल्य **पाच** रुपये

## सुविचार प्रकाशन मंडळ

४६१।४ सदाशिव पेठ, पुणे २

**आमचे नवे प्रकाशन**

पुणे आणि शिवाजी विद्यापीठ ह्या विद्यापीठांनी बी. कॉम्. भाग १ प्रथमवर्ष (B. Com. Part I) ह्या परीक्षेसाठी नेमलेल्या बँकिंग (Banking) विषयाच्या अभ्यासक्रमानुसार लिहिलेला ग्रंथ

## बँक-व्यवसायाची मूलतत्त्वे आणि भारतातील बँका

: लेखक :
**प्रा. आर. एम्. गोखले**
स. प. कॉलेज आणि पुणे विद्यापीठ
**किंमत रुपये नऊ फक्त**

## कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे



**Dr. D. C. Pavate**
Vice - Chancellor, Karnatak University.

# Principal R. D. Karmarkar

I was shocked to hear the news of the sudden death of Principal R. D. Karmarkar. By his death, the Western India has lost one of the finest men I have ever come in contact with - a scholar, a sportsman, an administrator and above all, a man of genial temperament. We have lost in him a man of letters, who perhaps did more than any one to unlock to the students of the Humanities the treasure-house of ancient literature.

I first came in contact with him - not physically but intellectually - in 1919 when I read a Sanskrit drama Nagananda edited by him. Since then I began to read more of his Sanskrit works and admire his great intellectual calibre. We met for the first time in Poona in Principal Mahajani's bungalow in 1929 and after I took an appointment in Bombay in 1930, we became great friends. The popularity he deservedly enjoyed in the Bombay University was largely due to his spirit of accommodation, understanding of university problems and sense of humour. He looked on all educational problems from the point of view of public interest and was never motivated by selfish or partisan spirit. He was uniformly kind and accommodating despite the fact that there were two clear - cut parties in Bombay University during the period he was connected with it. Parties were meant only for election purposes; but once the election took place for the various bodies no party spirit was seen. Actually Principal Karmarkar was a powerful leader of one party, but he never allowed public interest to suffer on any account.

I admired his physical strength and vitality. We used to meet occasionally in the U. T. C camps. At that time, he was a commanding Officer of the military rank of Colonel and I well remember how he used to regale us during luncheons and dinners with interesting and humorous anecdotes. He loved military exercises, games, and sports. Although he was a simple vegetarian, he could hold his own before any body in acts of valour and bravery. Once we were travelling from Bombay to Poona in the Deccan Queen, chatting, laughing as usual, when an armed Englishman, probably a military officer - entered our compartment and began to misbehave. He was obviously drunk and we did not know how to manage him. Karmarkar immediately sprang on him like a tiger and overcame him in a minute and led him to the ground. That was at a time when the British were still ruling us !

When I left Poona and came over here as Vice-Chancellor it was only natural that I could look to him for assistance in the organisation of the Sanskrit department in the Karnatak University. We treated him practically as the head of our Sanskrit department. He used to come over here and help us in the selection of the staff and the organisation of the courses of studies for the various classes. His mature experience - academic as well as administrative - was always at our disposal and I am sure that his suggestions have been of great value in the shaping of our Sankrit syllabi; etc. at different levels and in the maintenance of standards. Though Principal Karmarkar had retired from active teaching, he continued to take interest in research and was always found in the Bhandarkar Institute, Poona. He spent his time in the critical examination and interpretation of Mahabharata and other classical works. As an experienced class-room teacher and post-graduate research guide, he was aware of the difficulties felt by the present day Sanskrit students in understanding the Sanskrit authors rightly, in sifting the accumulated research material properly and in arriving at judgements objectively and crtically. He, therefore, addressed himself to the none too easy task of analytical-critical studies of Sanskrit highlights with a wide general appeal. I am glad that when he completed the script on Kalidasa, in 1959, Prin. Karmarkar chose the Karanatak University as the venue and a course of four extension lectures were delivered by him here during the month of November.

The lecture course proved very successful, attracting the cultured public of Dharwar, and gave an incentive to our newly started

Sanskrit department in the Karnatak University. The published lectures proved even more popular, judging by the favourable reviews that have appeared in Indian and foreign journals of note. The work met a very urgent need of the time for a handy and masterly survey of Kalidasa, free at once from traditionalistic chauvinism and modernist apathy. Prin. Karmarkar was a rare fusion of deep understanding and objective judgement, of sensitive taste and singularly critical out-look. As I remarked in my foreword to this publication –

' In Prof. Karmarkar's treatment, emerges a clear picture of the ignorances as well as our knowledge of Kalidasa, his date and and works, though there is room for difference of opinion on some of these questions. The later sections cover all aspects of Kalidasa's poetic and dramatic genius . Each work of Kalidasa is fully described and critically assessed. His concluding appraisal of Kalidasa as a world poet provides a new approach and vindicates Kalidasa against some recent criticisms from the West. '

The general appreciation which the work received from all quarters prompted Prin. Karmarkar to undertake similar attempts in interpreting, evaluating and placing other master poets. He could complete his study of Bhavabhuti within a year and the Karnatak University was very happy to arrange another series of lectures on Bhavabhuti during September, 1961.

I had the honour of presiding over some of these lectures and seeing personally the great impressions they made on the audience. In fact, our students and teachers desired these lectures to be an annual feature. Prin. Karmarkar too readily agreed to give another course of lectures and he was as good as his words. His extension lectures on Bana were delivered in October, 1963. On being asked by audience to deliver similar lectures on Sankara, he willingly took up the work and gave the lectures in 1964. These were characterised by a thorough grip over the vast literature of Vedanta as well as by his ability to illumine the minutest detail on important topics like Mayavada. On that occasion he remarked in his usual humorous vein that his lectures might threaten to become an annual feature, and as good as his words, he wrote stating that he was ready for lectures on Harsha in 1965. Alas, he could not fulfil that engagement !

Two of these subsequent studies, viz. one on Bhavabhuti and the other on Bana have already been issued in the form of books by the Karnatak University. The last one, viz. on Sankaracharya's Advaita, is in the press and will be realased shortly.

Prin. Karmarkar himself has corrected some of the first proofs sent to him and it is such a pity that he has been snatched away by the cruel hand of fate when he was in the midst of useful work.

As in Prin Karmarkar's study of Kalidasa, so in these other studies, we find the same unerring discernment, masterly analysis and balanced judgement. He has not simply summarised earlier material on the subject, he has substantially contributed to the discussions on sources, chronology and authenticity of works of these authors by bringing in new evidence. That Kalidasa is anterior to Asvaghosa, and a contemporary of both Agnimitra and Vikrmaditya, that Bhavabhuti is identical with Umveka and that Bana is the author of the play Parvati-parinaya are some of the points, for instance, which have been argued out at length boldy and brilliantly.

During his visits to Dharwar, he used to impress one and all by his broad sunny humour and indomitable spirit. His strength of will was such that he would insist on walking up the hundred steps to the lecture hall despite his defective foot. Because of the unforgettable association and contact with the Karnatak University, the residents of the Karnatak University campus as well as the public of Dharwar town mourn Prin. Karmarkar's sad demise which is an irreparable loss to the world of scholarship. Has not the poet said - **na khalu sa uparatah yam janah smarati** ? Never is he dead who is remembered by people !

# शिष्यवृत्त्या व पारितोषिकांचे मानकरी

## राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळविणारे विद्यार्थी

**पदवीपूर्व शास्त्र**

चोपडे उषा
देसाई अंबालिका
अभ्यंकर एम्. एस्.
दातार ए. एन्.
जोगळेकर एस्. डी.
काळे लीली
पोंक्षे पी. जी.

**प्रथम वर्ष साहित्य**

निरफराके ए. एम्.

**प्रथम वर्ष शास्त्र**

केसकर उषा
कुलकर्णी एस्. एन.
कुदले ए. एल्.
तविलदार आर. एस.
वैद्य ए. व्ही.
अगरवाल एस्. टी.

**द्वितीय वर्ष साहित्य**

कुलकर्णी सुशीला
ठाकूर एस्. एम्.

**द्वितीय वर्ष शास्त्र**

साठये ए. एम्.
भाटे बी. एच्.

**तृतीय वर्ष शास्त्र**

प्रभुमिराशी एल्. एस.
गोखले एस्. बी.

## महाविद्यालयीन शिष्यवृत्ती मिळविणारे विद्यार्थी

**सत्र पहिले**

**पदवीपूर्व साहित्य**

फडणीस विद्या
गोखले एस्. बी.
राजर्षी एम्. बी.
भिडे कुमुदिनी
कुलकर्णी डी. व्ही.
रुद्र शोभा
जोशी गौरी
दिवाणजी प्रमोदिनी
भोरकर रंजना

**प्रथम वर्ष साहित्य**

पद्मा मेढेकर

**तृतीय वर्ष साहित्य**

जोशी रोहिणी
भट व्ही. एस्.
दिवेकर विजया
अठलेकर एस्. एल्.
आगाशे प्रतिभा
काळे शैला

**पदवीपूर्व शास्त्र**

चिरपुटकर सी. डी.
मोडक एस्. व्ही.
साठे ए. ए.
भिडे अरुणा
कुलकर्णी माधुरी
गोरे डी. बी.
जोशी एम्. के.

**प्रथम वर्ष शास्त्र**

कुलकर्णी एस्. एन्.
साने प्रतिभा
कुदळे ए. एल्.
गलगली शुभा
कुंडलकर डी. ओ.
कानडे पी. आर्.

**द्वितीय वर्ष शास्त्र**

कोळी पार्वती
परांजपे पुष्पा
कुलकर्णी विनोदिनी
अभ्यंकर शीला

**तृतीय वर्ष शास्त्र**

देवधर अलका
भाटवडेकर एस्. एम्.
गोखले एस्. बी.
केंजळे आर्. के.
गोरे एस्. व्ही.

**सत्र दुसरे**

**पदवीपूर्व साहित्य**

फडणीस विद्या
भिडे कुमुदिनी
जोशी गौरी
नगरकर अलका
राजर्षी एम. बी,

**प्रथम वर्ष साहित्य**

वाडीकर जी. व्ही.

**द्वितीय वर्ष साहित्य**

मोकाशी रजनी
कोल्हटकर उषा
गुणे जयश्री

**तृतीय वर्ष साहित्य**

जोशी रोहिणी
पटवर्धन सुलभा
दिवेकर विजया

**पदवीपूर्व शास्त्र**

मोडक एस्. डब्ल्यू.
जोशी पी. सी.
देवधर एम्. एम्.
रावतेकर एस्. डी.
शिरपुटकर सी. डी.
कुलकर्णी पी. व्ही.

**प्रथम वर्ष शास्त्र**

कारळे एस. आर.

**द्वितीय वर्ष शास्त्र**

कुलकर्णी विनोदिनी
नवले एन्. जी.
अभ्यंकर शीला

**तृतीय वर्ष शास्त्र**

भाटवडेकर एस्. एम्.
देवधर अलका

## विविध निबंधस्पर्धांत पारितोषिके मिळविणारे विद्यार्थी

१. **डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे निबंधस्पर्धा**
विषय : स्वातंत्र्योत्तर भारतातील समाजपरिवर्तन
यशस्वी स्पर्धक : निर्मला मोकाशी, तृतीय वर्ष साहित्य

२. **एच्. पी. देशमुख संस्कृत निबंधस्पर्धा**
विषय : गांधीजींचा गीताविषयक दृष्टिकोण
यशस्वी स्पर्धक : अविनाश माधव साठ्ये, द्वितीय वर्ष शास्त्र

३. **प्राचार्य व्ही. जी. आपटे संस्कृत निबंधस्पर्धा**
विषय : हर्षांची नाटके : रत्नावली, प्रियदर्शिका, नागानन्द
यशस्वी स्पर्धक : कु. जयश्री कानिटकर, तृतीय वर्ष साहित्य

४. **साळवेकर तत्त्वज्ञान निबंधस्पर्धा**
विषय : 'Human Rights : Nature and Implications.'
यशस्वी स्पर्धक : वि. के. कारेकर, तृतीय वर्ष साहित्य.

# विविध विभाग व मंडळे यांचे अहवाल

## वसतिगृह

**प्रवेश :**

वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी यंदा ४१० चे वर विद्यार्थ्यांचे अर्ज आले होते. त्यांची निवड करताना प्रामुख्याने वर्गवार गुणवत्तेचा दंडक लावण्यात आला. त्यामधून एकूण २१७ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. यंदा बॉम्बे मिल ओनर्सने बांधून दिलेल्या इमारतींपैकी दोन गाळे वसतिगृहाच्या ताब्यात मिळाल्याने सात जादा विद्यार्थ्यांना या वर्षी प्रवेश देण्यात आला.

सक्तीच्या एन्. सी. सी. योजनेत १७२ विद्यार्थी सामील झाले असून १० विद्यार्थ्यांना शारीरिक अक्षमतेमुळे सूट मिळाली आहे.

दिनांक २७ जून १९६५ रोजी वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांची प्रारंभिक सभा प्राचार्य रा. रा. मालेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

**वैद्यकीय तपासणी :** विद्यापीठ आरोग्य योजनेनुसार सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी जुलैच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण करण्यात आली.

या कामी वसतिगृहांचे सन्मान्य डॉक्टर श्री. फडके व विद्यापीठ योजनेचे वैद्यकीय चिटणीस डॉ. गोडबोले यांचे बहुमोल साह्य झाले.

दिनांक ९-६-१९६५ रोजी वसतिगृहामार्फत सर्व विद्यार्थ्यांना मोफत टीएबी इनॉक्युलेशन्स व देवी टोचण्याचे कार्य करण्यात आले. या कामी पुणे कॉर्पोरेशनच्या आरोग्याधिकाऱ्यानी मौलिक साहाय्य केले.

डॉ. म. रा. फडके हे गतवर्षीप्रमाणेच वसतिगृहांचे वैद्यकीय सल्लागार म्हणून नियुक्त केले असून ते दर आठवडयास वसतिगृहास भेट देऊन आरोग्य व स्वच्छता याबद्दल मार्गदर्शन करतात.

**गृहपेढी :** वसतिगृहपेढीने आपली उपयुक्तता गेल्या सहा वर्षात निर्विवादपणे प्रस्थापित केली आहे. विद्यार्थिजगतात ती लोकप्रिय झाली आहे. यंदा वर्षाच्या सुरवातीस प्रत्येक खातेदारास गृहपेढी पासबुक देण्यात आले. त्यामुळे बँकिंगच्या कामाची चांगली कल्पना विद्यार्थ्यांना येईल अशी अपेक्षा आहे. यंदा एकूण १६५ विद्यार्थ्यांची खाती गृहपेढीत उघडली गेली.

**सहकारी कँटीन :** विद्यार्थी सहकारी कँटीनचे कार्य यंदा प्रगतिपथावर आहे. पहिल्या सत्रामध्ये श्री. न. चि. तळवलकर यांनी कँटीन सेक्रेटरीची धुरा स्वीकारून फार चांगल्या रीतीने काम केले. यंदा कँटीनमध्ये वह्या, पेन्सिली, ब्लेड्स, हँगर्स इत्यादी विद्यार्थीपयोगी साहित्यही विक्रीसाठी ठेवण्यात आले. या कामी नू. म. वि. विद्यार्थी भांडाराने सर्वतोपरी सहकार्य केले. दुसऱ्या सत्रामध्ये श्री. खरात, श्री. पर्वते, व श्री. ठाकूर यांनी कँटीनचे काम अंगीकृत केले आहे. कँटीनच्या शिस्तबद्ध कार्यामुळे पहिल्या सत्रात एकूण २२२१–०८ एवढ्या रुपयांची विक्री झाली व रुपये २८०–१० एवढा निव्वळ नफा मिळाला. दुसऱ्या सत्राच्या पहिल्या दोन महिन्यात रुपये १०० च्या वर नफा झालेला आहे.

**विद्यार्थी संसद :** विद्यार्थी संसद् म्हणजे वसतिगृहाची लोकसभाच. संसदेची मुदत एका सत्रापुरतीच असते. त्यामुळे प्रत्येक सत्रारंभी संसदेच्या निवडणुका हिरीरीने होतात. पहिल्या सत्रामध्ये दिनांक २८-६-१९६५ रोजी निवडणुका झाल्या व श्री. माधव नथू अहिरे ( तृतीय वर्ष साहित्य ) यांची जनरल सेक्रेटरी म्हणून अविरोध निवड झाली. व विभा-

गीय प्रतिनिधी म्हणून सर्वश्री पठारे, राव, बुरुटे, ओक गोंजारी, केंजळे, देशपांडे, चिटणीस, पाटणकर, काळे, जाधव बा. गो., अबचट ग. ज., निवडले गेले. श्री. अविनाश साठये यांची पालवीच्या संपादकपदी अविरोध निवड झाली.

द्वितीय सत्रामध्ये श्री. अण्णासाहेब पठारे (प्रथम वर्ष शास्त्र) हे बहुमताने निवडून आले व विभागीय प्रतिनिधी म्हणून सर्वश्री द. चि. कुलकर्णी, म. ना. जोशी, अ. ग. देशपांडे, रतिलाल व्होरा, प्रकाश जैन, सुभाष नेऊरगावकर, सुदाम तांबे, प्रकाश जोशी, नंदकुमार तळवलकर, सुभाष कोंडा, हिरालाल ओसवाल व देवराज शर्मा निवडले गेले.

**गणशोत्सव** : सोमवार दिनांक ३० ऑगस्ट १९६५ रोजी वसतिगृहांचा गणेशोत्सव मोठया थाटाने साजरा करण्यात आला. सायंकाळी पाच वाजता एक चिंतनीय परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. विषय होता : आजच्या शिक्षणाने विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविले जाते का ? व अध्यक्षस्थानी होते महाराष्ट्रातील चिंतनशील विज्ञानाचे पुरस्कर्ते श्री. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे. युवक चळवळीशी निकटचा संबंध आलेले वक्ते या परिसंवादाला लाभलेले होते. ज्ञानप्रबोधिनीचे संचालक डॉ. अप्पासाहेब पेंडसे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते डॉ. वसंतराव राहुरकर, राष्ट्रसेवादलाचे श्री. यदुनाथ थत्ते, कॉंग्रेस सेवादलाचे श्री. दंडवते, एन्. सी. सी.मधील ले. प्रा. शि. श्री. काळे. व प्रा पां. श्री. घारे यांनी विभिन्न दृष्टिकोनातून आजच्या शिक्षणाच्या व शिक्षणपद्धतीच्या उणिवा दाखविल्या. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात शिक्षणाचे हेतू लक्षात घेऊन त्याचे मूल्यमापन व्हावे असे सुचविले.

राष्ट्रहाकेला ओ देऊन अनेक विद्यार्थ्यांनी रक्तदानासाठी नावे नोंदविली. सैनिक कल्याण निधीसाठी मदत गोळा करण्यातही विद्यार्थ्यांनी हातभार लावला. इमर्जन्सी कमिशन घेऊन सैन्यदलामध्ये जाण्याची तयारी काहींनी दाखविली व अभिमानाची गोष्ट की विद्यार्थी रत्नाकर अकोलकर (तृ वर्ष शास्त्र) याची रेग्युलर आर्मी शॉर्ट सर्व्हिस कमिशनसाठी निवड झाली असून तो पुढील जुलै पासून मद्रास येथील शिक्षणकेंद्रात शिक्षणासाठी दाखल होईल. त्याला आमच्या शुभेच्छा.

**सुपरिन्टेंडेंट** : वसतिगृहाचे सुपरिन्टेंडेंट म्हणून यंदाच्या वर्षी श्री. सी. आर. अरगडे, बी. ए. (इंग्लिश ऑनर्स) यांची नेमणूक करण्यात आली.

**हस्तलिखित** : वसतिगृहाची 'पालवी' विकसित करण्याची धुरा श्री. अविनाश साठये यांनी स्वीकारली. त्यांच्या नेतृत्वाने एक संपादकमंडळ या कामासाठी तयार झाले. त्यांच्या प्रयत्नाने व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने आज पालवी नवीन आकर्षक स्वरूपात आकारित झाली. वसतिगृहदिनाचे पाहुणे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गोपाल नीळकंठ दांडेकर यांच्या शुभहस्ते पालवीचा प्रकाशन-समारंभ दिनांक ३०–१–१९६६ रोजी झाला. पालवीच्या संपादक लेखकांना शतशः धन्यवाद.

**वसतिगृह दिन** : विद्यार्थी विद्यार्थिनींच्या वसतिगृहांचा संयुक्त वसतिगृहदिन जानेवारी २९ व ३० रोजी श्री. गो. नी. दांडेकर यांच्या अध्यक्षतेने साजरा करण्यात आला.

**रं. ना. गायधनी**
वसतिगृह प्रमुख

## ग्रंथालय

**ग्रंथालय माहितीपत्रक** : ग्रंथालयाचा जास्तीत जास्त सदुपयोग व्हावा या दृष्टीने यंदा आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सुरुवातीला ओळखपत्र देताना ग्रंथालय माहिती-पत्रक देण्यात आले. त्यामध्ये ग्रंथालयासंबंधी त्रोटक माहिती व त्याचा उपयोग कसा करावा याचे मार्गदर्शन करण्यात आले. त्याचा बराच उपयोग होत असल्याचे वर्षभराच्या मुख्य ग्रंथालयातील उपस्थितीवरून आढळून आले आहे.

**विद्यापीठ अनुदान मंडळ : कर्जाऊ पाठ्य-पुस्तकयोजना** : तृतीय पंचवार्षिक योजनेतून विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे आपल्या महाविद्यालयाला मिळालेल्या दहा हजार रुपयांच्या अनुदानातून १३५० पुस्तके घेतली आहेत. ती हुशार आणि गरजू विद्यार्थ्यांस वर्षभर वापरण्यास देण्यात आली. त्यासाठी योग्य विद्यार्थ्यांची निवड करण्याचे आणि शिफारस करण्याचे काम गतवर्षी प्रमाणे यंदाही ग्रंथालयसमितीच्या पुढील सभासदांनी तत्परतेने केले : प्रा. पी. एस्. घारे, प्रा. ए. एस्. मुतालिक देसाई, प्रा. लीला अर्जुनवाडकर, प्रा. तारा केळकर, प्रा. एस्. जी. लागू, प्रा. एस्. एच्. गाडगीळ. त्यांच्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

पुढीलप्रमाणे पुस्तकांचे वाटप करण्यात आले :

| वर्ग | विद्यार्थी | पुस्तके |
|---|---|---|
| पदवीपूर्व साहित्य | ६६ | १९४ |
| प्रथम वर्ष साहित्य | ६१ | १०४ |
| द्वितीय वर्ष साहित्य | ६६ | १८५ |
| तृतीय वर्ष साहित्य | ५२ | ११० |
| | २४५ | ५९३ |
| पदवी पूर्व शास्त्र | ९४ | ३४७ |
| प्रथम वर्ष शास्त्र | ८१ | १५६ |
| द्वितीय वर्ष शास्त्र | ६० | १३९ |
| तृतीय वर्ष शास्त्र | ३७ | ७५ |
| | २७२ | ७१७ |
| | ५१७ | १३१० |

**पाहुण्यांच्या भेटी** : यावर्षी विशेष उल्लेखनीय भेट म्हणजे माजी राष्ट्रीय ग्रंथालय ग्रंथपाल यांची. पद्मश्री डॉ. बी. एस केशवन् हल्ली, डायरेक्टर, इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेण्टेशन सेंटर, नवी दिल्ली, यांचे येथील ग्रंथालय संघाच्या विद्यमाने दि. २२ जून १९६५ रोजी सायंकाळी ६॥ वाजता आपल्या ग्रंथालयात 'ग्रंथपालनव्यवसाय' या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी आपल्या ग्रंथालयाच्या व्यवस्थेबद्दल त्यांनी प्रकटपणे समाधान व्यक्त केले.

**पुस्तक देणग्या** : कै. व्ही. जी. श्रोत्रीय, सोलापूर, यांच्या नावाने वडिलांची आठवण म्हणून श्री. एम. व्ही. श्रोत्रीय यांनी १२७ पुस्तके आपल्या ग्रंथालयांस देणगी दिली आहेत. ही पुस्तके प्रामुख्याने इंग्रजी वाङ्मयाची आहेत.

महाविद्यालयातील निवृत्त प्राध्यापक डॉ. के. ना. वाटवे यांनी आपली प्रामुख्याने संस्कृत वाङ्मयावरील ४१ पुस्तके ग्रंथालयाला देणगी म्हणून दिली आहेत.

पुस्तक देणगीबद्दल आम्ही या उदार देणगीदारांचे अत्यंत आभारी आहोत.

**गरीब विद्यार्थी पुस्तक पेढी** : या पेढीत या वर्षी २७ ग्रंथांची भर पडून एकूण संख्या २२२ झाली आहे. यामधील पुस्तके विद्यार्थ्यांच्या गरजेप्रमाणे यंदा विद्यार्थ्यांनी वापरण्यासाठी देण्यात आली.

खालील आजी-माजी विद्यार्थ्यांनी पुस्तकांची देणगी दिली :

| | |
|---|---|
| सौ. लीला खिस्ते | ३ पुस्तके |
| श्री. जी. आर देशपांडे | १ पुस्तक |
| कु. माणिक लुकतुके | ६ पुस्तके |
| कु. लीला रा. नानल | २ पुस्तके |
| श्री. यू. व्ही साने | २ पुस्तके |
| कु. अरुणा दंडवते | ४ पुस्तके |
| कु. शशिकला गो. बर्वे | १ पुस्तक |
| कु. इरावती दत्तात्रय दिवेकर | २ पुस्तके |
| श्री. एस्. डी. जोगळेकर | ४ पुस्तके |
| श्री. शांतिलाल रा. गांधी. | २ पुस्तके |

इतरांनीही वरील विद्यार्थ्यांचे अनुकरण करण्यासारखे आहे. आपल्या गरीब व गरजू सहाध्यायांना साहाय्य करण्याचे फार मोठे श्रेय त्यायोगे मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्याजवळील आपली पाठ्य-पुस्तके व संदर्भ पुस्तके परीक्षा झाल्यावर, त्यांचे काम झाल्यावर, ग्रंथालयात वरील पुस्तकपेढीसाठी देणगी म्हणून दिली तर ग्रंथालय त्यांचा मोठ्या आनंदाने स्वीकार करील.

**ग्रंथालय परिषद** : रत्नागिरी येथे महाराष्ट्र राज्यग्रंथालयसंघाच्या सतराव्या अधिवेशनासाठी डिसेंबर १९६५ मध्ये महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून ग्रंथपाल श्री. अ. रा. मेहेंदळे उपस्थित होते. तसेच यंदाच्या उन्हाळ्यात महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघातर्फे पुणे येथे होणाऱ्या ग्रंथपालनवर्गास एक विषय शिकविण्यासाठी ग्रंथपाल श्री. अ. रा. मेहेंदळे यांची निवड झाली आहे.

**अ. रा. मेहेंदळे** — ग्रंथपाल

**श्री. र. कावळे** — ग्रंथालय प्रमुख

## जिमखाना

**क्रिकेट** : जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून प्रा. करमरकर आणि श्री. मोहोनी यांच्या मार्गदर्शनाखाली सरावास सुरुवात झाली. आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व रणजी ट्रॉफी क्रिकेटपटू श्री. सदानंद मोहोळ यांनी खेळाडूंस उत्तम कोचिंग दिले. श्री. सुरेश पुरंदरे यांनीही बरेच श्रम घेतले.

यंदा आपण महाविद्यालयीन सामन्यात आपल्या विभागात सर्व संघांत जास्त गुण मिळवून आघाडी मिळविली. या वर्षीच्या लीगच्या पाच सामन्यांत आपल्या संघाकडून श्री. नरेश दुबल व श्री. राजू लोखंडे यांनी दोनशेच्यावर धावा केल्या. श्री. अशोक मोहोळ यांनी सर्वात जास्त गडी बाद करून संघास आघाडीवर आणण्यास मदत केली. लीगमध्ये सर्वात जास्त गुण मिळविण्याचे सर्व श्रेय सर्वश्री नरेश दुबल, अशोक मोहोळ, अरविंद मेहेंदळे

With Best of
Compliments From

**SANTOSH BHUVAN**

Prop. Babubhai D. Gathani

Near N. M. V. High School
POONA-2.
Tel. No. : 56076

**अेन्. पद्माकर टेलर्स**

जेन्टस स्पेशॅलिस्ट

प्रोप्रा. प. रा. नेऊरगावकर
बी. ए.

५५१ शनिवार पेठ,
कन्याशाळेसमोर, पुणे २.



राजू लोखंडे, मधू साळवी यांच्याकडे जाते. ह्यावर्षी प्रथमच दुसऱ्या सत्रात घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन सामन्यात आपल्या संघाला दोन सामने खेळावयास मिळाले.

कॉमर्स कॉलेजबरोबर झालेल्या पहिल्या सामन्यात श्री. वसंत शर्मा व श्री. मधू साळवी यांनी अनुक्रमे ९० व ७५ धावा केल्या आणि श्री. अशोक मोहोळ यांनी ५ गडी बाद करून सामना जिंकण्यास मदत केली.

इंजिनिअरिंग कॉलेजशी झालेल्या अंतिम सामन्यात श्री. नरेश दुबल यांनी एका इनिंगमध्ये सर्वांत जास्त–१६१–धावा केल्या. सर्वश्री नरेश दुबल, अशोक मोहोळ राजू लोखंडे, अरविंद मेहेंदळे या सर्वांच्या उत्कृष्ट खेळामुळे हा सामना जिंकून या वर्षीचे **अजिंक्यपद** आपण मिळविले आहे.

पुणे विद्यापीठाकडून खेळणाऱ्या संघात श्री. राजू लोखंडे, श्री. नरेश दुबल, श्री. मधू साळवी, श्री. अशोक मोहोळ व श्री. अरविंद मेहेंदळे यांची निवड झाली.

या वर्षी आपल्या संघातील श्री. मधू साळवी व राजू लोखंडे यांची महाराष्ट्राच्या संघात रणजी करंडक सामन्यासाठी प्रथमच निवड झाली.

**फुटबॉल** : श्री. तुळशीराम यांची कोच म्हणून नियुक्ती करण्यात आली.

सर्वश्री सूर्यकांत मोतलिंग, शाम जोशी, मरकळे, शिवाजी तेलके, रमेश गायकवाड आणि मनोहर शहा यांचा खेळ आशादायक वाटला.

**हॉकी** : आंतरमहाविद्यालयीन हॉकी लीगमध्ये आपणास तिसऱ्या क्रमांकावर वैयक्तिक गोल फटकाविण्याबद्दल सतत बावीस वर्षे मिळणारा मान यंदा आपल्या संघातील श्री. सूर्यकांत मोतलिंग यांनी २४ गोल करून मिळविला.

आंतरमहाविद्यालयीन हॉकी लीग कमिटीमध्ये श्री. मनोहर शहा यांची असिस्टंट जनरल सेक्रेटरी म्हणून निवड झाली.

श्री. सूर्यकांत मोतलिंग आणि आपल्या कॉलेजचे माजी विद्यार्थी श्री. जगताप यांची पुणे विद्यापीठ हॉकी संघात निवड झाली

**व्हॉलीबॉल, बास्केटबॉल** : सतत चार वर्षे अजिंक्यपद मिळवणाऱ्या आपल्या व्हॉलीबॉल संघाने याही वर्षी–म्हणजे पाचव्या वेळेस–**अजिंक्यपद** मिळविले. संघनायक श्री. वानखेले गेली दोन वर्षे आंतर विद्यापीठ सामन्यात खेळले. या वर्षी श्री. सुभाष आंबेकर, श्री. जयप्रकाश दळवी व श्री. सुहास गिरमे यांची इंटरग्रूप सामन्यांकरिता निवड होऊन पूना ग्रूपने अजिंक्यपद मिळविले.

माजी विद्यार्थी श्री. विलास कुलकर्णी यांची महाराष्ट्रातर्फे नॅशनल व्हॉलीबॉल सामन्यासाठी निवड झाली.

बास्केटबॉलमध्ये आपल्या महाविद्यालयाने **उपविजेतेपद** मिळविले. आंतर विद्यापीठ बास्केटबॉल सामन्यासाठी श्री. बाळू गोखले व श्री. डी. एल. आगटे यांची निवड झाली.

## इंडियन गेम्स

**कबड्डी**: श्री. बी. डी. फाटक यांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डीचा सराव झाला. राणाप्रताप संघाच्या वतीने झालेल्या लीग सामन्यात आपल्या संघाने **उपविजेतेपद** मिळविले. आंतरमहाविद्यालयीन सामन्यात कबड्डी मध्ये प्रथम क्रमांक मिळविला. याचे सर्व श्रेय श्री. शिवाजी जगताप, श्री. सुरेश नांगरे, श्री. तानाजी गाडे, श्री. चव्हाण व श्री. अशोक शिंदे यांस आहे.

श्री. सुरेश नांगरे यांची पुणे विद्यापीठ कबड्डी संघात संघनायक म्हणून निवड झाली.

पाचगणी येथे झालेल्या महाराष्ट्र–राज्याच्या चाचणी सामन्यांत श्री. सुरेश नांगरे व श्री. शिवाजी जगताप यांची पुणे जिल्हा कबड्डी संघात निवड झाली. अशोक शिंदे व तानाजी गाडे यांची पुणे विद्यापीठ संघात निवड झाली.

**आटयापाटया** : गेली सतत सहा वर्षे आपल्या महाविद्यालयाला आंतरमहाविद्यालयीन सामन्यात विजय मिळत आहे, याचे सर्व श्रेय सर्वश्री धुपकर, शाम पुरोहित, सुनील तांबे व नातू यांना आहे.

**खोखो** : गेल्या वर्षीप्रमाणेच यंदा आपच्या संघाने विजय मिळविला. श्री. धुपकर यांची पुणे विद्यापीठाच्या खोखो संघात संघनायक म्हणून निवड झाली. श्री. शाम पुरोहित व श्री. सतीश नातू यांची पुणे विद्यापीठ संघात निवड झाली. माजी विद्यार्थी श्री. मधुसूदन झंवर यांना इंदूर येथे इंदूर कॉर्पोरेशनतर्फे भरलेल्या अखिल भारतीय खोखो स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू म्हणून पारितोषिक मिळाले. सर्वश्री शाम पुरोहित, नातू, तांबे, भाटे, सोमण, वाघ, जायदे यांची पुणे येथे झालेल्या पाचव्या महाराष्ट्र राज्य क्रीडामहोत्सवात पुणे शहर खोखो संघात निवड झाली.

या वर्षी झालेल्या **खोखो, आटयापाटया** व

**कबड्डी यातीनही** सामन्यांत आपल्या महाविद्यालयाने विजय मिळविला आहे. असा योग जवळ-जवळ आठ-दहा वर्षांनी आला आहे त्याबद्दल सर्व खेळाडूंचे मन:पूर्वक अभिनंदन.

**जिम्नॅशियम :** माजी विद्यार्थी श्री. झंवर यांनी वजन उचलण्याच्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**जिम्नॅस्टिक्स :** गेली आठ वर्षे सातत्याने आपण यात अग्रभागी आहोत. याही वर्षी आपल्या संघाने आपल्या महाविद्यालयाला २१ गुण मिळवून देऊन यशाची परंपरा राखली आहे. त्याचे सर्व श्रेय श्री. चव्हाण व श्री. एस्. डी. गुर्जर व या विभागाचे शिक्षक श्री. मो. ध. गुर्जर यांच्याकडे जाते.

**कुस्ती :** श्री. नांगरे आणि श्री. बानखेले यांनी या या विभागात अपूर्व यश संपादन केले आहे.

**मुष्टियुद्धात** श्री. श्रोत्री आपल्या गटात अजिंक्य ठरले.

**लेडीज इंडियन गेम्स :**

**पोहणे :** कु. शकुंतला घाटे यांस १०० मीटर्स बॅक स्ट्रोकमध्ये पहिले पारितोषिक मिळाले. कु. नीला गोखले यांस १०० मीटर्स ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये पहिले पारितोषिक मिळाले. कु. घाटे, कु. नीला गोखले, कु. पद्मा गोखले व कु. हिरा महाजन यांना ४ × १०० मीटर्स रीले मध्ये दुसरे पारितोषिक मिळाले. कु. घाटे व कु. नीला गोखले यांची आंतरविद्यापीठ सामन्यात निवड झाली होती.

**कबड्डी :** आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धात मुलींनी सतत तीन वर्षे **अजिंक्यपद** मिळविले.

कु. सातव व माजी विद्यार्थिनी कु. लीला फडके यांची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली.

**ॲथलेटिक्स :** कु. माधुरी अभ्यंकर यांनी हर्डल्समध्ये व कु. वासंती सातव यांनी उंच उडीत आणि कु. रजनी चापेकर यांनी थाळीफेकमध्ये उच्चांक प्रस्थापित केले. कु. चापेकर यांची व्हर्सिटीसाठी निवड झाली.

**लेडिज बॉल गेम्स :** यंदा प्रथमच झालेल्या व्हॉलीबॉल सामन्यात आपल्या संघास **अजिंक्यपद** मिळाले. थ्रोबॉलमध्ये दुसरा क्रमांक मिळाला. कु. आजगावकर, कु. सहस्रबुद्धे, कु कानडे यांची महाराष्ट्रराज्य थ्रोबॉल संघात निवड झाली.

**लेडिज जनरल :** या वर्षी झालेल्या आंतर-महाविद्यालयीन बॅडमिंग्टन व रिंग टेनिस स्पर्धात विद्यार्थिनींनी सेकंड बेस्ट मिळविले. कु रोहिणी जोशी, कु. वसुंधरा शिरोळे या बॅडमिंग्टन खेळल्या. कु. शिरोळेची पूना ग्रूपसाठी निवड झाली, कु. प्रभा गद्रे हिची टेबलटेनिस पूना ग्रूपसाठी निवड झाली. कु. अरुणा दाखवे व कु. वैशंपायन यांनी रिंगटेनिस दुहेरी सामन्यात प्रावीण्य दाखविले.

**मा. रा. मोडक** — जनरल सेक्रेटरी
**रा. वि. घाटे** — जिमखाना चेअरमन

## शारीरिक शिक्षण विभाग

यंदाच्या वर्षीही लष्करी शिक्षण सक्तीचे होते, त्यामुळे मुलांसाठी शारीरिक शिक्षण हे फक्त लष्करी शिक्षणातील वैद्यकीय तपासणीनंतर राहिलेल्या मुलांसाठीच होते. शारीरिक शिक्षणाचे तास १५ ऑगस्टला सुरू करण्यात आले. श्री. ए. एस. गोखले यांना गटप्रमुख नेमण्यात आले.

मुलींसाठी शा शि. तास ७ जुलै १९६५ रोजी सुरू करण्यात आले व त्यासाठी पुढीलप्रमाणे नेमणुकी झाल्या.

प्रभात विभाग :— विजया रानडे, द्वितीय वर्ष साहित्य
सायंविभाग :- (१) मंगला कुलकर्णी, द्वितीय वर्ष साहित्य
(२) छाया गुमास्ते, द्वितीय वर्ष साहित्य

यंदा शारीरिक-क्षमता-मोहिमेत आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने भाग घेतला होता.

**भ. रा. जोशी**
शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख

## लोकमान्य टिळक ग्रंथालय आणि वादसभा

**उद्घाटन :** लोकमान्य टिळक ग्रंथालय व वादसभा यांचे यावर्षीचे उद्घाटन लो. टिळक-पुण्यतिथी-च्या दिवशी १ ऑगस्ट १९६५ रोजी—प्रा. गं. बा. सरदार यांच्या हस्ते झाले. लो. टिळकांचे राजकारण व ध्येय याबद्दल त्यांनी ओजस्वी विचार विद्यार्थ्यांना सांगितले.

**स्मृतिदिन :** १० सप्टेंबर रोजी प्रतिवर्षी-प्रमाणे हुमात्मा वसंत दाते-स्मृतिदिनानिमित्त प्रा. ग. प्र.



## नाट्य मंडळाचे पदाधिकारी

**बसलेले :** श्री. सुरेश बसाळे (कार्यवाह) प्रा. शं. रा. देशपांडे (कार्याध्यक्ष) उप-प्राचार्य रं. ना. गायधनी, प्राचार्य रा. रा. मालेगावकर, श्री. श्रीराम खरे, दिग्दर्शक; कु. जया जोगळेकर.
**उभे :** कु. मीना दामले, श्री. मुकुंद भालवणकर, श्री. के. डी. शिंदे, श्री. दिलीप तक, श्री. राज सासवडकर, कु. ज्योती फडके.

' Enjoy we did, but not forgetting the Jawans. '

## नाट्यमंडळाचे यशस्वी कलाकार

**बसलेले :** क. ६ कु. शोभना मांडके ( नाट्य वाचन )
**उभे :** कु. अरुणा भिडे (नृत्य) कु. शशिकला शिरगोपीकर ( शास्त्रीय गायन )
कु. नलिनी गांगल ( शास्त्रीय गायन )
**अनुपस्थित :** श्री. तापीकर ( नाट्य वाचन ), श्री. वझे ( सतार वादन )



'नवीन रक्तानं नांव राखलं...!'



## वाद सभा

**बसलेले :** श्री. विष्णू भालेराव श्री. आनंद हर्डीकर, कु. अंजली फडके, डॉ. घाटे, प्राचार्य मालेगावकर, उप-प्राचार्य गायधनी, प्रा. द. वि. कुलकर्णी (कार्याध्यक्ष), श्री. मोडक, श्री. हेमंत साने (कार्यवाह).
**उभे:** दत्तू भोईटे (शिपाई सेवक)

'Keep it up!'



पुरुषांच्या आंतर-
महाविद्यालयीन
खो खो चे विजेते

' Galloping Towards a Hat-Trick ! '

आंतर-
महाविद्यालयीन
आट्यापाटच्या
विजेते



' Unconquerable ? — No. Monopoly ! '



मुलींच्या आंतर-
महाविद्यालयीन
कबड्डीच्या
विजेत्या

प्रधान यांनी, त्या हौतात्म्याच्या काळाच्या काही भावपूर्ण व स्फूर्तिदायक स्मृती सांगितल्या. याच वेळी हुतात्मा वसंत दाते पारितोषिके पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आली.

**परदेशी विद्यार्थ्यांची भेट :** 'अमेरिकन—फील्ड—सर्व्हिस' तर्फे पुण्यात आलेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला भेट दिली. हेमंत साने यांनी भारतीय संस्कृतीविषयी भाषण केले. नंतर अमेरिकन व भारतीय सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रांतील प्रश्नांची चर्चा झाली. पाहुणे--विद्यार्थ्यांना काही वस्तू भेट म्हणून देण्यात आल्या.

**उज्वल यश :** न्यायमूर्ती रानडे वाद स्पर्धेत आपल्या महाविद्यालयास या वर्षी उपविजेतेपद मिळाले. विजेत्या संघात आनंद वासुदेव हर्डीकर, पदवी पूर्व साहित्य व विष्णू हरी भालेराव, पदवी वर्ग द्वितीय वर्ष; हे होते.

प्राचार्य सबनीस स्पर्धेत कु. अंजली फडके व श्री. अशोक निरफराके यांना अनुक्रमे दुसरे व तिसरे पारितोषिक मिळाले.

यावर्षी अखिल भारतीय विद्यार्थी–परिषदेच्या वतीने झालेल्या समरगीतांच्या स्पर्धेत आपल्या कॉलेजच्या संघास पहिले पारितोषिक मिळाले. या संघात श्रीकांत दादरकर, अनिल गोडे, वीणा दांडेकर, माढेकर, आनंद बक्षी, अरुणा वैद्य, शोभना काळे व कौमुदी पंडित यांनी भाग घेतला होता.

**महाविद्यालयांतर्गत स्पर्धा :**

वादसभेतर्फे या वर्षी प्रथमच डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे पारितोषिकासाठी अभिरूप लोकसभेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'भारताने आता राष्ट्रकुलातून बाहेर पडावे' या महत्त्वाच्या विषयावर श्री. मामासाहेब देवगिरीकर यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा झाली. [ सविस्तर माहिती, 'महाविद्यालयीन वार्ता' सदरात दिली आहे. ]

लो. टिळक निबंध स्पर्धेत श्री. आनंद हर्डीकर यांना पहिले पारितोषिक मिळाले.

परशुरामीय वक्ता म्हणून श्री. आनंद हर्डीकर यांची निवड झाली. या उत्स्फूर्त भाषणाच्या स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेला कै. प्रा. दांडेकर कप त्यांना मिळाला.

परशुरामीय गायिका : शास्त्रोक्त संगीताच्या स्पर्धेत नलिनी गांगल यांना पहिला क्रमांक व अरुणा वैद्य यांना दुसरा क्रमांक मिळाला; व सुगम संगीतात रजनी मोकाशी यांना पहिला क्रमांक व मीनाक्षी खरे यांना दुसरा क्रमांक मिळाला.

परशुरामीय गायिका म्हणून नलिनी गांगल यांची निवड झाली.

**प्रा. द. वि. कुलकर्णी** — कार्याध्यक्ष
**हेमंत साने** — कार्यवाह
**प्रा. चं. शं. बर्वे** — उपकार्याध्यक्ष

## नाट्यमंडळ

महाराष्ट्रीय कलोपासकातर्फे दरवर्षी होणाऱ्या पुरुषोत्तम करंडक एकांकिकास्पर्धेत आपल्या महाविद्यालयाने दोन एकांकिका सादर केल्या. यंदाचे वैशिष्ट्य म्हणजे या दोन्ही एकांकिका महाविद्यालयातील प्राध्यापकांनी लिहिलेल्या आहेत. : १ 'शूरा मी वंदिले !' ( ले. प्रा. प्र. रा. भुपटकर ) व २ 'पितृदेवोभव !' (ले. प्रा. शं. रा. देशपांडे ) पहिली गंभीर तर दुसरी नर्मविनोदी. या एकांकिकांत भाग घेणाऱ्या खालील विद्यर्थिकलाकारांना अभिनयनैपुण्याबद्दल प्रशस्तिपत्रके मिळाली : 'शूरां मी वंदिले !' : कु. शरयू गोगटे ( मंजुळा. ) श्री. धनंजय गोळे ( जयवंत ) 'पितृदेवोभाव !' : १. कु. जया जोगळेकर ( कमलाबाई ). दोन्ही एकांकिकांचे दिग्दर्शन श्री. श्रीराम खरे यांचे होते.

प्रो. ड्रॅ. असोसिएशनने आयोजित केलेल्या नाट्य वाचन स्पर्धेत २ नाटकांचे वाचन महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांनी सादर केले. त्यात 'फास' ( अनंत काणेकर ) या नाटकाचे वाचनास दुसरे सांघिक पारितोषिक मिळाले. त्यात वाचन करणाऱ्या दोन्ही विद्यार्थ्यांना वाचिक अभिनयाबद्दल प्रशस्तिपत्रके मिळाली : १. श्री. द. ना. तावीकर २. कु. शोभना मांडके.

दुसऱ्या सत्राचे सुरुवातीस नाट्यमंडळाच्या कार्यकारिणीच्या सभासदत्वासाठी अर्ज मागवण्यात आले. त्यातून खालील विद्यार्थि-विद्यार्थिनींची निवड करण्यात आली : श्री सुरेश बसाळे, कार्यवाह. श्री. दिलीप तक, श्री. मुकुंद भालवणकर. श्री. राज सासवडकर, श्री. के. डी. शिंदे, कु. जया जोगळेकर, कु. मीना दामले, कु. ज्योती फडके.

नाट्यमंडळाचा 'तीन एकांकिका' हा कार्यक्रम दि. २८-११-६५ रोजी सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचा खर्च वजा जाता उरलेली रक्कम संरक्षण-

निधीस देण्यात आली.

पुणे विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाच्या सर्व शाखांत आपल्या विद्यार्थिकलाकारांनी अहमहमिकेने भाग घेतला. त्यात खालील विद्यार्थ्यांनी यशोपताका फडकवल्या आहेत ( ५, ६, ७, जाने. ६६). १ शास्त्रीय नृत्य : कु. अरुणा भिडे : प्रथम पारितोषिक २ शास्त्रीय वादन : श्री. रामकृष्ण वझे : द्वितीय पारितोषिक ३ नाट्यलेखन : श्री. आनंद हर्डीकर : प्रथम पारितोषिक ४ एकांकिका प्रयोग : 'शामभटाचा ऐरावत': तृतीय पारितोषिक ५ वैयक्तिक अभिनय : श्री. रामकृष्ण वझे : तृतीय पारितोषिक ( भू. मगनलाल शेटजी ).

बी. जे. मेडिकल कॉलेजने आयोजित केलेल्या डॉ. गदगकर शास्त्रीय गायनवादनस्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला : शास्त्रीय गायन : १ कु. नलिनी गांगल, २ कु. शशिकला शिरगोपीकर. शास्त्रीय वादन : श्री. रामकृष्ण वझे ( सतार ).

या स्पर्धेत शास्त्रीय गायनाचे **पहिले सांघिक पारितोषिक** आपल्या महाविद्यालयास मिळाले. शिवाय कु. नलिनी गांगल हिला वैयक्तिक गायननैपुण्याबद्दल दुसरे पारितोषिक मिळाले.

नाट्यमंडळाच्या वरील सर्व कलाकार विद्यार्थि-विद्यार्थिनींचे आभार व यशस्वी कलाकारांचे अभिनंदन !

नाट्यमंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमात जातीने लक्ष घालून दिग्दर्शनाचे बहुमोल कार्य करणाऱ्या श्री. श्रीराम खरे यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्यांना यंदाच्या महाराष्ट्र नाट्य महोत्सवात वैयक्तिक अभिनयाचे **पहिले पारितोषिक** मिळाले आहे त्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

**प्रा शं. रा. देशपांडे** — कार्याध्यक्ष.
**सुरेश बसाळे** — कार्यवाह

## नियोजन चर्चा मंडळ

मंडळाच्या या वर्षीच्या कार्याचे उद्‌घाटन, महाराष्ट्रातील विख्यात उद्योगपती, पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि. या ख्यातनाम संस्थेचे उद्योगसंयोजक श्री. म. स. तथा बाबूराव पारखे यांच्या हस्ते दि. ११–८–६५ रोजी झाले. या प्रसंगी श्री. पारखे यानी उद्योगाचे संयोजन आणि उभारणी या विषयावर भाषण केले.

नॅशनल कॉलेज ऑफ को ऑपरेटिव्ह ट्रेनिंग अँड रीसर्च येथील संशोधन विभागाचे उपसंचालक श्री. व्ही. एस्. पटवर्धन यांनी 'शेतमालाची विक्री' या विषयावर व्याख्यान दिले. याच वेळी मंडळाच्या चिटणीस कु. प्रज्ञा वडगावकर, यांनी याच विषयावरील निबंध सादर केला.

भारतातील नियोजनाचे पं. नेहरू हे प्रणेते. १४ नोव्हेंबर हा त्यांचा जन्मदिन. त्या दृष्टीने नोव्हेंबर १४ ते २१ या अवधीत मंडळाने नियोजन सप्ताह साजरा केला. या निमित्ताने संरक्षण, विकास आणि कृती यावर प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचा संयुक्त परिसंवाद घेण्यात आला. यावेळी पुढील निबंधांचे वाचन झाले. डिफेन्स अँड प्लॅनिंग – श्री. देव; अॅग्रिकल्चर — श्री. गोळे; इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट — श्री. तांबे. डॉ. केरूर, प्रा. गोखले, प्रा. शिरगुरकर यानी भाग घेतला. अध्यक्ष स्थानी प्रा. सौ. पोरे होत्या.

नियोजन सप्ताहाचा एक भाग म्हणून 'समाज विकास योजना' या विषयावर निबंधस्पर्धा घेण्यात आली. तीमध्ये श्री. जयंत देव आणि कु. उषा पांडव यांना पारितोषिके देण्यात आली.

मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. केरूर हे बनारस येथे भरलेल्या अर्थशास्त्र परिषदेस उपस्थित होते. परिषदेतील अध्यक्षीय भाषण, वाचण्यात आलेले निबंध, त्यावरील चर्चा — यातील विचारांचा परामर्श डॉ. केरूर यांनी, नियोजन चर्चा मंडळ, आणि 'पब्लिक फोरम' यांच्या विद्यमाने घेण्यात आलेल्या संयुक्त जाहीर सभेत सादर केला.

भारतातीय नियोजन–उपक्रमांत आंतरराष्ट्रीय सहकाराचा वाटा मोठा आहे. शिवाय चालू वर्ष हे आंतरराष्ट्रीय सहकाराचे वर्ष म्हणून देशभर साजरे झाले. त्या दृष्टीने मंडळानेही संयुक्त राष्ट्रसंघटना, मानवी हक्क, आणि आंतरराष्ट्रीय सहकार यांचे महत्त्व प्रकटपणे प्रतिपादिले.

**डॉ. दि. ब. केरूर** — कार्याध्यक्ष
**प्रा. वि. रा. शिरगुरकर** — कार्यकारी प्राध्यापक
**जयंत देव**, **प्रज्ञा वडगावकर** — चिटणीस

## 'एस्. पी. रिव्ह्यू'

एस्. पी. रिव्ह्यूचे यंदा एकूण आठ अंक प्रकाशित करण्यात आले. अजून एकदोन अंक प्रकाशित होतील. संपादकीयापासून ते सजावटीपर्यंत सर्व कामे विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने केली. विद्यार्थ्यांचे सांघिक कार्य उत्कृष्ट

होते. सर्वश्री तापीकर, जयंत देव, के. डी. शिंदे, बसाळे चापेकर, माजगावकर, गोळे, हर्डीकर, टिळेकर यांनी श्रम घेऊन सर्व अंक जास्तीत जास्त चांगल्या तऱ्हेने काढण्यासाठी प्रयत्न केले. यंदा रिव्ह्यूत छायाचित्रे, व्यंग्यचित्रे व निसर्गचित्रे यांचाही समावेश करण्यात आला. डॉ. कावळे यांचे मार्गदर्शन लाभल्यामुळे एस. पी रिव्ह्यूची बरीच प्रगती झाली. **श्री. शा. सवदी**

कार्यकारी प्राध्यापक

## हिंदी वर्गसंघटना

( द्वितीय – तृतीय वर्ष साहित्य )

वर्ग संघटकः प्रा. प्र. रा. भुपटकर

विद्यार्थी प्रतिनिधी : श्री. स. रा. महाजन, कु. सरोजिनी कुलकर्णी, श्री. वसंत शिंदे, कु. उषा आंबेडकर.

**साहित्यिक गोष्ठी** : साहित्य शाखेच्या विद्यार्थ्यांकडून मौलिक तथा अनुवादित लेखन व्हावे, त्याचे वाचन व्हावे अन् ह्या प्रयत्नांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन घडावे हा या उपक्रमाचा हेतू. प्रत्येक गुरुवारी सकाळी होणाऱ्या बैठकीचे सूत्रसंचालक होते प्रा. स. रा. केणी. संघटनेच्या प्रत्येक सभासदाने ह्यामध्ये सक्रिय भाग घेतला. ह्यातच ह्या उपक्रमाचे यश सामावले आहे.

**संदर्भ सूची** : हिंदी साप्ताहिक–मासिक–त्रैमासिकांतून आलेल्या साहित्यिक रचनांची संदर्भसूची तयार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सर्वच सभासदांनी प्रा. स. रा. केणी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली व महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे, चे श्री. स्वामी व श्री. विप्रदास ह्यांच्या सहकार्याने केले.

**वंशी** : प्रतिवर्षाप्रमाणे प्रस्तुत वर्षीही संघटनेने विद्यार्थिसभासदांच्या रचनांचे एक हस्तलिखित – वंशी- २६ जानेवारीच्या शुभदिनी प्रकाशित केले. प्रा. भारद्वाज ह्यांनी ह्या पत्रिकेचे संपादन केले. ह्या कामी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. श्रीनिवास मुंदडा यांचे अनमोल साहाय्य लाभले.

**समारंभ** : दिनांक ३० जुलै १९६५ रोजी प्रेमचंद–जयंती–समारंभ डॉ. सी. मांडे – रीडर पदार्थ-विज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमाचे वेळी विद्यार्थ्यांच्या प्रेमचंदपर निबंधांचे वाचन करण्यात आले.

दिनांक १६-१२-१९६५ रोजी सुप्रसिद्ध भाषा-विज्ञान तज्ज्ञ डॉ. हरदेव बाहरी ह्यांचे व्याख्यान संघटनेने आयोजित केले होते. ‘ भाषा और संस्कृति ’ ह्या विषयावर त्यांनी उद्बोधक व्याख्यान दिले.

दिनांक २४-१-१९६५ ह्या दिवशी संघटनेतर्फे तिळगूळ समारंभ करण्यात आला. प्रतिवर्षाप्रमाणे ह्याही वर्षी प्रा. प्र. रा. भुपटकर, प्रा. स. रा. केणी, प्रा. दुर्गाप्रसाद भारद्वाज ह्यांनी आपल्या स्वरचित रचना वाचून दाखविल्या.

दिनांक २६-१-१९६६ ह्या प्रजासत्ताक शुभदिनी समापनसमारंभ साजरा झाला. पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष सौ. अनूसया लिमये मुख्य पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्राचार्य मालेगावकर आणि स्थानिक महाविद्यालयांतील हिंदीचे अनेक प्राध्यापक उपस्थित होते. “ वंशी ” पत्रिकेचे व १९६५ सालच्या संदर्भ सूचीचे प्रकाशन अध्यक्षांचे हस्ते झाले. या प्रसंगी विद्यार्थिनिधीला ६६ रुपयांची थैलीही अर्पण करण्यात आली. **प्रा. प्र. रा. भुपटकर**

वर्ग संघटक

## मराठी वाङ्मय मंडळ

मंडळाचे उद्घाटन प्रसिद्ध साहित्यिक प्रा. श्री. के. क्षीरसागर यांच्या हस्ते दि. २३ जुलै १९६५ रोजी झाले. ‘ वास्तवता – पार्श्वभूमी आणि पर्यवसान ’ या विषयासंबंधी त्यांनी मौलिक विचार मांडले.

२३ नोव्हेंबर १९६५ रोजी प्रा. गं. बा सरदार यांचे ‘ कवी केशवसुत आणि मर्ढेकर ’ या विषयावर सर्वस्वी नवी दृष्टी देणारे परिणामकारक भाषण झाले. केशवसुत आणि मर्ढेकर या मराठी कवितेतील दोन श्रेष्ठ उद्गात्यांतील नाते दाखवून त्यांनी मराठी नवकवितेकडे पाहण्याची नवी जाणीव दिली.

७ डिसेंबर १९६५ रोजी डॉ. रा. शं. वाळिंबे, प्रा. भालबा केळकर व प्रसिद्ध नाट्य–दिग्दर्शक श्री. प्रभाकर गुप्ते या नाट्यविषयातील दर्दी अशा व्यक्तींनी एकत्र येऊन ‘ नाट्यविषयक समस्या ’ या प्रश्नाभोवती अत्यंत रंगतदार आणि अभिनव चर्चा केली.

मंडळाच्या कामात श्री. आनंद देशपांडे व कु. मंगला आपटे यांनी अनेक बाबतीत साहाय्य केले.

**डॉ. रा. शं. वाळिंबे** , **राज सासवडकर**
अध्यक्ष **उषा गोडबोले**
**प्रा. भीमराव कुलकर्णी** कार्यवाह
कार्याध्यक्ष

## मराठी वर्गसंघटना

( द्वितीय आणि तृतीय वर्ष साहित्य )

सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. सहस्रबुद्धे यांच्या 'सौंदर्य-भावना' या विषयावरील विद्वत्तापूर्ण भाषणाने शनिवार दिनांक ३१-७-६५ रोजी संघटनेच्या यंदाच्या कार्याला प्रारंभ झाला. यावर्षी विद्यार्थ्यांच्या साहित्यवाचनाचे अनेक कार्यक्रम झाले.

एका कार्यक्रमात श्री. विजय कारेकर ( तृ. व. सा. तत्त्वज्ञान विशेष ) यांनी नवकाव्याची बाजू, काही कवितांच्या संदर्भात, पटवून देण्याचा प्रयत्न केला.

यंदाच्या वर्षी काही विद्यार्थ्यांनी एक स्तुत्य उपक्रम सुरू केला. पाच सहा विद्यार्थी–विद्यार्थिनी एकत्र येऊन प्रसिद्ध कवींच्या उत्कृष्ट कवितांचे वाचन, चर्चा, रसग्रहण करीत असत.

यावर्षीच्या कार्याचा समारोप श्री. मालतीबाई बेडेकर यांच्या भावनोत्कट व विचारस्फोटक भाषणाने झाला.

**प्रा. डॉ अनुराधा पोतदार**
संघटक

| | |
|---|---|
| अविनाश चाफेकर | आनंद देशपांडे |
| कु. विनया गोळे | कु. सरोज वाळंबे |
| कु. विजया साळवेकर | कु. शोभना मांडके |

विद्यार्थी प्रतिनिधी

## तत्त्वज्ञान मंडळ व तत्त्वज्ञान वर्गसंघटना

२३ जुलै १९६५ रोजी तत्त्वज्ञान–मंडळाचा उद्घाटन समारंभ स. प. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य शं. वा दांडेकर यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. त्याचवेळी अमेरिकेहून एक वर्षाच्या वास्तव्यानंतर भारतात परत आलेल्या प्रा. डॉ. लीला गोळे यांचा सत्कार करण्यात आला व १९६४–६५ वर्षातील तत्त्वज्ञान हा ऐच्छिक विषय घेऊन यशस्वी झालेल्या विद्यार्थी–विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.

यानंतर साधारणतः दर पंधरवड्याला एक अशी तत्त्वज्ञान–मंडळ व वर्गसंघटना यांची संयुक्त बैठक भरवण्यात येत असे व तीत निरनिराळ्या विषयांवर, विविध दृष्टिकोनांतून चर्चा, निबंधवाचन, परिसंवाद अथवा व्याख्याने आयोजित केलेली असत. औपनिषद्–तत्त्वज्ञान; सॉक्रेटीस–जीवन व तत्त्वज्ञान; आजच्या कॉलेज विद्यार्थ्यांची जबाबदारी, विज्ञानाचा समाजजीवनावरील परिणाम इ. अनेक विषयांवर चर्चा झाल्या. तसेच श्री. कारेकर यांच्या रात्रप्रश्न नावाच्या एका एकांकिकेचे नाट्यवाचन व 'चिन्मयानंदांच्या तत्त्वज्ञानाची दुसरी बाजू' या विषयावरील निबंधवाचन असे आणखी दोन कार्यक्रम आखण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांत अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी हिरीरीने भाग घेतला.

याशिवाय तत्त्वज्ञान मंडळातर्फे दरसाल प्रमाणे साळवेकर-निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येऊन 'मानवी हक्कः स्वरूप व अभिप्राय' हा विषय स्पर्धेसाठी निवडण्यात आला होता. परीक्षक–प्रा. सौ. लीला सोहोनी, तत्त्वज्ञान विभाग, एम. इ. एस. कॉलेज. त्या स्पर्धेत श्री. कारेकर यांच्या निबंधाची निवड केली गेली व परीक्षकांचे शुभहस्ते बक्षिससमारंभ झाला.

सन्मान्य पाहुण्यांच्या भेटी : नव्या वर्षाच्या आरंभीच अमेरिकेतील प्रसिद्ध व्हॅसर कॉलेजमधील तत्त्वज्ञान–धर्म–विभागाचे प्रमुख प्रा. फिट्झी यांनी मंडळाला भेट देऊन विद्यार्थ्यांशी अनौपचारिक प्रश्नोत्तरे केली. वाडिया कॉलेजचे माजी प्राचार्य प्र. रा. दामले यांनी मंडळास भेट दिली व 'बुद्धिवाद : स्वरूप व महत्त्व' या विषयावर व्याख्यान दिले. पुणे विद्यापीठातील तत्त्वज्ञान-शाखेचे प्रमुख डॉ. व्ही. एस. नरवणे यांनी तत्त्वज्ञानमंडळाला भेट दिली.

अध्यक्ष : प्रा. डॉ. **श्री. र. कावळे**
वर्गसंघटक : प्रा. डॉ. **लीला द. गोळे**
चिटणीस : श्री. **कारेकर**, कु. **करमरकर**
कु. **सेनापती**, श्री. **सूर्यवंशी**

## नागरी संरक्षण यंत्रणा

३१ ऑक्टोबर ६५ ला प्रथमोपचार वर्गाची परीक्षा आपल्या महाविद्यालयाच्या युनिव्हर्सिटी हॉलमध्ये झाली. त्या परीक्षेस आपल्या महाविद्यालयातील ४५ विद्यार्थिनी बसल्या होत्या व त्यामध्ये कु. मीना भातखंडे व कु. कांचन आठवले या अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. परीक्षेची सर्व व्यवस्था श्री. जनार्दन अत्रे व श्री. प्रथमवीर यांनी पाहिली.

१ नोव्हेंबर १९६५ ला 'वॉर्डन पोस्ट' व २ नोव्हेंबरला 'समाजस्वास्थ्य' या विषयावर श्री. वडके मामलेदार यांचे व्याख्यान झाले. दि. ३ नोव्हेंबरला आपल्या महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर अग्निशामक प्रशिक्षण वर्ग भरला होता. व्याख्यानाची व या वर्गाची सर्व जबाबदारी श्री. विष्णू भालेराव यांनी सांभाळली होती.

दिनांक २२ ते २५ नोव्हेंबरला श्री. पाटील, डेप्युटी कलेक्टर, यांनी 'नागरी सुरक्षा' या विषयावर देवी रमाबाई सभागृहात मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. यावेळी नागरी संरक्षण यंत्रणेचे १०२७ फॉर्मस् भरून त्यांचेकडे सुपूर्त करण्यात आले.

१८ नोव्हेंबरला संरक्षण अभ्यास मंडळ व 'इफेस्का' यांच्या वतीने श्री. जी. बी. सरदेसाई यांचे 'हंटर्स आणि फायटर्स' या विषयावर सदीप व्याख्यान झाले.

दुसरे व्याख्यान प्रा. ग. प्र. प्रधान यांचे 'मी पाहिलेली युद्ध आघाडी' या विषयावर झाले.

समाज – स्वास्थ्य – समितीतर्फे ३० जानेवारी व ६ फेब्रुवारी ६६ रोजी अग्निशामक प्रशिक्षण–वर्ग आपल्या क्रीडांगणावर भरला होता. या दोन्ही वर्गास आपले १३४ विद्यार्थी हजर होते.

**राजेश सासवडकर**
जनरल सेक्रेटरी

# प्राध्यापक – वादसभा

### वर्ष सहावे

प्राध्यापक वादसभेतर्फे १९६५–६६ या वर्षात खालील व्याख्याने झाली.

| अनुक्रमांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| १. | डॉ. लीला गोळे | University Education in America |
| २. | प्रा. सौ. कुमुद पोरे | Myth and reality in American Life |
| ३. | डॉ. सौ. अनुराधा पोतदार | नवकाव्य — काही समज आणि अपसमज |
| ४. | प्रा. डी. व्ही. सरलष्कर | Foods and Chemistry |
| ५. | प्रा. अ. गं. मंगरूळकर | रामायण — स्फुट विचार |

**पां. श्री. घारे**
चिटणीस

# प्राध्यापक – ग्रंथचर्चा मंडळ

### वर्ष पाचवें

प्राध्यापक ग्रंथचर्चामंडळाच्या वतीने १९६५–६६ या वर्षात खालील ग्रंथांवर चर्चा झाली :

| अनुक्रमांक | ग्रंथाचे नाव व लेखक | वक्ते |
|---|---|---|
| १. | The challenge of the spaceship — Clarke | श्री. मो. गं. चाफेकर |
| २. | The Flying Troika — K. P. S. Menon | प्रा. श्री. शां. सवदी |
| ३. | टीकाविवेक — प्रा. श्री. के. क्षीरसागर | प्रा. चं. शं. बर्वे |
| ४. | Mixed Economy | प्रा. वि. रा. शिरगुरकर |
| ५. | The Education Explosion — Edited by George Z. F. Bereday and Joseph A. Lauwerys. | डॉ. गं. श्री. कोषे |
| ६. | The Role of Organisations in the professional growth of Teaching Personnel | प्रा. ह. वि. शिंत्रे |

**पां. श्री. घारे**
चिटणीस

**संस्कृत संघटना** आणि **संस्कृत मण्डल**

पहिल्या सहामाहीत प्रा. मंगरूळकरांनी साहित्य-वाचनाचे आणि प्रा. अर्जुनवाडकरांनी शास्त्रवाचनाचे ('लघुकौमुदी'– पाठ्येतर भाग) वर्ग घेतले. प्रतिवर्षा-प्रमाणे याही वर्षी संस्कृत निबंधनाचे काही तास पहिल्या सहामाहीत झाले. टिळक विद्यापीठातील संस्कृत स्पर्धांतील नाट्यवाचनासाठी या वर्षी प्रा. सौ. अर्जुनवाडकरांनी भासाची 'ऊरुभंग' ही नाटिका बसवून घेतली होती; तीत पुढील विद्यार्थिविद्यार्थिनींनी भाग घेतला :

'दुर्योधन' : **अविनाश साठये**, द्वितीय वर्ष शास्त्र.
'धृतराष्ट्र' : **मुकुंद भालवणकर**, प्रथम वर्ष साहित्य.
'बलदेव' : **राम डिंबळे**, प्रथम वर्ष साहित्य.
'अश्वत्थामा' : **निनाद माटे**, पदवीपूर्व साहित्य.
'गांधारी' : **जयश्री कानिटकर** तृतीय वर्ष साहित्य.

या नाट्यवाचनाला दुसरे पारितोषिक मिळाले. सर्व स्पर्धालूंचे हार्दिक अभिनंदन! नाट्यवाचनाखेरीज वक्तृत्व (**अविनाश साठये**), गीतगायन (**वीणा दांडेकर**, प्रथम वर्ष साहित्य; **रजनी मोकाशी**, द्वितीय वर्ष साहित्य) याही स्पर्धांत विद्यार्थिविद्यार्थीनींनी पारितोषिके मिळविली. त्यांचेही अभिनंदन!

केंद्रीय शिक्षणखात्याच्या 'शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण यांचे राष्ट्रीय मंडळ' (नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग) या मंडळाच्या 'संस्कृतपाठ्यपुस्तक-समिती'ची (संस्कृत टेक्स्टबुक पॅनेल) बैठक देवी रमाबाई सभागृहामध्ये दि. २७ ते २९ जानेवारी, १९६६ असे तीन दिवस चालली. या समितीच्या कामासाठी आलेल्या संस्कृत विद्वानांचा परिचय आपल्या महाविद्यालयातील संस्कृतच्या विद्यार्थ्यांशी व्हावा, म्हणून दि. २९–१–१९६६-ला दु. ११–३० वाजता एक छोटासा कार्यक्रम योजला होता त्या प्रसंगी समितीचे अध्यक्ष डॉ. **सूर्यकान्त** (अलीगड विश्वविद्यालय) आणि अन्य काही ज्येष्ठ सदस्य तसेच निमंत्रित — डॉ. **वेलणकर** (मुंबई विश्वविद्यालय), डॉ. **रा. ना. दांडेकर** (पुणे विश्वविद्यालय) डॉ. **गुप्ता** (राजस्थान विश्वविद्यालय), पं. **वा. बा. भागवत** (टि. म. विद्यापीठ) — यांची छोटी भाषणे झाली. यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला, आणि प्रा. **रा. ना. गद्रे** यांनी आभार मानले.

या वर्षात झालेले अन्य व्याख्यानादी कार्यक्रम :

'**भास : परिसंवाद**' : अध्यक्ष– प्रा. **रा. ना. गद्रे**. वक्ते– (१) श्री. ग. उ. थिटे ('कर्णभारातील कर्णाची व्यक्तिरेखा'); (२) कु. जयश्री गुणे ('यज्ञफल–समस्या'); (३) श्री. राम डिंबळे ('दाहकोऽभून्न पावकः') दि. २१–२–१९६६.

'Songs before the Sunrise' (इंग्रजी व्याख्यान). वक्ते – पद्मभूषण डॉ. **रा. ना. दांडेकर**, हे व्याख्यान वक्त्यांनी वर्गव्याख्यानपद्धतीने दिले. दि. २३–२–६६.

'**संस्कृत–गोष्ठी**' (संस्कृत विविध-रंजन) : (१) '**ऊरुभंग**' नाट्यवाचन (अविनाश साठये, मुकुंद भालवणकर, निनाद माटे, राम डिंबळे, जयश्री गुणे). (२) **गीत** (रजनी मोकाशी). (३) **लघुनिबंधवाचन** (विद्युल्लेखा वाघ). (४) **कथा** (हिमानी अर्जुनवाडकर, अपर्णा देव). (५) **भाषण** (जयश्री गुणे). दि. ३–३–१९६६.

**कृ. श्री. अर्जुनवाडकर**
संघटना प्रमुख

## 36 Maharashtra Bn NCC

Every male-entrant to the College was required to fill in the NCC admission form. Out of 1614 male students in the College, 251 were T. Y. students and hence well exempted from compulsory NCC service. Of the remainder, 88 were found medically unfit, 95 were earner-learners and 42 sought exemption on the ground of long distance. 97 were admitted to other NCC units and 1036 were enrolled in this Bn.

Medical examination was completed on 30th June 1965. Fortunately this year, major items of kit could be issued to all cadets at the outset.

The training was interrupted in September 1965 due to the flare up of communal riots in Poona. In September 1965, during the invasion by Pakistan our cadets helped the civil authorities in enforcement of Black-out restrictions and air raid precautions. Our training was reoriented to include civil defence work. Fire-fighting squads were trained and every possible assistance was rendered to the Civil Defence authorities of Poona. It was indeed a most thrilling experience for all of us and the work of NCC cadets evoked unstinted praise from all. Skeleton organisation is being maintained for the purpose.

Recruits carried out their miniature range practice at the Engineering College Range.

Ouro fficers and cadets took part in various camps organised by NCC during the summer of 1965.

Lt. Col. Pesi Cama who took over as the Group Commander of NCC Group HQ, Poona, paid a visit to our Bn. in July. He expressed his satisfaction on inspecting the Bn. stores and armoury. He called upon the P. I. staff to put in their best on training.

On 29th July 1965 Maj. Gen. Virendrasing, the Director General, NCC visited the Bn. on training. It was his first visit to this nascent Bn. He was highly pleased with the maintenance of stores and neatness of training.

On behalf of the College, the Bn compiled and brought out a Cadets' Diary in July 1965. It was distributed free to all NCC cadets in the College.

On 1st August the N. C. C. Cadets paid a solemn homage to the late Lokamanya Tilak the father of the Indian Discontent.

On 15th August the officers and Cadets participated in the flag salutation at the College. A rally of all NCC cadets was organised at the University Campus to mark the inauguration of Young World Movement for Food.

The annual shastrapujan was performed on the Dasara Day, 4th October 1965. Maj. Gen. Y. S. Paranjpe, Head of the University department of Military Studies, addressed the cadets on the occasion. He emphsised the need of coordination between University education and defence needs.

The NCC Day was celebrated on 22nd November 1965 at the Police Parade Grounds. Major R. N. Gaidhani of this Bn commanded the parade, Mrs. Tara Cherian, wife of the State Governor, took the salute.

This Bn was privileged to present a guard of Honour to the Chancellor of the Poona University on the occasion of its convocation on 29th September 1965. Maj D. V.Kulkkarni commanded the impressive guards.

A ceremonial parade was organised on 26th January 1966 to mark the Republic Day celebrations. Prin. Malegaonkar addressed the cadets and called upon them to fight against ignorance, disease and hunger. The NCC contingent at a combined parade was commanded by Lt. P. N. Kulakarni of this Bn and it included 20 cadets from the Bn.

The Annual Training Camp of the Bn was held from 25th December, 1965 to 3rd January 1966 at Khed Shivapur. Special demonstrations were arranged for the benefit of cadets . Outdoor exercises were carried out when the cadets lived a life in the field.

In response to the Grow More Food Campaign, the Bn planned an experimental farming work. A piece of land was made available to the cadets and Hybrid corn is sown therein. We hope to reap our labours in two months' time.

The certificate examinations were conducted in January 1966. 62 cadets appeared for 'B' certificate and 6 for 'C' certificate. Results are awaited.

The Annual Bn Day was celebrated on 6th February 1966. Prin Hulyalkar, Ex-Principal of our College and Ex – Captain of the the NCC presided over the function and addressed the cadets; Mrs. Ushadevi Hulyalkar gave away the prizes.

We are thankful to the authorities of S. P. College, and Prin. Malegaonkar in particular, for the keen interest he evinced in our work, the helping hand he extended whenever sought and wise advise he tendered when asked. The Group Commander and Commanders of sister units also deserve our gratitude for help and guidance.

**List of Prize Winners 1965-66.**

(1) Major W. N. Dabdghao prize (Rs. 11-50). Awarded to C. S. M. Joshi S. G. (2) Late W. N. Dabadghao Memorial Prize Rs. 25 awarded to the Best cadet in the Bn shared by (1) u/o S. M. Dixit (2) Sgt Barge (3) Capt R. N. Chapekar Prize (Rs 20) Awarded to the best cadet in the Bn shared by (1) Sgt. More S. G. (2) Cpt. Wakankar A. M. (4)Hutatma Vasant Date Prize:- Best Shot (Rs. 30) Awarded to the best shot in the Bn shared by (1) Cdt Jagtap L. N. (2) Cdt Ahirekar G. S. (5) Second best shot in the Bn. Cdt Patil N. D. 6) Most Efficient NCO Prize 1) CSM S. B. Neurgaonkar (7) Best instructor of the year (1) u/o Shaikh (8) Best work in Camp : Cadet G. M. u/o D. H. Deshpande (9) Best line Dressing Cap N. 2 Pl Coy No. 4. Cpl. B. H. Bhate. (10) Capt V. K. Bhawat Cup Awarded to the best company of the year No 4 Coy.

**Major R. N. Gaidhani.**

## English Literary Association

Prof.-in-charge : Prof. B. N. Kulkarni
Secretaries :
Ambiger N. F.
Miss S. P. Oka

**Inaguration**
By
Dr. Dhavale, Prof. of English .
Fergusson College
Subject : Poetry and Inspiration.
Date 20th Aug' 65.

**I Paper Reading.**
By V. S. Bhat., T. Y. B. A.
on
**Candida of G. B. Shaw**
held on 18th Sept, 65.

**Paper Reading II**
By Ambiger N. F., T. Y. B. A.
on
**' Browning as a love poet '**
held on 20th Nov, 65.

**Paper Reading III**
By Rajnikant Belsare, S. Y. B. A.
on
**' Poetry is the Criticism of Life. '**
held on 16th Dec. 65 .

**Paper Reading IV**
By Miss Vidya Malegaonkar, T. Y. B. A.
on
**The Character of Hamlet.**
held on 9th Feb 65.

## महाविद्यालयीन वार्ता

चालू शैक्षणिक वर्षातील दुसऱ्या ज्ञानसत्राबद्दलची वार्ता संक्षिप्तपणे सादर करीत आहोत. ठळक घटनांची थोडक्यात नोंद करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

### वार्षिक स्नेहसंमेलन

या वर्षीचे स्नेहसंमेलन दि. २०–२१–२२–२३ डिसेंबर १९६५ या दिवशी अतिशय व्यवस्थितरीत्या व शांततेने पार पडले.

स्नेहसंमेलन व्यवस्थेसाठी प्रा. र. ना. चापेकर, प्रा. य. बा. राजे, प्रा. एस्. जी. लागू, प्रा. द वि. आठवले, प्रा. ताराबाई केळकर व प्रा. भीमराव कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली होती.

देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने साहाय्य करण्याची मनीषा व्यक्त केली असल्यामुळे यावर्षी स्नेहसंमेलन अत्यल्प खर्चात साजरे करून राहिलेली रक्कम संरक्षण निधीस देण्यात आली. विद्यार्थी या त्यांच्या दृष्टिकोनाबद्दल अभिनंदनास पात्र आहेत.

व्यवस्थेच्या दृष्टीने व सोयीसाठी शास्त्र व साहित्य असे दोन निरनिराळे गट पाडून विविधगुणदर्शन व क्रीडास्पर्धा हे दोन महत्त्वाचे कार्यक्रम करण्यात आले.

दि. २०–२१ डिसेंबर ६५ रोजी शास्त्र–शाखेचे कार्यक्रम झाले व दि. २२–२३ डिसेंबर ६५ रोजी साहित्यशाखेचे कार्यक्रम करण्यात आले.

विविधगुणदर्शनामध्ये गाणी, नकला, एकांकिकांचे प्रयोग, इ. वैशिष्ट्ये होती आणि विद्यार्थ्यांनी आपल्या अंगच्या विविधगुणांचे दर्शन घडविले. संमेलन यशस्वी करण्यासाठी प्रा. चापेकर, प्रा. राजे व त्यांचे सहकारी यांनी खूप परिश्रम घेतले. त्यांना धन्यवाद !



आनंद हर्डीकर
'परशुरामीय' वक्ता



नलिनी गांगल
'परशुरामीय' गायिका



विजयसिंह कारेकर
गोडबोले शिष्यवृत्ती विजेता



निर्मला मोकाशी
डॉ. सहस्रबुद्धे निबंध स्पर्धा
पारितोषिक विजेती



द. ना. तापीकर
डॉ. सहस्रबुद्धे अभिरूप लोकसभा
सरकारी पक्ष प्रथम पारितोषिक



अरविंद खरे
डॉ. सहस्रबुद्धे अभिरूप लोकसभा
विरोधी पक्ष प्रथम पारितोषिक



श्री. एम्. आर. मोडक
बी. एस्‌सी.
प्रथम वर्ग विशेष प्राविण्य



मेजर प्रा. द. वि. कुलकर्णी
एन. सी. सी. त मेजर
या हुद्यावर बढती



माजी विद्यार्थी
डॉ. चं. अ. चिंचवडकर
रसायनशास्त्रातील पीएच्. डी.



छत्तिसावी महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी.
'A Mass of KHAKIS' ... and some bright ones.



मोहन कदम
एन. डी. ए. साठी निवड



र. वि. अकोलकर
शॉर्ट सर्व्हिस रेग्युलर आर्मी
कमिशनसाठी निवड



एस्. जी. जोशी
एन्. सी. सी. बी सर्टिफिकेट
सर्वप्रथम
मेजर दबडघाव पारितोषिक
विजेता

## प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी १९६६ रोजी सकाळी ७-३० वाजता क्रीडांगणावर प्राचार्य मालेगावकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. ध्वजवंदनानंतर सर्वांनी आपल्या प्रजासत्ताकाच्या रक्षणाची प्रतिज्ञा घेतली. प्राचार्यांनी त्यावेळी केलेल्या भाषणात देशापुढे उभ्या असलेल्या बिकट समस्यांची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली. चारित्र्य निष्ठा, त्याग, जिद्द, देशाभिमान व शांतिप्रेम या मूल्यांची जोपासना करून विद्याव्यासंगाला त्यांची जोड देण्यामुळे राष्ट्राचा भविष्यकाळ उज्ज्वल होईल हे विद्यार्थ्यांच्या मनावर त्यांनी बिंबविले.

## प्राध्यापकांचें ग्रंथलेखनादी कार्य

पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे, प्राध्यापकमित्रांनी केलेल्या कार्याचा अतिसंक्षिप्तपणे निर्देश करावा लागत आहे. ही माहिती विस्ताराने देता आली असती तर खचितच आनंद वाटला असता.

प्रा. **रा. म. गोखले** यांचे ' बँक व्यावसायाची मूलतत्त्वे आणि भारतातील बँका ' हे बी. कॉम. च्या विद्यार्थ्यांसाठी लिहिलेले पाठ्यपुस्तक प्रसिद्ध झाले. प्रा. कु. **श्री. अर्जुनवाडकर** यांचा ' कण्टकाञ्जलिः ' हा संस्कृत विडंबन काव्यग्रंथ प्रसिद्ध झाला. चिपळूणकरपूर्व कालखंडातील मराठी गद्यवाङ्मयाच्या एका प्रातिनिधिक लेखसंप्रदायाचे प्रा. **भीमराव कुलकर्णी** यांनी ' मराठी गद्याचा पूर्वरंग ' या नावाने केलेले संपादन प्रसिद्ध झाले. तसेच मराठीतील आत्मचरित्रांतील काही निवड उताऱ्यांचे संकलन व संपादन करून त्यांनी ' आमचे जीवन-आमच्या स्मृती ' हे पुस्तक प्रसिद्ध केले.

डॉ. **रा. शं. वाळिंबे**, प्रा. **य. बा. राजे** यांच्या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या काही ग्रंथांच्या सुधारून वाढवलेल्या आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. त्यांची व डॉ. **दि. ब. केरूर**, डॉ. **श्री. र. कावळे**, डॉ. **लीला गोळे**, प्रा. **तारा केळकर**, प्रा. सौ. **लीला अर्जुनवाडकर**, प्रा. **भारद्वाज** प्रा. **रा. म. गोखले** यांची आपापल्या क्षेत्रांतील विषयांवरची विविध ठिकाणी व्याख्याने झाली, आणि त्यांनी लिहिलेले लेखही प्रसिद्ध झाले. श्री **भ. रा. जोशी** यांनी चालू शैक्षणिक वर्षी आंतरमहाविद्यालयीन क्रीडासमितीचे चिटणीस म्हणून काम केले.

प्रा. **ह. वि. शिंत्रे** यांना १९६४-६५ च्या चर्चासत्रातील अखिल भारतीय निबंधस्पर्धेमध्ये त्यांच्या शैक्षणिक विषयावरील निबंधास रुपये पाचशेचे पारितोषक मिळाले. **प्रा. प. स. चिरपुटकर** यांनी १९६५ मध्ये झालेल्या एम. एस्सी. ( अप्लाईड मॅथ्स ) या पुणे विद्यापीठाच्या परीक्षेत प्रथमश्रेणी मिळविली. प्रा. शिंत्रे व प्रा. चिरपुटकर यांनी मिळविलेल्या भरीव यशाबद्दल हार्दिक अभिनंदन !

## एन्. सी. सी. मध्ये बढती

आपल्या महाविद्यालयाच्या छत्तिसाव्या महाराष्ट्र बटालियनमधील अधिकारी कॅप्टन प्रा. **द. वि. कुलकर्णी** यांना दि. ३० जुलै १९६५ पासून मेजर हा हुद्दा मिळाला. **मेजर प्रा. कुलकर्णी** हे गेली पंधरा वर्षे निरलसपणे एन्. सी. सी. चे कार्य करीत आहेत. कंपनी कमांडर, अॅडज्यूटंट, क्वार्टरमास्टर, कॅडेटसचे मेसिंग ऑफिसर, ऑफिसर्स मेसचे सेक्रेटरी इ. अनेक जबाबदारीची कामे त्यांनी पार पाडली आहेत. शिवाय त्यांनी अनेक रिफ्रेशर कोर्सेस व कॅंप्स केले आहेत. त्यांना मिळालेल्या बढतीबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करीत आहोत !

## ऑफिसर्स रिफ्रेशर कोर्स

यावर्षी मेजर प्रा. **द. वि. कुलकर्णी**, ले. प्रा. **प्र. र. करमरकर** व ले. प्रा. **भी. ब. कुलकर्णी** यांनी एन. सी. सी. अॅकॅडमी पुरंदर येथे व ले. प्रा. **पा. श्री. घारे**, ले. प्रा. **पी. एन्. कुलकर्णी** व ले. प्रा. **कृ. रा. कुलकर्णी** यांनी ऑफिसर्स ट्रेनिंग स्कूल, कामटी येथे एक महिन्याचा रिफ्रेशर कोर्स यशस्वीरीतीने पूर्ण केला.

## शोकसभा

दि. ३० नोव्हेंबर १९६५ रोजी विद्यार्थी, प्राध्यापक, व इतर सेवकवर्ग यांची एक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत महाविद्यालयाचे भूतपूर्व **प्राचार्य र. दा. करमरकर** यांच्या शोचनीय निधनाबद्दल दोन मिनिटे स्तब्धता पाळून दुखवटा व्यक्त करण्यात आला व दुखवट्याचा ठराव सभेने संमत केला.

दि. १४ जानेवारी १९६६ रोजी देवी रमाबाई सभागृहामध्ये प्राध्यापक व विद्यार्थी यांची एक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत दोन मिनिटे स्तब्धता पाळून पंतप्रधान **लालबहादूर शास्त्री** व कुलगुरु डॉ. **न. वि. गाडगीळ** यांच्या दुःखद निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला व दुखवट्याचे ठराव सभेने संमत केले.

**पाहुण्यांच्या भेटी**

दि. ५ ऑक्टोबर १९६५ रोजी अर्लहॅम कॉलेज, रिचमंड, इंडियाना, यू. एस्. ए. येथील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक डॉ. **ह्यू बार्बर** यांनी महाविद्यालयास भेट दिली. दि. ४ फेब्रुवारी १९६६ रोजी व्हॅसर कॉलेज, पकिप्सी, न्यूयॉर्क, यू. एस्. ए. येथील धर्मविषयाचे प्राध्यापक डॉ. **पॉल फिट्झी** यांनी महाविद्यायाला भेट देऊन विद्यार्थ्यांशी अनौपचारिक चर्चा केली. दि. २३ फेब्रुवारी १९६६ रोजी डॉ. **रा. ना. दांडेकर** यांचे संस्कृत मंडलाच्या वतीने 'साँग्ज बिफोर द सनराइझ' या विषयावर उद्बोधक व्याख्यान झाले. दि. २६ फेब्रुवारी १९६६ रोजी पुणे विद्यापीठ तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. **वि. श्री. नरवणे** यांनी महाविद्यालयाला भेट देऊन तत्त्वज्ञानविषयाच्या विद्यार्थ्यांसमोर 'प्लेटोची कलामीमांसा' या विषयावर विचारांना चालना देणारे व्याख्यान दिले. विद्यापीठातील विभाग प्रमुखांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भेटण्याने सर्वच वातावरण उत्तेजित होते. त्या दृष्टीने हा उपक्रम आम्हांस स्वागतार्ह वाटतो. आपले सन्मान्य माजी विद्यार्थी पुण्याचे माननीय महापौर श्री. **बी. डी. किल्लेदार** यांनी महाविद्यालयास भेट देऊन लोकशाहीतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याविषयी व समस्यांविषयी आपले महत्त्वपूर्ण विचार व्यक्त केले.

**संरक्षण निधीस सहा हजाराची देणगी**

महाविद्यालयात कार्यान्वित असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांत काटकसर करून, स्नेहसंमेलन साध्या रीतीने साजरे करून व ऐच्छिक संरक्षण निधी गोळा करून विद्यार्थी व प्राध्यापकांनी मिळून राष्ट्रीय संरक्षण निधीस रूपये सहा हजाराची देणगी दिली.

**'जनरल एज्युकेशन' ग्रंथसंग्रहासाठी अनुदान**

विद्यापीठ अनुदान मंडळाने भारतातील काही निवडक महाविद्यालयांना 'जनरल एज्युकेशन'– संकलित सांस्कृतिक शिक्षण–या प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी प्रत्येकी तीन हजार रुपये अनुदान दिले आहे. या योजनेत आपल्या महाविद्यालयाचा समावेश झाला आहे ही अभिमानाची व आनंदाची गोष्ट आहे. अनुदानाची रक्कम नुकतीच आलेली असून कला, विज्ञान, धर्म, शिक्षण, संस्कृती इत्यादी विषयांवरील संकलित शिक्षणास उपयुक्त असे उत्तमोत्तम ग्रंथ विकत घेण्यात आले आहेत. या ग्रंथांच्या वाचनासाठी विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश आहे. या संधीच विद्यार्थिमित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, आपले 'सामान्य ज्ञान' वाढवावे व संस्कारसंपन्न व्हावे असे आवाहन करीत आहोत.

**तृ. व. अर्थशास्त्राचे मराठीतून अध्यापन**

या वर्षी द्वितीय वर्ष साहित्य या वर्गांना मानसशास्त्र व अर्थशास्त्र हे विषय इंग्रजी माध्यमाप्रमाणेच स्वतंत्र तुकड्या करून मराठी माध्यमातून शिकविण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला आपला चांगला पाठिंबा आहे हे दाखवून दिले. मराठी माध्यमातून अध्ययन अध्यापन यशस्वी करण्याच्या प्रयत्नातले पुढचे पाऊल आता आपले महाविद्यालय उचलीत आहे. पुढील वर्षी तृतीय वर्ष साहित्य अर्थशास्त्र या विषयाचे अध्यापन इंग्रजीतून व मराठीतून स्वतंत्रपणे होणार आहे. विद्यार्थ्यांनी या योजनेचा अवश्य लाभ घ्यावा. मराठीतून–मातृभाषेतून–लिहावे. ज्ञानसंपादनासाठी मात्र मराठी ग्रंथांप्रमाणेच इंग्रजी ग्रंथांचेही वाचन चालू ठेवावे व वैचारिक आशयाची संपन्नता राखावी. मराठीचा अभिमान बाळगणाऱ्या सर्वांनाच हे एक आव्हान आहे. ते आपण जिद्दीने स्वीकारावे. निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु।

**अभिरूप लोकसभा**

डॉ. **पु. ग. सहस्रबुद्धे** पारितोषिकासाठी अभिरूप लोकसभेचा कार्यक्रम यावर्षी नव्यानेच सुरू झाला.

दि. २१ फेब्रुवारी १९६६ यादिवशी सायंकाळी हा कार्यक्रम घेण्यात आला. माजी संसद्सदस्य श्री. **मामासाहेब देवगिरीकर** यांना प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून बोलावण्यात आले होते.

'भारताने आता ब्रिटिश राष्ट्रकुलातून बाहेर पडावे' अशा प्रस्ताव चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. अधिकारारूढ पक्षातर्फे श्री. तापीकर, श्री. देव, श्री. गोळे, श्री. साने व कु. मेहेंदळे यांनी भाग घेतला. विरोधी पक्षातर्फे श्री. भालेराव, श्री. हर्डीकर, श्री. टिकेकर, श्री. बेलसरे व श्री. खरे यांनी भाग घेतला.

अधिकारारूढ पक्षातर्फे श्री. **तापीकर** व विरोधी पक्षातर्फे श्री. **खरे** यांनी प्रथम क्रमांक मिळविले. डा. पु. ग. सहस्रबुद्धे पारितोषिक त्यांना देण्यात आले. विरोधी पक्षाचे प्रतिपादन विशेष प्रभावी व परिणामकारक झाले व त्यांचा ठराव प्रचंड बहुमताने मंजूर झाला.

कार्यक्रमास बरेच श्रोते उपस्थित होते. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यानीही स्वतः उपस्थित राहून या कार्यक्रमाबद्दल समाधानकारक अभिप्राय व्यक्त केला.

एकंदरीत कार्यक्रम चांगलाच यशस्वी झाला. या पारितोषिकाच्या निमित्ताने आपल्या महाविद्यालयातील वक्तृत्वसाधनेला नवे वळण मिळून विद्यार्थिवक्ते अधिक प्रभावी व तर्कशुद्ध प्रतिपादन करण्याचा प्रयत्न करू लागतील असा विश्वास आहे.

## माजी विद्यार्थ्यांचे यश

### शास्त्रीय संस्कृत वक्तृत्व स्पर्धा

केंद्रीय शिक्षणखात्याकडून या वर्षी 'अखिल भारतीय शास्त्रीय संस्कृत वक्तृत्व-स्पर्धा' दरभंगा ( बिहार ) या ठिकाणी फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात घेतल्या. त्यांत कु. **सौदामिनी बहुलीकर** आणि श्री. **विघ्नहरी देव** यांनी पुण्यातील टिळक विद्यापीठाच्या वतीने भाग घेतला आणि उज्ज्वल यश मिळविले ! त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! त्यांच्या या यशाचा तपशील असा :

कु. **बहुलीकर** : विषय—( १ ) 'वर्णाः सार्थकाः अनर्थकाः वा ?' ( व्याकरण ) : दुसरा क्रमांक, रौप्यपदक आणि रोख पारितोषिक रु. ७५. ( २ ) 'अनुमायां ध्वनेः अन्तर्भावः भवति वा न वा !' ( साहित्य ) : तिसरा क्रमांक, रोख पारितोषिक रु. ५०.

श्री. **देव** : विषय—( १ ) 'प्रधानकारणवादः' ( सांख्य ): पहिला क्रमांक, सुवर्णपदक आणि रोख पारितोषिक रु. १५०. ( २ ) समस्यापूर्ती : दुसरा क्रमांक, रौप्यपदक आणि रोख पारितोषिक रु. ७५. समस्या होती—'तालतरुर्ब्रवीति' आणि ती देवांनी नियुक्त वेळात ( १५ मिनिटे ) अशी पूर्ण केली :

'औद्धत्यमेतत् परितः प्रसार्य
स्थितोऽस्मि लोकेऽद्भुतशक्तियुक्तः ।
तथापि मे नास्ति हि मानपूजा
धिग् जीवितं !' तालतरुर्ब्रवीति ।।

### डॉ. चं. अ. चिंचवडकर पीएच्. डी. झाले

आपले सन्मान्य माजी विद्यार्थी **चं. अ. चिंचवडकर** यांनी डॉ. एस्. के. के. जतकर यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनविषयात संशोधन करून जानेवारी १९६६ मध्ये पुणे विद्यापीठाची पीएच. डी. ही पदवी संपादन केली. त्यांच्या प्रबंधाचा विषय होता : 'Dipole moment, Ultraviolet, Infrared Spectra and and Molecular Structure.' डॉ. चिंचवडकर यांनी मिळविलेल्या या सुयशाबद्दल आम्ही त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो !

सर्व विद्यार्थ्यांना आपापल्या परीक्षांत सुयश चिंतून ही वार्ता पुरी करीत आहोत.

**श्री. र. काळे**
संपादक



# कै. डॉ. न. वि. गाडगीळ

बुधवार दि. १२-१-१९६६ रोजी पहाटे पुणे येथे माननीय डॉ. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांचे निधन झाले. या निधनानें सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि अध्यापक यांना परम दुःख होत आहे.



डॉ. काकासाहेबांचा जन्म राजस्थानमध्ये झाला. शिक्षण गुजराथेत व पुण्यात, आणि प्रधान कार्य महाराष्ट्रात झाले. १९२० साली डॉ. काकासाहेबांनी पुणे येथे वकिलीच्या व्यवसायास आरंभ केला. महात्माजींच्या असहकार चळवळीच्या वेळी त्यांनी राष्ट्रीय सभेत प्रवेश केला. युवक चळवळीचे नेतृत्व केले. कै. केशवराव जेधे यांच्या सहकाराने राष्ट्रीय सभेचा संदेश ग्रामीण जनतेपर्यंत पोचविला. स्वातंत्र्य युद्धातील एक बिनीचा सैनिक म्हणून डॉ. काकासाहेबांनी अनेक वेळा तुरुंगवास भोगला.

सेवेच्या बळावर राष्ट्रीय सभेची सर्व महत्त्वाची पदे डॉ. काकासाहेबांना प्राप्त झाली आणि ती सर्व कार्यांच्या बळावर भूषविली. स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळाचे सदस्य होण्याचा बहुमानही डॉ. काकासाहेबांना लाभला. मंत्रिमंडळातून निवृत्त झाल्यावर पंजाब या सीमाप्रान्ताच्या राज्यपालपदाची धुराही त्यांनी वाहिली.

—आणि गेली दोन वर्ष डॉ. काकासाहेब पुणे विद्यापीठाचे कुलगुरु होते.

राजकारण, समाजकारण, अर्थकारण आणि साहित्यकारण अशा सर्व क्षेत्रांत डॉ. काकासाहेब सारख्याच कार्यक्षमतेने वावरले आणि आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.

लोकाभिमुखता हा डॉ. काकासाहेबांचा स्थायीभाव होता. सामान्यजनाविषयी त्यांच्या मनात अपार सहानुभूती होती. डॉ. काकासाहेबांचे अन्तःकरण निरामय होते, वृत्ती निःस्पृह होती आणि आचार निर्भय होता. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळी डॉ. काकासाहेबांच्या या सान्या गुणांचे उत्कट दर्शन झाले.

डॉ. काकासाहेबांची मराठी सारस्वताची सेवाही विलोभनीय होती. प्रसन्न आणि ढंगदार शैलीचे व्यासंगी लेखक म्हणून ते ख्यातनाम होते. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आदी विषयावरील त्यांचे लेखन विचारप्रेरक होते. ललितलेख वेधक होते. या साहित्य सेवेचे फल म्हणून डॉ. काकासाहेबांना मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदही लाभले.

माननीय डॉ. काकासाहेब पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी अवघी दोन वर्षेच होते. तथापी त्यांची कारकीर्द मोठी प्रेरक ठरली.

पाकिस्तानच्या आक्रमणाच्या प्रसंगी विद्यापीठीय जगात त्यांनी निर्माण केलेली जागृती हा आमचा अमोल ठेवा आहे.

डॉ. काकासाहेबांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक अत्यंत संपन्न, लोकाभिमुख, प्रेरक जीवन समाप्त झाले आहे. त्या जीवनाची स्मृती सर्वांनाच चिरकाल स्फूर्ती देईल यात शंका नाही.

डॉ. काकासाहेबांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही अंतःकरणपूर्वक सहभागी आहोत. ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो.

# कै. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे शनिवार दि. २६-२-१९६६ रोजी दुःखद देहावसान झाले. त्यांच्या निधनाने स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी पर्वाचा शेवट झाला. विद्यार्थिदशेत तात्यारावांनी विदेशीची होळी व स्वदेशीचा पुरस्कार, मित्रमेळ्यातून वीर्यांची गाथा व वीरांचा गौरव, अभिनव भारताच्या संस्थापनेने उत्कट देशभक्ती व देशाच्या स्वातंत्र्यासाठी असीम त्यागाची तयारी यांचे धडे तरुणांना दिले. मातृभूमीच्या दास्यशृंखला तोडण्यासाठी क्रांतीचे रणशिंग फुंकले.

त्यासाठी अद्वितीय साहस व असीम स्वार्थत्याग केला. दोन जन्मठेपांच्या शिक्षा भोगतानाही आपला ध्येयवाद अचल ठेवला.



भारतीयांना त्यांच्या उज्ज्वल वीरपरंपरेचे स्मरण देण्यासाठी इतिहासाचे अवगाहन करून "१८५७ चे स्वातंत्र्यसमर" लिहिले. स्वातंत्र्यगीते व देशभक्तिगीते यासाठी आपली काव्यप्रतिभा राबविली. हिंदू समाजाचा उद्धार करण्यासाठी अनेक विज्ञाननिष्ठ सामाजिक सुधारणांचा पुरस्कार व प्रचार केला. हिंदूंचे संघटन होऊन त्यांच्यात वीरपरंपरा निर्माण होण्यासाठी सैनिकी शिक्षणाचा हिरीरीने पुरस्कार केला. परदास्याची नावनिशाणी पुसण्यासाठी भाषाशुद्धीची चळवळ केली.

त्यांच्या ऊर्जस्वल साहित्यसेवेने मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. भारतीय हिंदूमहासभेची सूत्रे त्यांनी काही काळ हलविली. आपल्या तेजस्वी वाणीने व प्रभावी लेखणीने त्यांनी समाजाला देशभक्तीचे भावनिक व वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

स्वातंत्र्यवीरांच्या निधनाने राष्ट्र एका विचारघन प्रतिभासंपन्न साहित्यिकास, विज्ञाननिष्ठ झुंजार तत्वचिंतकास, कर्तृत्वशाली क्रांतिकारकांच्या अग्रणीस, थोर देशभक्त महापुरुषास मुकले आहे. त्यांचे रोमहर्षक जीवन नव्या पिढीला आदर्शरूप आहे. मृत्युंजय सावरकरांच्या या आत्मसमर्पणाने एका राष्ट्रार्पित व कृतकृत्य जीवनाची पूर्णाहुती पडली असली तरी ती घटना आम्हास अतीव दुःख देणारी वाटते. त्यांची पवित्र स्मृती आम्हास उज्ज्वल देशभक्तीची व कार्यशक्तीची सदैव प्रेरणा देवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना आहे.

स्वातंत्र्यवीरांच्या आत्मकाम जीवनास आमचे लक्ष लक्ष प्रणाम. ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो.

## स्वर्गीय प्रधान मंत्री

### श्री. लाल बहादुर शास्त्रीजी

हमारे आदरणीय प्रधान मंत्री श्री. लालबहादुर शास्त्री की ताश्कंद में ११ जनवरी १९६६ की रातको १ बजकर ३२ मिनटपर मृत्यु हुई !

श्री. शास्त्रीजी की इस असामयिक एवं अतीव दुःखदायी मृत्युपर 'सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणें' के अध्यापकों एवं विद्यार्थियोंकी यह सभा अपना परमशोक प्रकट करती है ! स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू के पश्चात् भारतके महान् गणतंत्र की बागडोर संभालने के लिए श्रीमान् शास्त्रीजी को चुना गया और शास्त्रीजीने इस उत्तरदायित्व को अत्यंत सफलता के साथ निभाया ।



श्री. शास्त्रीजी के व्यक्तित्वमें भारतकी परंपरा एवं संस्कृति गौरवपूर्ण रीतिसे साकार हुई थी । जनतंत्रके भावकी वास्तविकताके श्री. शास्त्रीजी प्रतीक थे । दरिद्र से दरिद्रके प्रति उन्हें गहरा प्रेम था, अथाह सहानुभूति थी । राष्ट्रकी जनताके विश्वासके वे भाजन बने थे । अपने

अठारह महीनोंके प्रधान-मंत्री पदके छोटे कार्य-काल में वे राष्ट्रकी भाग्य-नौकाके कर्णधार रहे। संकटोंकी आंधियाँ उठीं, आक्रमणकी बिजलियाँ गिरीं, फिर भी इस कुशल कर्णधारने प्रतिकूलतासे रण रोपकर राष्ट्र की जीवन-नैयाको सफलतासे किनारे लगाया और विश्वकी नज़रोंमें भारतकी मान-मर्यादाको ऊँचा उठाया !

स्व. श्री. शास्त्रीजीका व्यक्तित्व, सौजन्य एवं दृढ़ता का अपूर्व सम्मिलन था। उन्होंने हमारी राष्ट्रीय एकताको मज़बूत बनाया और युद्ध तथा शान्ति दोनों क्षेत्रोंमें विजयश्रीका मुकुट देशके सिरपर चढ़ाया। शीलकी दृढ़ता तथा समस्याओंका सामना करनेकी सचाई की नीतिके कारण उन्हें अत्यल्प कालमें ही विश्व-नेता की प्रतिष्ठा प्राप्त हुई। इस शान्तिके महान सेनानीने अपनी परमोच्च विजयके सुहावने क्षणोंमेंही वीरका मोक्ष पाया। ताश्कंद घोषणा विश्वके इतिहासमें श्री. शास्त्रीजीके कर्तृत्वका अक्षय स्मारक होगी।

श्री. शास्त्रीजी की मृत्युसे भारतकी घोर क्षति हुई है। भारत अनाथ बना है। राष्ट्रकी ऐक्य-शक्तिके लिए श्री. शास्त्रीजी जीवनभर अथक परिश्रम करते रहे और उसीके लिए उन्होंने अपने प्राणतक दे दिये, राष्ट्रैक्य पर अपना सब कुछ निछावर करनेका आज हम फिर एक बार दृढ़ निश्चय व्यक्त करते हैं।

श्रीमती ललितादेवी शास्त्री तथा उनके परिवारके अन्य सदस्योंपर दुःखका वज्र गिरा है। हम उनके दुःखमें सहभागी हैं और करुणामय प्रभुसे प्रार्थना करते हैं कि वह स्वर्गीय आत्माको चिर-शांति प्रदान करे !

## माजी विद्यार्थ्यांस आवाहन

' न्यू पूना कॉलेज '
हा मनूचा मासा
सुरवातीला शाळेच्या आवारात
काही खोल्यांच्या रांजणात मावला.
दहा वर्षांनी तो त्यांत मावेनासा झाल्यावर
भाऊमहाराज बागेच्या तलावात
आणून सोडला गेला.
तेव्हापासून हा तलाव लांबरुंदखोल करण्याचा
अविरत उद्योग चालू आहे.
आज हा महामत्स्य
विद्यमान वास्तूत मावत नाही :
ग्रंथालयाची जागा
पुस्तकांच्या वाढत्या संख्येमुळे
अतिशय अपुरी ठरत आहे.
जीवशास्त्र-विभागाला
प्रशस्त प्रयोगशाळेची गरज आहे.
विद्यार्थ्यांना
मोकळ्या तासांच्या वेळात विसावण्यास
पुरेशी जागा नाही.
वसतिगृहांत
असंख्य विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकत नाही.
शिक्षक आणि विद्यार्थी यांना
निवांतपणे भेटायला, बोलायला, चर्चेला
जागा नाही.
अभ्यासशाला
अपुरी पडू लागली आहे.
महामत्स्याचा तलाव मोठा करायला हवा आहे.
कॉलेजच्या वाढीचे हे काम
त्याच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने
आम्ही हाती घेऊ इच्छीत आहो.
साहाय्यासाठी आपणांवर विसंबून आहो,—
कॉलेजच्या भूतपूर्व आणि विद्यमान
विद्यार्थी-विद्यार्थिनींवर
कॉलेजच्या हितचिंतकांवर
विद्याप्रेमी सज्जनांवर.

ज्ञानाच्या या पाणपोईवर
आजवर हजारोंनी आपली तृषा शमविली.
पुढच्याही हजारोंना ती सुखाने शमविता यावी
असे स्वरूप ति ा देण्याचे श्रेय
आपण घ्या !
आपल्या साहाय्याने हे कॉलेज
वर्धिष्णू आणि प्रभविष्णू करून
**' निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु '**
हे त्याचे ब्रीद
जागते ठेवण्यात यशस्वी होऊ
असा आम्हांला विश्वास वाटतो.

## आपण कॉलेजसाठी काय करू शकाल?

१. **सुवर्णमहोत्सवनिधीला** एकरकमी किंवा तीन चार हप्त्यांत पुढीलप्रमाणे साहाय्य करून शिक्षण-प्रसारक-मंडळीच्या सदस्यादी वर्गांत स्थान मिळवू शकाल :

| | | | |
|---|---|---|---|
| सदस्य | देणगी | रु. | १०० |
| हितचिंतक | देणगी | रु. | २५० |
| हितकर्ता | देणगी | रु. | ५०० |
| आश्रयदाता | देणगी | रु. | १००० |

२. **माजी विद्यार्थी संघाचे** सदस्य होऊ शकाल. या संघाचे वार्षिक शुल्क : दोन रुपये

३. आपल्या पूर्वीच्या परिचित सहाध्यायी मित्रांना आणि अन्य विद्याप्रेमींना प्रस्तुत योजनेची माहिती करून देऊन त्यांनाही साहाय्य करण्यास विनंती आणि प्रेरणा करू शकाल.

पत्रव्यवहार :
**प्राचार्य, स. प. महाविद्यालय**
**टिळक रस्ता, पुणे २**

—— शि क्ष ण प्र सा र क मं ड ळी च्या वि वि ध शि क्ष ण सं स्था

नू. म. वि मराठी शाळा, पुणे ( १८८३ ) ● नू. म. वि. प्रशाळा, पुणे ( १८८३ )
स. प. महाविद्यालय, पुणे ( १९१६ ) ● ह. दे. प्रशाळा, सोलापूर ( १९१८ )
मीमांसा विद्यालय, पुणे ( १९२४ ) ● रामनारायण रुइया महाविद्यालय, मुंबई ( १९३७ )
टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे ( १९४१ ) ● रा. आ. पोदार व्यापार महाविद्यालय, मुंबई ( १९४१ )
शा. शि. विद्यालय, पुणे ( १९५० ) ● एस्. टी. सी. इन्स्टिटयूट, पुणे ( १९५२ )
रुइया मूकबधिर विद्यालय, पुणे ( १९५६ ) ● नू. म. वि. शिशुशाळा, पुणे ( १९५६ )
नू. म. वि. मराठी शाळा, सोलापूर ( १९५९ ) ● नू. म. वि. मुलींची प्रशाळा, पुणे ( १९६० )
श्री चंद्रशेखर विद्यालय प्रशाळा, श्रीपूर ● श्री चंद्रशेखर विद्यालय प्राथमिक शाळा, श्रीपूर

□ प्रकाशक : श्री. र. कावळे, स. प. महाविद्यालय, पुणे ९.
□ मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे २.